॥ श्रीसुंदरनारायण ॥

श्रीक्षेत्र

# नासिकपंचवटीमाहात्म्य.



मूळ संस्कृत श्लोक व मराठी भाषांतरासह.

प्रकाशकः-रा. रा. त्रिंबक नारायण पुजारी

प्रभु धर्माधिकारी नासिक.

मिति श्रावण शु. ११ शके १८४२.

हौ:] सर्व हक्क स्वाधीन. [ सन १९२०.

:-रा. रा. गजानन रघुनाथ मुळे, पुरंदरे

कं. प्रिं. प्रेस, नं. ३ ठाकुरद्वार मुंबई.

किंमत बारा आणे.

894

श्रीगणेशाय नमः ।

अथ

# श्रीनासिकपंचवटीमाहात्म्य.

जटा जीर्णारण्यांतरगतसरित्तीरनिनदत्खनश्रेणी-कोलाहलविगतनिद्रा भगवती ॥ पिधाय स्वौ कर्णौ स्वपिति तु तदा तत्कुचयुगं निजानंदः शंभुः स्पृशति सुखहेतुर्भवतु वः ॥ १ ॥ या स्वर्गे धिषणेन दैवत-सभामध्ये सदा कथ्यते भूर्लोके निमिषे वने प्रतिदिनं सूतेन या कथ्यते ॥ पाताले कपिलेन या प्रतिदिनं नागालये कथ्यते सैषा रामकथा यथामति मया वः संनिधौ कथ्यते ॥ २ ॥ चत्वारोप्यति नीचयोनिषु गता भक्तच्छली पंचमः षष्ठो मातृशिरोहरः परवधू भोक्ता च चौरोऽष्टमः ॥ यज्ञध्वंसकवृद्धिकृच्च नवमः कल्किः कलेर्मध्यगः सीतानाथतवावतारनिचयस्तत्त्वतस-मोन्यः कुतः ॥ ३ ॥

श्रीशंकराच्या जटारूपी निबिड अरण्यांतून वाहणाऱ्या नदीच्या कांठावर असलेल्या पक्ष्यांच्या किलकिलाटानें जागी झालेल्या पार्व-तीनें जेव्हां आपले दोन्ही कान झांकून घेऊन निद्रा केली, तेव्हां ज्यानें ब्रह्मानंदांत निमग्न असतांहि तिच्या स्तनांस स्पर्श केला, असा शंकर तुम्हांला सुखदायी होवो ॥ १ ॥ जी रामकथा स्वर्ग-लोकांत देवसभेमध्यें बृहस्पती वर्णन करितात, जी मृत्युलोकीं नैमि-षारण्यांत प्रतिदिवशीं सूत शौनकप्रभृतीमुनीस सांगतात, जी पाता-ळांत प्रतिदिवशीं कपिळमुनी नागालयांत सांगतात, ती रामकथा यथामति मी तुमच्यासमोर सांगतों ॥ २ ॥ रामा ! तुझे पहिले

शंभोः स्वीयमुखारविंददशकं दत्वा च तत्पूजया लक्ष्मीं निर्जरराजदुर्लभतरां संप्राप्तवान् रावणः ॥ तां त्वद्दर्शनमात्रतस्तदनुजो लेभे चिरस्थायिनीं ब्रूहि त्वं रघुनाथ कोऽस्ति भवता दातासमः क्ष्मातले ॥ ४ ॥ कदाचित्क्रीडार्थे दशवदननामा शिववने प्रयातस्तत्काले क्षुधितमखिलं राक्षसकुलम् ॥ विदित्वा तत्तृप्तिं भुजदलितकैलासनिपतद्गणश्रेण्या चक्रे समिति निहितः सोऽपि भवता ॥ ५ ॥

मत्स्यादि चार अवतार नीच जातींत गेले, पांचवा वामनावतार भक्ताचा छल करण्यांत गेला, सहावा परशुराम हा आईचा शिरच्छेद करणारा झाला, आठवा चोरी व जारकर्म करणारा झाला, नववा यज्ञमार्गाचा विध्वंस करणारांची वाढ करणारा, दहावा कलंकी भांडण करणारा. यावरून हे सीतानाथा रामा, तुझ्यासारखा दुसरा अवतार कोणता ! ॥ ३ ॥ देवेंद्रालासुद्धां दुर्लभ अशी जी राज्यलक्ष्मी ती रावणानें आपलीं दहा शिरकमलें शंकराला अर्पण करून मिळविली, पण तीच राज्यलक्ष्मी त्याच्याच धाकट्या भावानें तुला शरण येऊन केवळ तुझ्या दर्शनानें मिळविली. यावरून रामा, सर्व पृथ्वीवर तुझ्यासारखा दुसरा कोण दाता आहे ! ॥ ४ ॥ एके दिवशीं रावण शंकरवनामध्यें क्रीडा करण्याकरितां गेला असतां त्याचे बरोबर असलेल्या राक्षससमुदायाला अतिशय भूक लागली; हें पाहून रावणानें आपल्या हातांनीं कैलास पर्वत विदीर्ण करून तेथें असलेल्या गणांच्या मांसानें आपल्या राक्षसांची तृप्ति केली. तोही रावण तूं रणभूमीवर युद्धांत ठार मारिलास ॥ ५ ॥

येर्बद्धः सरितांपतिर्वनचरैस्तैरेव रक्षःपतिं हंतुं किं न शशाक रामनृपतिः किं न स्मृतं तस्य तत् ॥ भूयोऽयं जनुरंतरेपि जगतः पीडाकरो मा भवत्वित्थं भावनयैव पादयुगुलं संदर्श्य मुक्तिं ददौ ॥ ६ ॥ आदौ ब्रह्मकमंडलुं प्रति गता गौरीविवाहोत्सवे पश्चाद्वामनपादपद्मरजसा पूता च यज्ञे बलेः ॥ प्राप्ता किं च महेशमूर्द्धनि जटां श्रीगौतमप्रार्थिता प्रायाद्ब्रह्मगिरेः पयोनिधिमसौ गोदावरी राजते ॥ ७ ॥ लटं वा लोटं वा स्मरतु तनुपास्तेय समये तुरीं वा वेमां वा घटमपि पटं रासभमपि ॥ तथापि श्रीगौरीरमणचरणाब्जांतरसुधारसास्वादप्राप्तिं भजति सरितोस्यास्तटगतः ॥ ८ ॥

ज्या वानरांनीं समुद्रांत सेतु बांधिला, त्याच वानरांकडून रावणाचा वध रामास करतां आला नसता काय ! किंवा हें करण्याची रामास आठवण राहिली नाहीं काय ! परंतु पुनः पुढें येणारे जन्मांत हा असाच लोकांनां पिडा देणारा न होवो, याच इच्छेनें अंतकाळीं आपल्या चरणांचें दर्शन देऊन राम त्याला मुक्त करिता झाला ॥ ६ ॥ गौरीच्या लग्नाच्यावेळीं ब्रह्मदेवाच्या कमंडलूंत गेलेली, बळीच्या यज्ञाचेवेळीं वामनाच्या चरणरजानें पवित्र झालेली, श्रीशंकराच्या मस्तकीं असलेल्या जटेच्या ठिकाणीं प्राप्त झालेली, श्रीगौतममुनीच्या प्रार्थनेवरून ब्रह्मगिरीपर्वतापासून निघून समुद्रास मिळालेली गोदावरी सर्व प्रकारानें शोभते ॥ ७ ॥ एखादा मनुष्य व्याकरणशास्त्राचा अभ्यास करून अंतकाळीं लट, लोटाचें स्मरण करो ! किंवा न्यायशास्त्राचे प्राविण्यामुळें वेमा, घट पटादिकांचें स्मरण करो; तथापि जो मनुष्य या गौतमी गोदेच्या तीरावर अंत

तपस्यंतं महात्मानं मार्कंडेयं महामुनिम् ॥ व्यासशिष्यो महातेजा जैमिनिः पर्यपृच्छत ॥ ९ ॥ जैमिनिरुवाच ॥ ॥ कलौ युगे म्लेच्छमयी धरित्री धर्मो गतः सर्वजनात् पृथिव्याम् ॥ वर्णाश्रमा नैव वसंति तस्माद्दिवौकसः क्वापि गता मुनींद्राः ॥ १० ॥ त्यक्तस्वधर्मा मनुजा वसंति क्वचित्क्वचिल्लिंगधरा द्विजातयः ॥ क्वचित्क्वचिद्वेदविदोपि संति एवं तु ते केवललिंगधारिणः ॥ ११ ॥ कलौ युगे वार्धुषिका द्विजेंद्राः प्रतिग्रहार्थं पृथिवीमटंति ॥ लक्षेश्वरोपि क्षितिपालसेवां कृत्वोदरं पूरयते न कामम् ॥ दंभं च भेदं च करोति नित्यं प्रतिग्रहार्थं नृपतिं प्रयाति ॥ १२ ॥

पावेल, तो श्रीशंकराच्या चरणकमलांतील अमृतरसाचा स्वाद घेतो. ( ह्मणजे त्याला कैलासपदाची प्राप्ति होते ) ॥ ८ ॥ तपश्चर्या करणाऱ्या मार्कंडेय महामुनीला एके वेळीं महातेजस्वी व्यासशिष्य जैमिनी मुनीनें प्रश्न केला ॥ ९ ॥ जैमिनी विचारतो—हे मुनिश्रेष्ठा ! कलियुगांत सर्व पृथ्वी म्लेंछमय झाल्यावर, पृथ्वीवरील सर्व लोकांचा स्वधर्म भ्रष्ट झाल्यावर, वर्णाश्रमधर्म पृथ्वीवर नाहींत हें पाहून देव कोठें गेले ? ॥ १० ॥ त्याचप्रमाणें सर्व मनुष्यांनीं आपआपले धर्म सोडिले, केवळ ब्राह्मणाचें चिन्ह धारण करणारे असे ब्राह्मण दिसतात, वेद जाणणारे थोडे ब्राह्मण कोठें आहेत, परंतु केवळ चिन्ह धारण करणारेच फार आहेत ॥ ११ ॥ द्विजेंद्र ह्मणजे ब्राह्मण, हे या कलियुगांत वाढीदिढीचा व्यापार करतात, प्रतिग्रह घेण्याकरितां सर्व पृथ्वीभर भटकतात, श्रीमान् लक्षाधिशसुद्धां राजसेवा करून पोट भरतो, परंतु त्याची इच्छा केव्हांहीं

राजानोऽपि महापापा दुराचाराश्च तस्कराः ॥ म्लेंच्छा एव प्रदृश्यंते प्रायशो वसुधातले ॥ १३ ॥ न मानयंति ते विप्रान् गर्हयंति च नित्यशः ॥ तीर्थानां भंजकाः केचित्केचिच्छूद्राश्च भूमिपाः ॥ १४ ॥ वृषलीपतयः सर्वे पतिता मद्यलोलुपाः ॥ राज्ञि भ्रष्टे स्वधर्मेभ्यो वर्णा भ्रश्यंति धर्मतः ॥ १५ ॥ पत्नी निंदति नायकं निजसुतस्तातं तथा मातरं बंधुर्जेष्ठतमं च निंदति गुरुं शिष्योपि दासः प्रभुम् ॥ जामाता श्वशुरं च निंदति वधूः श्वश्रूं स्नुषां हंत्यहो जेष्ठोपि श्वशुरश्च निंदति कलौ वृद्धं समस्तो जनः ॥ १६ ॥

तृप्त होत नाहीं, दांभिकपणा व भेद करावयाचा आणि प्रतिग्रह घेण्याकरितां राजाकडे जावयाचें ॥ १२ ॥ राजे पाहावे तर ते महापापी, दुराचरण करणारे, चोर आणि प्रायः म्लेंछ असे पृथ्वीवर दिसतात ॥ १३ ॥ ते ब्राह्मणांचा केव्हांही सन्मान करीत नाहींत, सदोदित ब्राह्मणांची निंदा करितात. कित्येक राजे तीर्थांचा भंग करतात, कित्येक राजे शूद्ररूपी आहेत ॥ १४ ॥ सर्व राजे हीन कुळांतील स्त्रियांशीं लग्न लावून पतित झालेले असून मद्यप्राशन करण्यांत गढून गेलेले आहेत. याप्रमाणें राजे स्वधर्मापासून भ्रष्ट झाल्यामुळें इतर वर्णही आपआपल्या धर्मापासून भ्रष्ट होतात ॥ १५ ॥ बायको नवऱ्याची निंदा करते, मुलगा बापाला नांवें ठेवितो, तशीच आईची निर्भर्त्सना करितो, लहान बंधू वडील बंधूची निंदा करितो, शिष्य गुरूची निंदा करतो, चाकर धन्याची निंदा करितो, जावई सासऱ्याची निंदा करितो, सून सासूची निंदा करिते, वडील सासराही सुनेला मारतो, त्याचप्रमाणें या कलियुगांत म्हाताऱ्याची निंदा सर्व करितात ॥ १६ ॥

तस्मिन्कलियुगे घोरे क्व वस्तव्यं द्विजातिभिः ॥ धर्मकामैर्मुनिश्रेष्ठ तन्मे गदितुमर्हसि ॥ १७ ॥ अतिश्रेष्ठोऽसि वृद्धोऽसि सर्वं जानासि तत्त्वतः ॥ कृपालुः सर्वहितकृत्तेन पृच्छामि ते मुने ॥ १८ ॥ मार्कंडेय उवाच ॥ साधु साधु महाभाग बुद्धिमानसि वै मुने ॥ यत्पृष्टं भवता सर्वं तव लोकहिताय च ॥ कथयामि समासेन तच्छृणु श्रद्धयाऽन्वितः ॥ १९ ॥ तीर्थानि सर्वाणि गतानि देवाः स्वर्गं गताः पुण्यतमा मुनींद्राः ॥ धर्मो विनष्टश्च कलौ युगेऽस्मिन् पापं प्रवृत्तं सकलोह्यधर्मः ॥ २० ॥ कलिधर्माः प्रबाधंते सर्वदेशेषु भूतले ॥ गोदावर्य्यां न बाधंते कदापि तटयोर्द्वयोः ॥ ततोपि नाशिके नैव बाधंते कलिकालजाः ॥ २१ ॥

अशा भयंकर कलियुगांत ब्राह्मणांनीं कोठें रहावें, धर्माचरण करण्याची इच्छा करणाऱ्या ब्राह्मणांनीं कोठें रहावें हें आपण कृपा करून सांगा ॥ १७ ॥ कारण हे मार्कंडेय मुने ! आपण फार श्रेष्ठ आहां. आपण सर्वज्ञ आहां, आणि सर्व लोकांचे हितेच्छु असून कृपाळू आहां, ह्मणून मी आपणास विचारतों ॥ १८ ॥ मार्कंडेय सांगतात—हे जैमिनीमुने, तूं फार बुद्धिमान् आहेस. तूं फार चांगलें विचारलेंस. जें तूं मला विचारिलेंस तें लोकहिताकरितां तुला सांगतों. मी तें तुला थोडक्यांत सांगतों. तूं भक्तीनें तें ऐक ॥ १९ ॥ या कलियुगांत सर्व तीर्थें नष्ट झालेलीं आहेत. सर्व देव स्वर्गास गेले आहेत. सर्व धर्म नष्ट झाला असून, सर्व अधर्म व पाप यांचाच प्रसार झाला आहे ॥ २० ॥ पृथ्वीवर सर्व देशांत कलिधर्म हे पीडा देतात; परंतु गोदावरीच्या दोन्हीं तीरांवर मात्र ते पीडा

कलियुगे यदि वांछति सद्गतिं निजकुलस्य गतिं परमार्थतः ॥ वसतु पंचवटीं प्रति मानवो भजतु रामपदांबुरुहद्वयम् ॥ २२ ॥ सर्वं परित्यज्य कुटुंबजातं वस्त्राणि पात्राणि धनानि चैव ॥ कौपीनमात्रं परिधाय देहे काषायमेकं च कमंडलुं च ॥ धृत्वा गतः पंचवटीं त्रिकालं रामं भजंश्चेतसि चिंतयानः ॥ समस्तपापैः परितो विमुक्तो विमुच्यते वासनया निकामम् ॥२३॥ ॥ २४ ॥ रामेति नामस्मरणेन जंतुर्विमुच्यते पंचवटीं गतः सन् ॥ नानाविधानामपि पातकानां कर्ता कलौ मुक्तिमुपैति जीवः ॥ २५ ॥ सर्वे धर्माः सर्ववेदाश्च यत्र ज्ञानं भवत्येव तथापि लोकाः ॥ लोभेन मोहेन विलुप्तचित्ता द्रव्यव्ययं नैव समाचरंति ॥ २६ ॥

करीत नाहींत. त्यांतून नासिक क्षेत्रांत तर कलिदोषांचा त्रास मुळींच नाहीं ॥ २१ ॥ मनुष्याला कलियुगांत सद्गति मिळावी व आपल्या कुळाचा उद्धार व्हावा अशी इच्छा असेल तर पंचवटींत राहून श्रीरामाच्या पायांची सेवा करावी ॥ २२ ॥ सर्व कुटुंबाचा त्याग करून, वस्त्र, पात्र, धन ह्यांचाही त्याग करून, कौपीन, ( लंगोटी ) भगवीं वस्त्रें व कमंडलु घेऊन जो मनुष्य रामाचें त्रिकाल सेवन करील व अंतःकरणांत सर्वकाल रामाचें चिंतन करील, तो सर्व पातकांतुन मुक्त होऊन सर्व वासनेंतुन मुक्त होईल ॥ २३ ॥ २४ ॥ कलियुगांत नानाप्रकारच्या पातकांचें आचरण करणाराही मनुष्य पंचवटींत राहून जर रामचंद्राच्या नांवाचें स्मरण करील तर तो पातकांतुन मुक्त होऊन मोक्षाला जाईल ॥ २५ ॥ ज्या पंचवटीमध्यें राहिलें असतां सर्व धर्माचरण घडतें, सर्व वेदांचें

द्रव्यं पापमयं तेषां धर्ममार्गे न गच्छति ॥ तस्मात्कलियुगे सेव्यं रामनाम सदा बुधैः ॥ २७ ॥ संसारार्णवतारणाय विहिता नानातरीणां चयाः किं तु श्रीरघुनाथनामसदृशी नान्या तरिर्दृश्यते ॥ तस्मात्प्राज्ञतमेन पंचवटिकामध्ये विधायालयं श्रीरामस्य पदारविंदयुगलं ध्येयं च सेव्यं भृशम् ॥ २८ ॥ कलौ युगे पंचवटीसमाना नौका भवांभोनिधिपारदात्री ॥ अन्या न तस्मान्मुनिभिः समस्तैः संसेवनीया रघुनाथनौका ॥ २९ ॥ या काश्यां मरणेन मुक्तिरुदिता श्रीविश्वनाथेन सा श्रीरामेण निमेषमात्रवसतेः श्रीपंचवट्यां खलु ॥ एवं वक्तुमलं विधिप्रभृतयो देवा न शक्ता वयं यस्माद्राममहेशयोः किमपि वै भेदं न पश्यामहे ३०

फल मिळतें, ज्ञानप्राप्ति होते व केलेल्या दानधर्माचें सत्फल मिळतें. पण लोभामुळें व अज्ञानामुळें विचारशक्ती नष्ट होऊन लोक दानधर्म करीत नाहींत ॥ २६ ॥ ज्यांचेजवळ द्रव्य असून तें द्रव्य धर्ममार्गांत जे खर्च करीत नाहींत तें द्रव्य पापरूपी समजावें. ज्यांचेजवळ द्रव्यच नाहीं त्यांनीं सदोदित रामनाम घेत जावें ॥ २७ ॥ संसारसमुद्र तरून जाण्याकरितां पुष्कळ प्रकारच्या नौका आहेत, पण रामनामासारखी दुसरी नौका दिसत नाहीं. ह्मणून शहाण्या मनुष्यानें पंचवटींत राहून रामाचे चरणकमल निरंतर ध्यावे, व त्यांची निरंतर सेवा करावी ॥ २८ ॥ कलियुगांत पंचवटीसारखी संसारसमुद्रांतून तारणारी दुसरी नौका नाहीं. ह्मणून सर्व मुनींनीं सेवन करण्यास योग्य अशी ही रघुनाथरूपी नौका आहे ॥ २९ ॥ श्रीविश्वनाथाच्या सन्निध काशीक्षेत्रांत मरण आल्यानें जी मुक्ती

यांती पूर्वपयोनिधिं सुरगणैः संपूजिता साधुभिर्याम्यानां तुदतां जनं श्रवणयोराकर्ण्य कोलाहलम् ॥ क्रुद्धेवोर्मिकदंबकैर्जललवैः संतर्जयन्ती च तान् जाता दक्षिणवाहिनी विजयते श्रीगौतमी नासिके ॥ ३१ ॥ नासिकं यदपि रक्षसां गणैर्दूषितं तदपि भूषितं तथा ॥ स्वर्गभूमिसदृशं विराजते रामपादरजसामनुग्रहात् ॥ ३२ ॥ यत्र पंचवटिका विराजते गौतमीतटगतातिसुंदरा ॥ भुक्तिमुक्तिफलदायिनी सतां सेविता निमिषमात्रमप्यलम् ॥ ३३ ॥

प्राप्त होते तींच श्रीरामाच्या सन्निध पंचवटींत एक निमेष राहिल्यानें प्राप्त होते. हें माहात्म्य वर्णन करण्यास देव, ब्रह्मदेव प्रभृती देव समर्थ नाहींत. यावरून आमच्यामतें महादेव व राम ह्यांत मुळींच भेद नाहीं ॥ ३० ॥ श्रीगोदावरी नदी, जिचें पूजन देव व भगवद्भक्त करितात अशी प्रथम पूर्ववाहिनी होती. परंतु यमदूत लोकांना अतिशय पीडा देऊं लागल्यामुळें लोक मोठ्यानें आक्रोश करूं लागले. तें लोकांचें ओरडणें ऐकून त्या यमदूतांनां धाक दाखवावा ह्मणूनच जणूं आपल्या लाटेचा शब्द करीत नासीक क्षेत्रांत ती दक्षिणवाहिनी झाली ॥ ३१ ॥ राक्षसांच्या समूहामुळें जरी नासिक हें दूषित झालेलें होतें तथापि तेंच हल्लीं अतिशय भूषित झालें आहे. फार काय वर्णन करावें. तेंच नासिकक्षेत्र रामचंद्राच्या चरणरजस्पर्शानें भूमीवरील स्वर्गाप्रमाणें आहे ॥ ३२ ॥ गौतमीगंगेच्या तीरावर अतिशय शोभणारी, सत्पुरुषांना उपभोग व मोक्षरूपी फळ देणारी, निमेषमात्र सेवनानें मुक्ती देणारी अशी पंचवटी सर्वोत्कर्षेंकरून शोभते ॥ ३३ ॥

अरुणावरुणासरस्वतीनां पुरतो मध्यगता विभाति गोदा ॥ इदमष्टदलं सरित्तटानां पदमाहुः परमं विमुक्तिलक्ष्म्याः ॥ ३४ ॥ छायां विधाय गृहिणीं दयितस्य तेजस्तीव्रं परं वपुषि दुःसहमीक्षमाणा ॥ त्वाष्ट्री यमं च यमुनां च निवेद्य तस्यै तातस्य सद्म समुपेत्य जगाद तस्मै ॥ ३५ ॥ त्वष्टोवाच ॥ त्वं गच्छ पुत्रि निजगेहमिति स्वपित्रा स्वातंत्र्यमिंदुवदनासु न युक्तमेव ॥ साचाश्विनीं तनुमुपेत्यनिवारिताऽपि भागीरथीतटगताऽथ तपश्चचार ॥ ३६ ॥ छायापि सूनुं सुषुवे शनैश्चरं कन्यां तथा वैधृतिसंज्ञकां तदा ॥ वैषम्यभावेन तयास्तयोश्च सा प्रवर्त्तमाना परिपालयंती ॥ ३७ ॥

अरुणा, वरुणा व सरस्वती यांचेमध्यें गोदावरी अतिशय शोभते. अरुणा, वरुणा, सरस्वती व गोदावरी यांची, (प्रत्येकीचीं दोनदोन मिळून ८) ८ तीर हीं जणूं मोक्षलक्ष्मीच अष्टदलपद्मच आहे ॥ ३४ ॥ सूर्यानें त्वष्ट्याचे मुलीशीं लग्न लाविलें, तिला सूर्यापासून दोन मुलें झालीं. मुलीचें नांव यमुना व मुलाचें नांव यम. सूर्याचें तेज त्या त्वष्टृ कन्येस सहन न झाल्यानें तिनें आपली छाया तेथें ठेवून तिच्या स्वाधीन तीं मुलें करून ती माहेरीं त्वष्ट्याचे घरीं गेली व झालेली हकीगत त्याला तिनें सांगितली ॥३५॥ त्वष्टा मुलीला ह्मणतो—मुली, तूं आपल्या घरीं जा. स्त्रियांना स्वातंत्र्य चांगलें नाहीं. आपल्या बापाचें तें भाषण ऐकून, बापानें निवारण केलें असतांही ती भागिरथीचे कांठीं गेली व तिनें घोडीचें रूप धारण करून तपश्चर्या करण्याला प्रारंभ केला ॥३६॥ इकडे छायेलाही सूर्यापासून शनैश्वर नांवाचा मुलगा व वैधृती

छाया कदाचिद्यमुनाग्रजेन पादेन पृष्ठेऽप्यथ ताडिता भृशम् ॥ त्वं वक्रपादो भव दुष्ट सद्यस्तच्छापतो वक्रपदो बभूव ॥ ३८ ॥ स वक्रपादोऽप्यतिखिन्नमानसः सूर्यं समागत्य वचो बभाषे ॥ नेयं मदीया जननी कृपानिधे सदैव वैषम्यमुरीकरोति ॥ ३९ ॥ विचारयामास रविस्तदानीं शापः कथं स्यात्तनये जनन्याः ॥ सा ताडिता तेन भृशं समस्तं वृत्तांतमस्मै जगदे सपत्न्याः ॥ ४० ॥ रविस्तुरंगस्य वपुर्विधाय जगाम सा यत्र तपः करोति ॥ चकंप सा तीव्रतुरंगमुग्रं विलोकमाना पुरतो जगाम ॥ ४१ ॥ सातीव भीता शरणं न किंचिल्लेभे तदा दक्षिणमार्गमाप ॥ पलायमानातिभयेन साध्वी गोदावरीतीरमुपाजगाम ॥ ४२ ॥

नांवाची मुलगी झाली. नंतर तिचें वर्तन आपल्या मुलांविषयीं व त्वष्टाकन्येच्या मुलांविषयीं भिन्नभिन्न दिसावयास लागलें ॥ ३७ ॥ एकदां यमानें छायेला पाठींत आतिशय लत्ताप्रहार केला. तेव्हां तिनें रागानें तुझे पाय वांकडे होतील असा शाप दिला ॥ ३८ ॥ त्याचे पाय वांकडे झाले व तो तसाच बापाकडे ( सूर्याकडे ) आला व ह्मणाला कीं, ही माझी आई नाहीं. हिचें वर्तन माझ्याशीं अगदीं विरुद्ध असतें ॥ ३९ ॥ सूर्यानेंही विचार केला कीं, आई मुलाला शाप कसा देईल ? तेव्हां सूर्यानें तिला पुष्कळ मारिलें. नंतर तिनें आपल्या सवतीची सर्व हकीगत सूर्यास सांगितली ॥ ४० ॥ पुढें सूर्यानें घोड्याचें रूप घेऊन जेथें त्याची ती स्त्री तप करीत होती तेथें तो गेला. त्या भयंकर घोड्याला पाहून ती घोडी घाबरली व तिनें तेथून पळ काढिला ॥ ४१ ॥ घाबरलेली ती घोडी कोणीही

स पृष्ठलग्नो बलवाँस्तुरंगो गोदावरीमुत्तरतः कृताश्रमम् ॥ अध्यापयन्तं निगमान्निजाश्रमे मुनीश्वरं पञ्च बटून्प्रभाते ॥ ४३ ॥ त्वाष्ट्रीं गतां तन्निकटे समीक्ष्य पश्चाद्ययौ भानुरपि प्रहर्षात् ॥ निवारयंतो बटवः स्वदंडैस्त्वाष्ट्रीं प्रशप्ता रविणा तदा ते ॥ ४४ ॥ यूयं वटत्वं भजतात्र नोदिता निवारितेयं मम वल्लभा यतः ॥ त्वाष्ट्री स्वनाथं रविमीक्ष्य तस्य पुरो बभूवास्य मुखं मुखेन ॥ ४५ ॥ कृत्वा च सुस्राव च नासिकाभ्यां रेतस्तदा तत्र सुता बभूताम् ॥ तावश्विनौ सुंदररूपधारिणौ तेजःप्रभावैः परिदीप्यमानौ ॥ ४६ ॥

आपलें संरक्षण करीत नाहीं असें पाहून भीतीनें दक्षिण दिशेकडे जेथें गोदावरी नदी वहात होती तेथें आली ॥ ४२ ॥ तो बलवान घोडा तिचा पाठलाग करीत गोदावरीच्या कांठीं आला तों प्रातःकालीं गोदेच्या उत्तरतीरावर असलेल्या एका आश्रमांत एक वृद्ध मुनी पांच शिष्यांना शिकवितांना त्याचे दृष्टीस पडला ॥ ४३ ॥ ती घोडीरूपी त्वष्ट्याची कन्या त्या मुनीच्या आश्रमाजवळ असलेली पाहून तो सूर्य तिच्याकडे आनंदानें धांवला. इतक्यांत त्या बटूंनीं आपल्या दंडांनीं त्या घोडीला तेथून हांकून लाविली. तेव्हां सूर्यानें त्या पांच बटूंना शाप दिला ॥ ४४ ॥ ज्याअर्थीं माझ्या आवडत्या स्त्रीला तुम्ही हांकून लाविलीत, त्याअर्थीं वटवृक्षाच्या जन्माला तुम्हीं पांचहीजण जा ! इकडे घोडीनें आपला पती सूर्य हाच घोड्याचे रूपानें आलेला आहे असें पाहिलें तेव्हां त्याचे तोंडाशीं तिनें तोंड लाविलें ॥ ४५ ॥ इतक्यांत सूर्याचें वीर्य त्या घोडीचे नाकपुड्यांत पडून त्याचवेळीं तेथून दोन पुत्र जन्मले.

वृद्धो ऋषिस्तैर्बटुभिः समेतो रविं विदित्वा दयिता-
समेतम् ॥ प्रणम्य शापांतमसौ ययाचे रामागमांतं च
चकार भानुः ॥ ४७ ॥ क्षेत्रं परं पंचवटीति नाम्ना
गोदातटे ख्यातिमुपैष्यतीति ॥ भुक्तिं च मुक्तिं च
विधास्यतीदं वाराणसीवद्वसतां नराणाम् ॥ ४८ ॥
"काश्यां तु मुक्तिर्मरणेन पुंसां रामस्य नामस्मरणेन
चात्र" ॥ क्षेत्राणि यानि जगतीतलसंस्थितानि मुक्ति-
प्रदानि कथितानि महामुनीन्द्रैः ॥ तस्मादसौ भवति
पंचवटी कृपालोरामस्य पादरजसाधिकतां प्रपन्ना ॥४९॥
यः पंचवट्यां क्षणमेव तिष्ठन् काश्यां च यस्तिष्ठति वर्ष-
मात्रम् ॥ तयोस्तु तुल्यं फलमिष्टमाहुर्बुधाः समस्ता
मुनयश्च सिद्धाः ॥ ५० ॥

ते अतिशय तेजस्वी व सुंदर होते व त्यांचें नांव पुढें अश्विनीकुमार याप्रमाणें झालें ॥ ४६ ॥ त्या म्हाताऱ्या ऋषीनें त्या घोड्याला व घोडीला, सूर्य व त्याची पत्नी आहे असें ओळखून त्याला नमस्कार करून त्या बटूंना उश्शाप देण्याविषयीं प्रार्थना केली. तेव्हां सूर्यानें येथें रामचंद्र आल्यावर हे शापांतून मुक्त होतील असा उश्शाप दिला ॥ ४७ ॥ तसेंच हें स्थान गोदेच्या तीरावर पंचवटी या नांवानें प्रसिद्ध होऊन, हें परमपवित्र क्षेत्र होईल, व काशीक्षेत्रा-प्रमाणें हें क्षेत्र येथें राहणाऱ्या मनुष्यांना सुखोपभोग व मोक्ष देईल असा पंचवटीचा महिमा प्रत्यक्ष सूर्यानें वर्णन केला ॥ ४८ ॥ काशीक्षेत्रांत मरण प्राप्त झालें म्हणजे मोक्ष मिळतो व येथें रामनामाच्या स्मरणानें मुक्ति होते. पृथ्वीवर जितकीं मुक्ती देणारीं क्षेत्रें मुनीनीं वर्णन केलेलीं आहेत, त्या सर्वांपेक्षां रामचंद्राचे पादरजा-मुळें हें पंचवटीक्षेत्र अधिक आहे ॥ ४९ ॥ एक मनुष्य काशीमध्यें

स्वर्गे च मर्त्ये च रसातले च न पंचवट्याः सदृशं स्थलं स्यात् ॥ इति स्वयाप्रहं सदाशिवोपि ब्रह्माण- मिंद्रादिसुरान्समस्तान् ॥ ५१ ॥ ब्रह्मापि देवान् प्रति नित्यमेव वदत्यलं पंचवटीं विहाय ॥ रामोऽपि नान्यत्र पदं ददाति स्वीयं स्वभक्ताय कदापि सत्यम् ॥ ५२ ॥ इत्याद्यनेकानि महामुनीनां मतानि संत्येव शिवानि लोके ॥ श्रीपंचवट्याः परमं पवित्रं न विद्यते मुक्तिकरं भवाब्धेः ॥ ५३ ॥ अरुणावरुणांतरे स्थिता जगती हस्तसहस्रसंमिता ॥ चतुरस्रमिदं हि मंडलं कथिता पंचवटी पुरातनैः ॥ ५४ ॥ इह मुक्तिमनिच्छतामपि प्रभवत्येव नृणां तपस्विनाम् ॥ किमु चित्रमिदं मुनी- श्वरा रघुनाथांघ्रि सरोजसेवताम ॥ ५५ ॥

एक वर्षभर राहिला, व दुसरा मनुष्य या पंचवटींत एक क्षणभर राहिला, तर दोघांनाही सारखेंच फळ मिळतें, असें सर्व देव, मुनींद्र सिद्ध ह्मणतात ॥ ५० ॥ स्वर्गलोक, मृत्युलोक व पाताळ या तिन्ही लोकांत पंचवटीसारखें दुसरें स्थळ नाहीं असें प्रत्यक्ष शंकरानें ब्रह्मदेव व इंद्रप्रभृती सर्व देव यांना सांगितलें आहे ॥५१॥ ब्रह्मदेव सर्व देवांना निरंतर असें सांगतात कीं, रामचंद्र आपल्या भक्ताला पंचवटीवांचून दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं आपल्या पदाची प्राप्ती करून देत नाहीं आणि हीच गोष्ट खरी आहे ॥५२॥ पंचवटीसारखें दुसरें पवित्रस्थान नाहीं व संसारसमुद्रांतून तरून नेणारें दुसरें पवित्र क्षेत्र नाहीं, अशीं महामुनींचीं शेंकडों मतें आहेत ॥ ५३ ॥ अरुणावरुणेच्यामध्यें एक हजार चौरस हाताची चतुष्कोणी पंचवटी आहे असें पुरातन ऋषींचें मत आहे ॥ ५४ ॥ येथें राहणाऱ्या तपस्व्यांची इच्छा नसूनही त्यांनां मुक्ती प्राप्त होते.

विधिनापि हरेण विष्णुना किल निर्णीतमिदं महीतले ॥ अनया सदृशं न विद्यते भवबंधस्य विमुक्तिसाधनम् ॥ ५६ ॥ अत्रांतरे भानुविलोकनार्थं त्वाष्ट्री च द्रष्टुं यमुना सुतापि ॥ आरुह्यसप्ताश्वरथं समेताऽरुणं पुरस्कृत्य यमोपि यातः ॥ ५७ ॥ गोदावरीं वीक्ष्य सुरैः समेता स्वयं नदीरूपमवाप सद्यः ॥ अरुणा तपती बभूव तस्मिन् वरुणा चाप्य सिता तदाऽभवत् ॥ ५८ ॥ गोदां समेते सरितौ तदानीं मध्ये गता पंचवटी चकास्ते ॥ सरस्वती दक्षिणतीरमेत्य बभूव पूर्वाभिमुखी समेता ॥ ५९ ॥ गायत्री चैव सावित्री श्रद्धा मेधा सरस्वती ॥ गोदावरीं समासाद्य पंच नद्योऽभवस्तदा ॥ ६० ॥ अरुणावरुणयोर्मध्ये यत्र प्राची सरस्वती ॥ तत्र स्नात्वा च पीत्वा च ब्रह्महत्यां व्यपोहति ॥ ६१ ॥

मग येथें राहून श्रीरामाची चरणसेवा करणारे मोक्षाला जातील यांत काय नवल आहे ? ॥ ५५ ॥ ब्रह्मदेव, विष्णू व शंकर या सर्वांनीं पंचवटीसारखें मोक्ष देणारें दुसरें साधन नाहीं असें स्पष्ट सांगितलें आहे ॥ ५६ ॥ इकडे सूर्याच्या शोधार्थ सात घोड्याच्या रथांत बसून यमुना व यम अरुणसारथ्यासुद्धां पंचवटींत आले ॥ ५७ ॥ देवासुद्धां गोदावरीला पाहून ते तात्काल नदीरूप झाले. अरुणा व वरुणा ह्या दोन नद्यांचीं रूपें त्यांनीं धारण केलीं ॥५८॥ गोदेसहवर्तमान पंचवटी त्या दोन नद्यांच्या योगानें फार शोभूं लागली. सरस्वती नदी दक्षिण तीरावर येऊन पूर्ववाहिनी झाली ॥ ५९ ॥ गायत्री, सावित्री, श्रद्धा, मेधा व सरस्वती ह्यांनीं गोदावरीवर येऊन पांच नद्यांचीं रूपें धारण केलीं ॥ ६० ॥ जेथें पूर्ववाहिनी सरस्वती असून अरुणा व वरुणा नद्यांचा संगम आहे तेथें

भानुर्भार्यां समादाय सुहृष्टो गृहमागतः ॥ ऋषयोपि ततो जग्मुराश्रमान्स्वान्प्रति द्विजाः ॥ ६२ ॥ ततः प्रभाते लोकेऽस्मिन् ख्याता पंचवटी बभौ ॥ मुनिभिः सहिता ध्याता मुक्तिकामैर्द्विजैरपि ॥ ६३ ॥ सरस्वती गौतमी च नासिके यत्र संगते ॥ तत्र स्नानस्य दानस्य पुण्यसंख्या न विद्यते ॥ ६४ ॥ "श्राद्धं चैव प्रकर्त्तव्यं पितृणां मुक्तिमिच्छता" ॥ गोकोटिदानं गृहणे करोति यः संगमे स्नाति तयोर्द्वितीयः ॥ श्रेष्ठं पदं याति हरि-र्द्विजेंद्रमुवाच रामोपि कपींद्रमादौ ॥ ६५ ॥ इत्याद्यने-कानि महामुनीनां वचांसि संत्येव तथापि वक्ष्ये ॥ भवाद्धितार्थं स्वगणान्महेशो जगाद तद्देवगणाः शृणु-ध्वम् ॥ ६६ ॥

स्नान केलें असतांना व तेथें उदक प्राशन केलें असतां ब्रह्महत्येचें पातक नष्ट होतें ॥ ६१ ॥ सूर्यानें आपल्या स्त्रीला आनंदानें आपल्या घरीं नेलें. ऋषी व ब्राह्मण हे आपआपल्या घरीं गेले ॥ ६२ ॥ नंतर प्रातःकालीं पंचवटी ही अतिशय शोभूं लागली. जिचें ध्यान मुक्तीच्या इच्छेनें मुनी व ब्राह्मण करितात ॥ ६३ ॥ नासिक क्षेत्रांत जेथें सरस्वती व गोदेचा संगम आहे तेथें स्नान दान केलें असतां त्याचें पुण्य असंख्य होतें ॥ ६४ ॥ "पितरांच्या मुक्तीच्या इच्छेनें तेथें श्राद्ध करावें" जो संगमावर ग्रहणाच्या वेळीं कोटी संख्यांक गोप्रदान करील व जो केवळ स्नान करील, त्यांत स्नान करणारा मोक्षपदाला जाईल, असें विष्णूनें नारदाला, व रामानें मारुतीला सांगितलें आहे ॥ ६५ ॥ अशी महामुनींचीं अनेक वाक्यें आहेत. तथापि शंकरानें आपल्या गणांना जें सांगि-

अरुणावरुणासरस्वतीनां पुरतो मध्यगता विभाति गोदा ॥ इदमष्टदलं सरित्तटानां पदमाद्यं भवबंधमुक्ति लक्ष्म्याः ॥ ६७ ॥ मोक्षलक्ष्म्याः पदं चैतत्पद्ममष्टदलं यतः ॥ अतः पद्मपुरं नाम कृते ख्यातिं गतं पुरा ॥ ६८ ॥ कृते तु पद्मनगरं त्रेतायां तु त्रिकंटकम् ॥ द्वापरे तु जनस्थानं कलौ नासिकमुच्यते ॥ ६९ ॥ खरश्च दूषणश्चैव त्रिशिराश्च पुराऽभवत् ॥ त्रयः कंटकरूपास्ते त्रेतायां राक्षसाः स्मृताः ॥ ७० ॥ अन्यैश्च राक्षसैस्तुल्यैर्वेष्टितं सकलं परम् ॥ भगिनी रावणस्यात्र नाम्ना शूर्पणखाऽभवत् ॥ ७१ ॥ द्वापरे तु जनस्थानं जनैः कर्मपरायणैः ॥ वासितं च यतः सर्वं जनस्थानं ततः स्मृतम ॥ ७२ ॥

तर्लें तेंच हे देवहो, तुमच्या हितार्थ मी तुह्मांस सांगतों. तें तुह्मी ऐका ॥ ६६ ॥ अरुणा, वरुणा व सरस्वती यांच्या मध्यभागीं जेथें गोदा शोभते तें स्थान जणूं संसारबंधमुक्ति लक्ष्मीचें अष्टदलपद आहे ॥ ६७ ॥ मोक्षलक्ष्मीचें अष्टदलपद्म तें आहे, ह्मणून त्याला पद्मपुर ह्मणतात ॥ ६८ ॥ कृतयुगांत पद्मनगर, त्रेतायुगांत त्रिकंटक, द्वापारयुगांत जनस्थान आणि कलियुगांत नासिक अशीं या क्षेत्राचीं नांवें आहेत ॥६९॥ त्रेतायुगांत खर, दूषण व त्रिशिरा असे तीन कांट्यासारखे राक्षस येथें राहत होते ह्मणून त्रिकंटक हें नांव झालें ॥७०॥ त्यांच्याचसारखे आणखी राक्षस तेथें राहत होते. तशीच रावणाची बहीण शूर्पणखा तेथें राहत होती॥७१॥ द्वापारयुगांत कर्मरत लोकांनीं येथें वास केला ह्मणून जनस्थान हें नांव अन्वर्थक होतें ॥ ७२ ॥

मुखावयवलूना सा रावणा वरजा यतः ॥ लक्ष्मणेन कृता तस्मात्कलौ तन्नासिकं स्मृतम् ॥ ७३ ॥ नासिकं सकलदेशनासिकं स्वर्गतुल्यमिव भाति भूतले ॥ भुक्तिमुक्तिदमिदं तपस्विभिः सेवितं सकलकामदं नृणाम् ॥ ७४ ॥ सप्तजन्मकृतपुण्यसंचयैः प्राप्यते भुवि नरैर्मुमुक्षुभिः ॥ नासिकं त्रिदशलोकसन्निभं सर्वसिद्धिकरमामनंति ते ॥ ७५ ॥ अयमादि प्रयागोस्ति सर्वकामप्रदो नृणाम् ॥ अष्टकूलः प्रसिद्धोऽयं गोपितः सगरात्मजैः ॥ ७६ ॥ षट्कुलस्य प्रयागस्य प्रसिद्धैः पूर्वजन्मनाम् ॥ उत्तरस्य प्रयागस्य फलं परिमितं स्मृतम् ॥७७॥ दक्षिणस्य प्रयागस्य नासिकस्यामितं फलम् ॥ तत्र त्यागे महत्पुण्यममृतत्वं च गच्छति ॥ ७८ ॥

रावणाच्या बहिणीचें नाक लक्ष्मणानें येथेंच कापलें ह्मणून नासिक हें नांव मिळालें आहे ॥ ७३ ॥ सगळ्या देशांचें नाक असें हें नासिक स्वर्गासारखें शोभतें. ज्याचा आश्रय केला असतां भोग व मोक्ष मिळतो. तपस्वी लोक ज्याचा आश्रय करितात व लोकांच्या सर्व कामना जेथें परिपूर्ण होतात असें हें नासिकक्षेत्र आहे ॥ ७४ ॥ मुमुक्षु लोकांनीं सात जन्मांत जें पुण्य केलें असेल त्याचें फल ह्मणून त्यांना नासिक क्षेत्राचें दर्शन घडतें, व स्वर्गासारख्या नासिक क्षेत्राला तें सर्व मनोरथ परिपूर्ण करणारें आहे असें ते मानतात ॥ ७५ ॥ मनुष्याच्या सर्व कामना परिपूर्ण करणारा हा आदिप्रयाग आहे. सगराच्या मुलांनीं गोपित अष्टकूल ह्मणजे आठ तटाकांनीं युक्त असा हा प्रयाग आहे ॥ ७६ ॥ उत्तरेच्या सहा तटांनीं शोभणाऱ्या प्रयागाचें फल परिमित आहे ॥७७॥ दक्षिणप्रयागरूपी नासिक क्षेत्राचें फल अगणित आहे. तेथें दान-

अरुणावरुणांतरे नरो यदि देहं विजहातिधीरधीः ॥
आधिरुह्य विमानमेति शीघ्रं सुरलोकंप्रति देवसेवितम्
॥ ७९ ॥ देवलोके सुरैर्नित्यं गीयते नासिकं सदा ॥
अहो धन्या अहो धन्या मानवा वसुधातले ॥ ८० ॥
अरुणासंगमे स्नानं रामचंद्रस्य दर्शनम् ॥ तेषां च
नासिके लोके मोक्षमार्गप्रदायकम् ॥ ८१ ॥ भवबंध-
विमुक्तिकामना हृदये तिष्ठति तस्य नैव हि ॥ सततं तु
त्रिकंटकाभिधं नगरं सेव्यमनंत सिद्धिदम्॥८२॥नासिकेन
सदृशं न विद्यते मुक्तिसाधनमनेककामदम् ॥ स्वर्गसाध-
नमुमेशसेवितं कश्यपादि मुनिवर्ग सेवितम् ॥ ८३ ॥
यदि च मरणकाले मानवो मानसे च स्मरति हि महिमानं
नासिकस्यापि सद्या ॥ अमर-नगर-नारीचामरैः सेव्य-
मानो विगतसकलपापो यातिविष्णोः समीपम् ॥ ८४ ॥

धर्म केला असतां अतिशय पुण्यप्राप्ति होते व मोक्षप्राप्ति होते ॥७८॥
अरुणा व वरुणेच्यामध्यें जो मनुष्य देहत्याग करतो, तो विमानांत
बसून देवलोकांस जातो ॥ ७९ ॥ देवलोकांत गेल्यानंतर देव
नासिक क्षेत्राचें वर्णन करितात व ह्मणतात कीं, पृथ्वीवर नासिक
क्षेत्रांत राहणारे लोक धन्य आहेत ॥ ८० ॥ अरुणेच्या संगमावर
स्नान करून रामाचें दर्शन घेणारा मोक्षाला जातो ॥ ८१ ॥
ज्यांचे मनांत मोक्षप्राप्तीची इच्छा असेल त्यांनीं अनंतसिद्धि देणाऱ्या
नासिक क्षेत्रांत निरंतर वास करावा ॥ ८२ ॥ नासिक क्षेत्रासारखें
दुसरें मुक्तीचें साधन नाहीं. हें क्षेत्र सर्व कामना परिपूर्ण करणारें
आहे. श्रीशंकर व कश्यपादि मुनी हे निरंतर ह्या क्षेत्रांत राहतात
॥ ८३ ॥ मरणाचे वेळीं जो मनुष्य ह्या क्षेत्राचा महिमा मनांत

अमरावती जगति भाति ततोमिविनासिकं शतगुणं ग्रथितम् ॥ अनयोः समं त्रिभुवनेपि नहि त्रिदशालयं त्रिगुणनाशकरं ॥ ८५ ॥ धर्मे चार्थे च कामे च मोक्षे च मुनिसत्तम ॥ नाकेपि वै तथाऽन्यत्र यत्रे ह्यास्ति न तत्कचित् ॥ ८६ ॥ अरुणावरुणांतरे स्थिता जगती हस्तसहस्र संमितः ॥ चतुरस्रमिदं हि मंडलं कथिता पंचवटी पुरातनैः ॥ ८७ ॥ इति पंचवटी गुणान्निगद्य विप्रान् ग्रहराजो निजकांताया समम् ॥ श्वशुरस्य गृहं गतस्ततः श्वशुरेणापि स यंत्ररोपितः॥८८॥ इति नासिकमाहात्म्ये कथिता पंचवटी कथा ॥ शृण्वतां पदमात्रं तु पापराशिर्नविद्यते ॥ ८९ ॥ ॥ इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्ये पंचवटीमाहात्म्य निरूपणं नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥ ॥

आणील त्यावर देवांगना चवऱ्या वारतील व तो निष्पाप होऊन विष्णुपदाला जाईल ॥ ८४ ॥ स्वर्गाची शोभा जगांत आहे त्यापेक्षां शंभरपट नासिक क्षेत्राची शोभा आहे. स्वर्ग व नासिक ह्यांच्यासारखीं दुसरीं स्थानें नाहींत ॥ ८५ ॥ धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्या चारी पुरुषार्थांचीं साधनें जशीं नासिक क्षेत्रांत आहेत तशीं दुसरीं कोठेंही नाहींत ॥ ८६ ॥ अरुणा वरुणेच्या मध्यभागीं एक हजार हात चतुष्कोण जमिनीच्या भागाला पंचवटी हें नांव पुरातन ऋषींनीं दिलें आहे ॥ ८७ ॥ हें पंचवटीचें माहात्म्य श्रीसूर्यनारायणानें ब्राह्मणांस सांगितलें. नंतर स्त्रीसह सासऱ्याचे घरीं गेला, व सासऱ्यानें त्याला यंत्रावर धरलें ॥ ८८ ॥ ह्याप्रमाणें नासिक माहात्म्यांतील पंचवटीची कथा सांगितली. ही कथा ऐकणारांचीं सर्व पातकें नष्ट होतात ॥ ८९ ॥ इति श्रीनासिक माहात्म्ये पंचवटीवर्णनं प्रथमोध्यायः ॥ १ ॥ ॥ ॥

मार्कंडेय उवाच ॥ ॥ कपालेश्वरमाहात्म्यं श्रूयतां मुनिसत्तम ॥ शृण्वतां सर्वपापानि विलीयंते क्षणादपि ॥ १ ॥ ब्रह्मणः पंचवक्त्राणि पुरा ख्यातानि सर्वतः ॥ चतुर्भिश्चतुरो वेदान् नित्यं पठति विश्वसृड् ॥ २ ॥ पंचमेन हरेर्निंदा करोति कमलासनः ॥ कदाचित्सुरसंघेषु विष्णुं नत्वा स्थितेषु च ॥ ३ ॥ निनिंद पंचमं वक्त्रं विधातुर्जगतांपातिम् ॥ ब्रह्मोवाच ॥ ॥ मत्स्यस्त्वं कच्छपश्चैव सूकरः सिंहवक्त्रधृक् ॥ अश्वग्रीवो भुजंगश्च तिर्यग्योनिगतो हरिः ॥ ४ ॥ वृंदायाः पतिभक्तायाः पातिव्रत्यविभंजकः ॥ विश्वासघातकर्ता च भक्तच्छलविधायकः ॥ ५ ॥ निजमातृशिरश्छेत्ता चौरः स्वजनदूषकः ॥ परदाराभिगामी च हरः परमधार्मिकः ॥ ६ ॥

मार्कंडेय ह्मणतात—मुनिश्रेष्ठा, मी कपालेश्वराचें माहात्म्य सांगतों ऐक. हें माहात्म्य ऐकिलें असतां ऐकणारांचीं सर्व पातकें एका क्षणांत नाहींशीं होतात ॥ १ ॥ पूर्वी ब्रह्मदेवाला पांच तोंडें होतीं, तो चार मुखांनीं नित्य वेदपाठ करीत असे ॥ २ ॥ पांचव्या तोंडानें विष्णूची निंदा करी. एके दिवशीं सर्व देव विष्णूला नमस्कार करून बसले असतां ॥ ३ ॥ ब्रह्मदेवाच्या पांचव्या तोंडानें विष्णूची निंदा केली. ब्रह्मदेव ह्मणाला—तूं मत्स्य, कच्छ, वराह, नृसिंह, हयग्रीव, शेष इत्यादि पशुजन्माला गेलास ॥ ४ ॥ पतिव्रता जी वृंदा तिचें पातिव्रत्य तूं भ्रष्ट केलेंस, तूं विश्वासघातकी आहेस. भक्तांचा छल करणारा आहेस ॥ ५ ॥ आपल्या आईचा शिरच्छेद करणारा, चोऱ्या करणारा, स्वजनाला दूषण देणारा, परस्त्रीगमन करणारा आहेस. शंकर मात्र परम धार्मिक आहेत ॥ ६ ॥

इत्याद्यनेकशो निंदां हरेश्चक्रे विधिस्तदा ॥ ददा-
कर्ण्य महादेवो भृशं कोपाकुलोऽभवत् ॥ ७ ॥ शिव
उवाच ॥ ॥ रजोगुणप्रधानस्य तव युक्तं विधेर्वचः ॥
तथापि भगवन्निंदा न कर्तव्या कदाचन ॥ ८ ॥
विष्णुर्हि भगवान् साक्षाच्चराचरगुरुः स्वयम् ॥ तस्य
निंदा न कर्त्तव्या नरैर्नरकभीरुभिः ॥ ९ ॥ यावच्चंद्रश्च
सूर्यश्च यावदेषा वसुंधरा ॥ तावच्च नरकं याति हरिनिंदां
करोति यः ॥ १० ॥ ब्रम्हहा मद्यपश्चैव स्तेयी च गुरु-
तल्पगः ॥ महापातकिनस्त्वेते तत्संसर्गी तु पंचमः ॥ ११ ॥
तेभ्योऽपि स नरः श्रेष्ठो हरिनिंदां करोति यः ॥ सर्वेषामपि
पापानां निष्कृतिर्दृश्यते मुने ॥ निष्कृतिस्तस्य नास्त्येव
हरिनिंदां करोति यः ॥ १२ ॥

अशी अनेक प्रकारांनीं विष्णूची निंदा ब्रह्मदेवानें केली. ती ऐकून शंकरांना अतिशय राग आला ॥ ७ ॥ शंकर ह्मणतात— रजोगुणप्रधान जो तूं त्या तुला हें भाषण योग्यच आहे. तथापि अशा प्रकारें विष्णूची निंदा करूं नये ॥ ८ ॥ विष्णु हे साक्षात् भगवान असून स्थावर जंगमाचे गुरू आहेत. नरकांत जाण्याची ज्यांना भीति वाटत असेल अशांनीं विष्णूची निंदा केव्हांही करूं नये॥९॥ जो विष्णूची निंदा करितो, तो जेथपर्यंत चंद्र सूर्य आहेत, व जों पावेतों पृथ्वी आहे तेथपर्यंत नरकांत पडतो ॥ १० ॥ ब्रह्महत्या करणारा, मद्य प्राशन करणारा, चोरी करणारा, गुरुपत्नीशीं गमन करणारा, ह्या चौघांना महापातकी ह्मणतात, व जो ह्यांच्याशीं संबंध ठेवितो त्यालाही महापातकीच ह्मणतात ॥ ११ ॥ हरीची निंदा करणारा तर ह्या पांच महापातक्यापेक्षांही जास्त पातकी सम-

एवं शिववचः श्रुत्वा शिवमाह विधिस्तदा ॥ भवानपि तथैवास्ति निंद्यकर्म करोषि हि ॥ १३ ॥ चिताभस्मधरो नित्यं वृषवाहोऽहिभूषणः ॥ नरास्थिमालां वहसि छिन्नलिंगो दिगंबरः ॥१४॥ गजचर्मधरो नित्यं निंद्यः सर्वसुरेषु च ॥ ययोरेव समं वित्तं समो धर्मः समो गुणः ॥ १५ ॥ तयोर्मैत्री विवाहश्च दृश्यते भुवनत्रये ॥ समवृत्तौ भवंतौ च शिवविष्णू सदा मतौ ॥ १६ ॥ इत्याद्यनेकशो निंदां शिवस्याप्यकरोद्विधिः ॥ ब्रह्मास्त्रं ब्रह्मणो हस्ताद्विकृष्य सुरसंसदि ॥ १७ ॥ ब्रह्मणः पंचमं वक्त्रं चिच्छेद भगवाञ्छिवः ॥ क्रोधं प्रभो संहर संहरेति यावद्गिरः खे मरुतां भवंति ॥ तावच्छिवः पंचमवक्त्रपद्मं चिच्छेद धातुर्निमिषांतरेण ॥ १८ ॥

जावा. सर्व पातकांना प्रायश्चित्तें आहेत, पण विष्णुनिंदा करणाराला प्रायश्चित्त नाहीं ॥ १२ ॥ ह्याप्रमाणें शंकराचें भाषण ऐकून ब्रह्मदेव शंकरास बोलतात कीं, शंकरा ! तुम्हीही विष्णुसारखेंच निंद्यकर्म करणारे आहांत ॥ १३ ॥ चितेचें भस्म धारण करणारे, बैलावर बसणारे, सर्पभूषण धारण करणारे, मनुष्यांच्या हाडांच्या माळा धारण करणारे, छिन्नलिंग व नग्न असे आपणही आहांत ॥ १४ ॥ हत्तीचें कातडें पांघरणारे, सर्व देवांत निंद्य असे आपण आहांत. ज्यांचें ऐश्वर्य, धर्म व गुण सारखे आहेत ॥ १५ ॥ त्यांचीच मैत्री जुळते व लग्नादि व्यवहार होतात. त्यामुळें विष्णू व तुम्हीं दोघे समवर्तन करणारेच आहांत ॥ १६ ॥ ह्याप्रमाणें शंकरांची व विष्णूची पुष्कळ निंदा देवसभेंत ब्रह्मदेवांनीं केली. तेव्हां ब्रह्मदेवाचे हातांतून शंकरांनीं ब्रह्मास्त्र हिसकून घेतलें ॥ १७ ॥ व त्या ब्रह्मास्त्रानें ब्रह्मदेवाचें पांचवें शिर ( तोंड ) तोडलें. देव आकाशांत शंकराचा

छिन्नं विधातुर्वदनं हरेण कोलाहलः प्रादुरभूत्सुदारुणः ॥ साध्वित्वियं वाक् गगने बभूव पुनःपुनः खेदमवाप शंभुः ॥ १९ ॥ अयुक्तमेतद्विहितं मयाद्य यद्ब्रह्मणश्छिन्नमिदं हि मस्तकम् ॥ यद्यप्ययं केशवदेवनिंदको दंडं परं चार्हति युक्तमेव ॥ २० ॥ तथाप्यहं ब्रह्मवधापनुत्तये व्रतं चरिष्यामि यथोदितं बुधैः ॥ खट्वांगमादाय करे कपालं तस्मिन् विनिक्षिप्य जगाम शंभुः ॥ २१ ॥ तीर्थानि कर्तुं जगतीं समस्तां बभ्राम यावन्निपतेत्कपालम् ॥ उत्तराणि च तीर्थानि विधाय विधिवद्धरः ॥ दक्षिणानि च तीर्थानि कर्तुं प्रारभदीश्वरः ॥ २२ ॥

क्रोध आवरण्याविषयीं प्रार्थना करीत असतांनाच शंकरांनीं ब्रह्मदेवाचा पांचवा मस्तक तोडिला ॥ १८ ॥ शंकरानें ब्रह्मदेवाचें मस्तक तोडिल्यावरोबर मोठा भयंकर शब्द झाला. आकाशांत चांगलें, चांगलें, ह्मणून शब्द झाला. शंकराला मात्र खेद प्राप्त झाला ॥ १९ ॥ शंकर ह्मणाले—मी आज ब्रह्मदेवाचें मस्तक तोडिलें हें कृत्य बरें केलें नाहीं. हा ब्रह्मदेव केशवाची निंदा करणारा असल्यामुळें याला हाच दंड योग्य आहे ॥ २० ॥ तथापि मी शहाण्यांनीं सांगितलेलें व्रत ब्रह्महत्त्येचा दोष जाण्याकरितां आचरण करीन, असें ह्मणून शंकरानें खट्वांग हातीं घेऊन त्यावर कपाळ ठेविलें आणि तीर्थयात्रेला गमन केलें ॥२१॥ तीर्थयात्रा करीत करीत कपाळ पडे पावेतों सगळी उत्तरेकडील तीर्थयात्रा करून दक्षिणेकडील तीर्थयात्रा करण्याला शंकरानें आरंभ केला ॥ २२ ॥

पद्भ्यां व्रजन् मज्जति तीर्थमात्रे भिक्षाटनं चापि करोति सायम् ॥ एवं चरन् द्वादशवर्षमध्ये तथापि नैतन्निपपात भूमौ ॥ २३ ॥ कदाचिच्छंकरः खिन्नः कश्यपा संगमं ययौ ॥ तत्र स्नातः कृशः खिन्नः शीर्णगात्रो महेश्वरः ॥ २४ ॥ विप्रवेदीं समासाद्य प्रसुप्त इव तस्थिवान् ॥ निशीथे तस्य विप्रस्य वृषभो मातरं प्रति ॥ २५ ॥ उवाच वचनं मातः शृणु मे परमं वचः ॥ अयं गृहपतिर्विप्रः प्रमत्तो धनसंपदा ॥ २६ ॥ मां बध्वा सुदृढैः पाशैर्नासावेधं करिष्यति ॥ अहमेनं हनिष्यामि शृंगेण शूलवद्दृढम् ॥ २७ ॥ देवशर्मा द्विजः पापं मयि कर्तुं यदीच्छति ॥ अपराधविहीने तु ततो दुःखपवाप्स्यति ॥ २८ ॥

पायांनीं चालावें, तीर्थाचे ठिकाणीं स्नान करावें, सायंकाळीं भिक्षा मागावी, ह्याप्रमाणें बारा वर्षें तीर्थयात्रा केली, तथापि तें नरकपाळ पडेना ॥ २३ ॥ एके दिवशीं शंकर अतिशय खिन्न होऊन कश्यपा संगमावर गेले, तेथें स्नान केलें. नंतर कृश झालेल्या व खिन्न झालेल्या शंकरानें सगळें शरीर थकलें ह्मणून संगमावर असलेल्या ब्राह्मणाच्या घराच्या ओट्यावर कांहींवेळ निजल्यासारखें केलें ॥ २४ ॥ दोन प्रहर रात्रीं ब्राह्मणाचा बैल आपल्या आईला ( गाईला ) ह्मणाला ॥ २५ ॥ आई, मी जें बोलतों तिकडे लक्ष दे. आपला हा गृहाचा मालक द्रव्यमदानें फार उन्मत्त झाला आहे ॥ २६ ॥ मला हा बळकट पाशांनीं बांधून माझें नाक टोंचून वेसण घालील. मी ह्याला माझ्या शूळासारख्या शिंगांनीं मारीन ॥२७॥ निरपराधी जो मी त्या मला ह्याप्रमाणें दुःख देण्यास प्रवृत्त

इति पुत्रवचः श्रुत्वा गौरुवाच सुतं प्रति ॥ क्रोधं मा कुरु बाल त्वमस्माकं धर्मतः पिता ॥ २९ ॥ देवशर्मा स्वयं स्वामी देहस्यास्य न संशयः ॥ अन्नदाता भयत्राता रक्षकः पोषकस्तथा ॥ ३० ॥ गोमहिष्यादिकं सर्वं मानवानां धनं स्मृतम् ॥ अजादिकं गजांतं च सर्वं मानवसात्कृतम् ॥ ३१ ॥ भ्रातरस्तव तातश्च मातुलास्तव बांधवाः ॥ तेन संवर्धिता नूनं पालिताः पोषिताश्चिरम् ॥ ३२ ॥ यद्यत्कर्म करो विप्रस्तद्भवान्क्षन्तुमर्हति ॥ क्षंतव्यं तस्य सकलं शुभं वाप्यथवाऽशुभम् ॥ ३३ ॥ वृषभ उवाच ॥ ॥ बाल्ये मातुः पयः पीतं तेन बाल्यं गतं वयः ॥ इदानीं वनजेनाहं क्षिपामि दिवसान्किल ॥ ३४ ॥

झालेल्या देवशर्मा ब्राह्मणाला ह्या प्रमाणें दुःख भोगावें लागेल ॥ २८ ॥ असें मुलाचें भाषण ऐकून गाय मुलाला ह्मणते, छे छे, असें करूं नको; तो आपला धर्माचा बाप आहे. त्याजवर रागाऊं नको ॥ २९ ॥ देवशर्मा ब्राह्मण या देहाचा मालक आहे. अन्न देणारा, भयापासून रक्षण करणारा, रक्षण करणारा व पोषण करणारा असल्यामुळें तो आपला मालक आहे ॥ ३० ॥ गाई, ह्मशी वगैरे जनावरें मनुष्यांचें धन आहे. शेळ्यांपासून तों हत्तीपर्यन्त सर्व जनावरें माणसांच्या स्वाधीन केलेलीं आहेत ॥ ३१ ॥ तुझे भाऊ, तुझा बाप, तुझे मामा, तुझे बांधव, हे सर्व ह्यानेंच वाढविले आहेत व त्यांचें पोषण ह्यानेंच केलें आहे ॥ ३२ ॥ हा ब्राह्मण जें जें करील तें तें सर्व तूं सहन कर, तो जें बरें वाईट करील तें सर्व तूं सहन करावें ॥ ३३ ॥ तो वृषभ ह्मणाला—लहानपणीं

त्वया यत्कथितं मातस्तन्मे तिष्ठतु मस्तके ॥ अहमेनं हनिष्यामि पापात्मानं वृथापतिम् ॥ ३५ ॥ आत्ममातुः पयः पीतं तृणं भुक्तं च कानने ॥ स्तनत्रयगतं दुग्धं तेन नीतं द्विजन्मना ॥ ३६ ॥ एकस्तनगतं दुग्धं मम मासमदात्खलु ॥ मासादूर्ध्वं न किमपि दुग्धं लब्धं तवानघे ॥ ३७ ॥ आघ्राणमात्रं विहितमापीनस्य मया शिवे ॥ तवालीढेन जीवामि केवलेन तृणेन वा ॥ ३८ ॥ अयं मया तु हंतव्यो यदि दुःखं प्रदास्यति ॥ प्रभाते सकलं मातः स्फुटं विदितमस्तु ते ॥ ३९ ॥ पशुमोक्षं विधायैव पश्चात्कर्म विधास्यति ॥ इति तस्य वचः श्रुत्वा जननी तनयं प्रति ॥ ४० ॥

मी आईचें दूध प्यालों व त्यामुळें माझें रक्षण झालें. आतां मी रानांत उगवलेल्या गवतादिकांवर उपजीविका करून दिवस घालवीत आहें ॥ ३४ ॥ आई, तूं जें मला सांगितलेंस तें मला शिरसामान्य आहे. पण मी ह्या ब्राह्मणाला तो अतिशय दुष्ट आहे ह्मणून मारणार ॥ ३५ ॥ मी माझे आईचें दूध प्यालों व रानांत उगवलेलें गवत खाऊन त्यावर उदरनिर्वाह केला. ह्या ब्राह्मणानें माझ्या आईच्या तीन सडांतलें दूध घ्यावें व मला फक्त एका सडांतील द्यावें ॥ ३६ ॥ एका सडांतील दूधसुद्धां एक महिनाभरच दिलें. महिन्यापुढें तर तें सुद्धां मला मिळालें नाहीं ॥ ३७ ॥ केवळ तुझ्या कासेचें अवघ्राण मला मिळत होतें. माझी उपजीविका गवतावरच झाली ॥ ३८ ॥ हा मला दुःख देणारा ह्मणून त्याचा नाश केला पाहिजे. सकाळीं तुला सर्व कळेल ॥ ३९ ॥ सकाळीं तो गुरें सोडितो व नंतर आपलीं कामें करितो. असें त्या

उवाच वत्स जानासि पापपुण्यविनिर्णयम् ॥ ब्रह्म-
हत्योद्भवं पापं तव तीव्रं भविष्यति ॥ ४१ ॥ ब्रह्महा
नरकान्याति तामिस्रादीननेकशः ॥ तस्माद्विप्रो न हं-
तव्यो जानता स्वहितं वृथा ॥ ४२ ॥ तथा भगवताऽ-
प्युक्तं कृष्णेन यादवान् प्रति ॥ घ्नंतः शपंतः परुषं वदंत-
स्तथापि विप्राः शिरसा नमस्याः ॥ ४३ ॥ प्रत्यक्षमे-
तत्पश्य त्वमीश्वरं ब्रह्मघातिनम ॥ भ्रमंतं सर्वतीर्थानि
द्वादशाब्दानि भूतले ॥ ४४ ॥ तथापि न पतत्येत-
त्कपालं दंडलंबितम् ॥ तस्माद्वधपरं कर्म न कर्तव्यं
त्वया सुत ॥ ४५ ॥ वृष उवाच ॥ त्वद्भक्त्या सकलं
मातर्जानामि सचराचरम् ॥ नासिकेऽहं गमिष्यामि
तत्र पापं हि गच्छति ॥ ४६ ॥

मुलाचें भाषण ऐकून ती गाय त्याला ह्मणाली ॥४०॥ मुला, तुला सर्व पापपुण्य कळतेंच आहे. तूं जर या ब्राह्मणाला मारशील तर तुला ब्रह्महत्येचें पातक लागेल ॥ ४१ ॥ ब्रह्महत्या करणारा तामिस्रादि अनेक नरकांत जातो. करितां ज्याला आपलें स्वहित साधावयाचें असेल त्यानें ब्रह्महत्या करूं नये ॥ ४२ ॥ ह्मणूनच प्रत्यक्ष कृष्णानें यादवांना उपदेश केला कीं, ब्राह्मणांनीं जरी ताडण केलें, शिव्या दिल्या, शाप दिला, तथापि ते वंद्यच मानून त्यांना नमस्कार करावा ॥ ४३ ॥ प्रत्यक्ष तूंच पहा कीं, शंकरानें ब्रह्मदेवाचा शिरच्छेद केल्यामुळें त्यांना ब्रह्महत्या लागली, व तें पाप दूर होण्याकरितां त्यांनीं आज बारा वर्षें पृथ्वीवरील सर्व तीर्थयात्रा केली ॥ ४४ ॥ असें असूनही अद्यापि दंडावर ठेविलेलें कपाल पडत नाहीं, ह्मणून तूं असें पातक करूं नये ॥ ४५ ॥ वृषभ ह्मणतो, तुझ्या भक्तीनें मला स्थावरजंगम ब्रह्मांडाची सर्व माहिती

अरुणावरुणयोर्मध्ये यत्र प्राची सरस्वती ॥ तत्र स्नात्वा च पीत्वा च ब्रह्महत्या गमिष्यति ॥ ४७ ॥ अयं सर्वेश्वरः साक्षात् तमोगुणमयः सदा ॥ क्रोधातिशयपूरेण मंदबुद्धिः स्मृतिर्नहि ॥ ४८ ॥ लोकशिक्षार्थमेवास्य कर्म जातं च नान्यथा ॥ अयं तु ब्रह्महत्यानां भक्षकः परिकीर्तितः ॥ ४९ ॥ एवं वदंतं तनयं माता धिक्कृत्य साऽब्रवीत् ॥ गच्छ त्वं दूरतः पुत्र मम वाक्यविहिंसकः ५० पापेभ्यस्ते भयं नास्ति यथेच्छसि तथा कुरु ॥ यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ॥ ५१ ॥ स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्त्तते ॥ स्वर्गो वा नरको वापि भूमिस्थैर्न विलोक्यते ॥ ५२ ॥

आहे, मला जरी ब्रह्महत्या लागली तथापि मी नासिक क्षेत्रीं जाईन ॥ ४६ ॥ अरुणा वरुणेच्या मध्यभागीं, जेथें पूर्ववाहिनी सरस्वती आहे, तेथें स्नान पान केल्यानें ब्रह्महत्येसारखें पातक नष्ट होतें ॥ ४७ ॥ श्रीशंकर तमोगुणविशिष्ट असल्यामुळें व अतिशय रागीट असल्यामुळें मंदबुद्धी आहे आणि ह्मणून हा नासिक क्षेत्राचा महिमा त्यांचे स्मरणांत नाहीं ॥ ४८ ॥ आणि त्यांतून शंकरानें जें कृत्य केलें तें केवळ लोकांना वळण लागावें ह्मणून उपदेशाकरितां केलें, नाहींतर शंकर ह्मणजे सर्व पातकांचा नाश करणारे आहेत ॥ ४९ ॥ ह्याप्रमाणें बोलणाऱ्या मुलाचा आईनें धिःकार केला व ह्मणाली माझें न ऐकणारा जो तूं मजपासून दूर हो ॥ ५० ॥ तुला पापाची भीति नाहीं. जा तुला वाटेल तें कर. श्रेष्ठ लोक ज्याप्रमाणें वागतात त्याप्रमाणें इतर लोक वागतात ॥ ५१ ॥ श्रेष्ठ लोक जी गोष्ट प्रमाण मानतात, इतर लोकही त्यांचेंच अनुकरण करतात. स्वर्ग किंवा नरक प्रत्यक्ष कोणीही पाहिलीं नाहींत ॥ ५२ ॥

विदुषां वचनादेव सर्वेषां संस्थितिः परा ॥ त्वं मामु-
ल्लंघ्य चेत्कर्म कर्तुमिच्छसि निंदितम् ॥ त्वमेव तत्फलं
भोक्ता मम किंचिन्न विद्यते ॥ ५३ ॥ एवं तयोर्गोवृ-
षयोर्वदतोः शर्वरी गता ॥ एतद्वाक्यं हरः शृण्वन्मु-
दमाप परां तदा ॥ ५४ ॥ प्रातःकाले च संजाते देव-
शर्मा बबंध तम् ॥ विमुच्याथ पशून्सर्वान् गोपालमि-
दमब्रवीत् ॥ ५५ ॥ त्वमेनं सुदृढैः पाशैर्बध्वा तिष्ठ म-
मांतिके ॥ नासाबंधं विधास्यामि काष्ठकीलेन सांप्रतम्
॥ ५६ ॥ एवमुक्त्वा मुखं धृत्वा यावत्कीलः करे धृतः ॥
तावत्स वृषभः क्रुद्धः क्षणात् पाशानमोचयत् ॥ ५७ ॥
त्रोटयित्वा दृढं पाशं जघान जठरे द्विजम् ॥ वृषभस्ती-
क्ष्णशृंगेण देवशर्माणमाशु सः ॥ ५८ ॥

केवळ शहाण्यांच्या वचनांवरच सर्व स्थिति अवलंबून आहे. माझी आज्ञा उल्लंघन करून तूं निंद्यकर्म करण्यास प्रवृत्त झाल्यास त्याचें फळ तुलाच भोगावें लागेल. माझें त्यांत कांहीं जात नाहीं ॥ ५३ ॥ ह्याप्रमाणें त्या गाई बैलाचें भाषण होतां होतां ती रात्र निघून गेली. तें उभयतांचें भाषण ऐकून शंकरांना फार आनंद झाला ॥५४॥ सकाळीं देवशर्म्यानें त्याला बांधलें. इतर सर्व पशूंना सोडून, त्यानें गुराख्याला आज्ञा केली ॥ ५५ ॥ तूं ह्या गोऱ्ह्याला चांगला बळकट चराटांनीं बांधून माझेसमोर उभा राहा. मी लांकडाच्या खुंटीनें ह्याला वेसण घालतों ॥५६॥ असें बोलून ब्राह्मणानें हातांत खिळा घेतला, तोंच तो बैल अतिशय रागावला. त्यानें ते दोर ताबडतोब तोडिले ॥ ५७ ॥ पाश तोडून आपल्या तीक्ष्ण शिंगांनीं त्या देवशर्मा ब्राह्मणाचे पोटांत मारिलें ॥ ५८ ॥

जठरादन्त्रजालानि पतितानि क्षणाद्बहिः ॥ तावत्स पतितो विप्रो गतप्राणः क्षणादभूत् ॥ ५९ ॥ वृषभः श्यामरूपोभूत् ब्रह्महा पातकी क्षणात् ॥ अवलोक्य निजं देहं श्यामरूपं सुदुःखितः ॥ ६० ॥ ततो जगाम वेगेन पृष्ठं यातो महेश्वरः ॥ स वृषो नासिकं गत्वा सरस्वत्याः समीपतः ॥ ६१ ॥ गंगां प्रविश्य सुस्नातो रामपादौ ननाम सः ॥ तत्क्षणादेव देहस्तु चंद्रमंडल-संनिभः ॥ ६२ ॥ बभूव मुनिशार्दूल तेजस्वी बलवान् वृषः ॥ तदाश्चर्यं महद्दृष्ट्वा शिवोपि संगमं गतः ॥ ६३ ॥ तत्र स्नानं विधायैव गतः पंचवटीं प्रति ॥ रामपादौ नमस्कृत्य यावद्याति बहिस्ततः ॥ ६४ ॥ तावत्कपाल-मपतद्दंडाग्राद्भुवि तत्क्षणे॥ततो देवाः सगंधर्वा ब्रह्माद्याः सगणा ययुः ॥ ६५ ॥

तात्काल त्या ब्राह्मणाचीं आंतडीं बाहेर आलीं, व तो देवशर्मा ब्राह्मण एका क्षणांत मृत झाला ॥ ५९ ॥ त्या बैलाचा देहही तावडतोब काळा ठिक्कर पडला. आपला देह कृष्णवर्ण झालेला पाहून त्या बैलाला अतिशय वाईट वाटलें ॥ ६० ॥ तेथून तो बैल मोठ्या वेगानें निघाला, तोंच शंकरानेंही त्याच्या पाठोपाठ गमन केलें. तो बैल नासिक क्षेत्रीं आला, व सरस्वतीच्या सन्निध गेला ॥ ६१ ॥ तेथें त्यानें गंगास्नान केलें. नंतर, श्रीरामाचें दर्शन घेतलें. श्रीरामाला नमस्कार केल्यावरोबर बैलाचा देह चंद्र-बिंबासारखा स्वच्छ झाला ॥ ६२ ॥ हे मुनिश्रेष्ठा, तो बैल अत्यंत तेजस्वी व बलवान् झाला; तें आश्चर्य पाहून शंकरानेंही संगमावर गमन केलें ॥ ६३ ॥ तेथें स्नान करून पंचवटींत जाऊन श्रीरामाचें दर्शन घेऊन, शंकर बाहेर आले ॥६४॥ तों त्यांचें कपाल त्यांच्या काठीच्या टोंकापासून खालीं पडलें. तेव्हां सर्व देव, गंधर्व आप-

शंभोः शिरसि पुष्पाणां वृष्टिर्निपतिता तदा ॥ ईशोऽपि चंद्रधवलो दिव्यदेहो बभूवह ॥ ६६ ॥ कपालं पतितं दृष्ट्वा जगत्सर्वं मुदं ययौ ॥ विष्णुस्तत्र स्वहस्तेन कपालेश्वरसंज्ञकम ॥ ६७ ॥ स्थापयित्वा महादेवमिदं वचनमब्रवीत् ॥ विष्णुरुवाच ॥ पश्चिमाभिमुखं लिंगं नंदिना परिवर्जितम् ॥ ६८ ॥ महासिद्धिप्रदं नृणां भुक्तिमुक्तिकरं महत् ॥ भविष्यति जगत्पूज्यं कोटिहत्याविनाशनम् ॥ ६९ ॥ आदौ पंचवटी महाक्षितितले पुण्या ततो गौतमी तत्तीरे च कपालमिंदुधवलं धात्रा स्वयं स्थापितम् ॥ श्रीरामेण जगद्धिताय हरिणा सेंद्रैः सुरैर्वंदितं सर्वेभ्योऽधिकमस्ति तत्क्षितितले श्रीकंठरूपं परम ॥७०॥ इति श्रीपद्मपुराणे नासि० पंच० मा० कपालेश्वरनिरूपणं नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ ॥ ॥

आपल्या गणासुद्धां तेथें आले ॥ ६५ ॥ शंकराच्या मस्तकावर पुष्पवृष्टि झाली व शंकरांचा देह चंद्रासारखा पांढऱ्या रंगाचा दिव्य झाला ॥६६॥ कपाळ पडलेलें पाहून सर्व जगाला अतिशय आनंद झाला. विष्णूनें तेथेंच स्वहस्तानें कपालेश्वर नांवाच्या शंकराची स्थापना केली व महादेवाला ह्मणाले ॥ ६७ ॥ विष्णू ह्मणतात–हें कपालेश्वराचें लिंग नंदीविरहित असून पश्चिमाभिमुख आहे ॥ ६८ ॥ हें महासिद्धि देणारें आहे. मनुष्यांना भुक्तिमुक्ति देणारें असून हें सगळ्या जगांत परम पूज्य होईल व कोट्यावधी हत्येचें पातक ह्याचे दर्शनानें नष्ट होईल ॥६९॥ प्रथम पंचवटी हें पुण्यस्थान आहे. त्यानंतर गौतमी गोदावरी ही विशेष पुण्यदायक, तिच्या तीरावर प्रत्यक्ष विष्णूनें स्थापन केलेलें चंद्राप्रमाणें स्वच्छ असें श्रीकपालेश्वराचें लिंग त्यांचेपेक्षांही पुण्यकारक आहे. ह्या लिंगाला इंद्रप्रभृती देव, श्रीरामसुद्धां वंद्य मानतात. त्यामुळें ह्या पृथ्वीतळावर श्रीकपालेश्वराचें लिंग हें अतिशय पुण्यकारक व श्रेष्ठ आहे ॥ ७० ॥ इति श्रीकपालेश्वरमहिमावर्णनं द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ ॥ ॥ ॥

॥ अथ कपालेश्वरदर्शनमाहिमा वर्ण्यते ॥ मार्कंडेय उवाच ॥ अत्र पूजा प्रकर्त्तव्या यथाशक्त्या महामुने ॥ जायते कोटियज्ञानां फलं तस्य न संशयः ॥ १ ॥ सर्वेभ्योऽप्यधिका काशी ततः पंचवटी स्मृता ॥ कपालेश्वरसंज्ञं तु ततोऽप्यधिकमुच्यते ॥ २ ॥ नवक्रोशात्मकं लिंगं त्र्यंबकस्य प्रतिष्ठितम् ॥ कपालेश्वरलिंगस्य ब्रह्माद्रिरपि दर्शनम् ॥ सर्वदा कुरुते देवत्र्यंबकोऽपि जगद्गुरुः ॥ ३ ॥ त्रैलोक्ये सर्वदेवानां प्रभुः श्रेष्ठो महेश्वरः ॥ ब्रह्माद्रिः सोऽपि सततं कपालेश्वरमर्चति ॥ ४ ॥ सर्वेषामेव लोकानां महापातकिनामपि ॥ पातकानां विनाशं च ब्रह्माद्रिः कुरुते सदा ॥ ५ ॥ कपालेश्वरमालोक्य सर्वं दहति पातकम् ॥ अतः कपालेश्वरलिंगदर्शनं करोति यः स्नाति च गौतमीतटे ॥ तत्पुण्यसंख्यां जगतां विधाता शक्तो न वक्तुं किमुतान्यवार्ता ॥ ६ ॥

श्रीकपालेश्वराचें माहात्म्यवर्णन मार्कंडेय सांगतात—मुनिवर्या ! जो कोणी यथाशक्ति कपालेश्वराची पूजा करील त्याला निःसंशय कोटि यज्ञ केल्याचें फल मिळेल ॥ १ ॥ सर्व क्षेत्रांत काशी हें श्रेष्ठ आहे. त्याहीपेक्षां पंचवटी अधिक श्रेष्ठ आहे, व कपालेश्वराचें स्थान तर अतिशयच श्रेष्ठ आहे ॥२॥ त्र्यंबकेश्वराचें लिंग ९ कोशाचें आहे. ब्रह्माद्रिपर्वत व जगद्गुरु त्र्यंबकेश्वर कपालेश्वराचें निरंतर दर्शन घेतात ॥ ३ ॥ त्रिभुवनांत सर्व देवांमध्यें महेश्वर श्रेष्ठ आहे. तो महेश्वर व ब्रह्माद्रि सतत कपालेश्वराची पूजा करितात ॥ ४ ॥ सर्व प्रकारच्या पातक्यांचें पातक ब्रह्माद्रि सदोदित नष्ट करितो ॥ ५ ॥ पण हें सामर्थ्य ब्रह्माद्रीस येण्याचें कारण तो नित्य कपालेश्वराचें

कपालेशस्य माहात्म्यं ह्यनंतो वेत्ति कोऽपि न ॥
तथापि किंचिद्वक्ष्यामि शृणु त्वं मुनिसत्तम ॥ ७ ॥
ब्रह्मांडे यानि तीर्थानि यानि लिंगानि संति हि ॥
कपालेश्वरलिंगस्य कलां नार्हंति षोडशीम् ॥ ८ ॥
कोटियज्ञविधानेन कोटिलिंगार्चनेन तु ॥ नरो यत्फल-
माप्नोति तत्कपालेशदर्शनात् ॥ ९ ॥ दृष्ट्वा कपालेश्वर-
लिंगमग्र्यं नरो यदाप्नोति फलं पवित्रम् ॥ न तत्फलं
सागरयुक्तमेदिनीं दत्त्वा द्विजाग्र्याय रवेर्ग्रहेऽपि ॥१०॥
तिस्रः कोट्योर्धकोट्यश्च तीर्थानि वायुरब्रवीत् ॥ तेषु
स्नानेन यत्पुण्यं तत्कपालेशदर्शनात् ॥ ११ ॥

दर्शन घेतो हें आहे. ह्मणून गौतमीचे तीरावर राहून गंगेंत स्नान करून जो कपालेश्वर लिंगाचें दर्शन घेतो, त्याच्या पुण्याचें वर्णन करण्यास इंद्रसुद्धां समर्थ नाहीं. तर बाकीच्या देवांची काय कथा ॥ ६ ॥ कपालेश्वराचें माहात्म्य अनंतप्रभूलाच माहीत आहे. दुसरे कोणालाही माहीत नाहीं. तथापी मी थोडें सांगतों तें तूं ऐक ॥ ७ ॥ ब्रह्मांडांत जितकीं तीर्थें आहेत व जेवढीं लिंगें आहेत तीं सर्व कपालेश्वर लिंगाच्या सोळाव्या कलेचीही बरोबरी करीत नाहींत ॥ ८ ॥ कोटि लिंगार्चन केल्यानें व कोटियज्ञ केल्यानें जें पुण्य मिळतें तें पुण्य कपालेश्वरदर्शनानें मिळतें ॥ ९ ॥ श्रेष्ठ आणि पवित्र अशा कपालेश्वर लिंगाच्या दर्शनानें जें पुण्य मिळतें, त्याची बरोबरी सूर्यग्रहण पर्वणीच्या दिवशीं सागरवेष्टित पृथ्वीचें दान ब्राह्मणास केल्यानें मिळणारें पुण्यही करूं शकत नाहीं ॥ १० ॥ वायूनें साडेतीन कोटी तीर्थें आहेत असें सांगितलें आहे. त्या सर्व तीर्थांचें स्नान केलें असतां जें पुण्य मिळतें, तितकें पुण्य कपाले-श्वराच्या दर्शनानें मिळतें ॥ ११ ॥

कपालेश्वरलिंगस्य महिम्नोंतो न विद्यते ॥ दृष्ट्वा द्वादशलिंगानि नरो यत्फलमश्नुते ॥१२॥ यत्फलं शतधा प्रोक्तं श्रीकपालेशदर्शनात् ॥ आजन्मतस्तिष्ठति काशिकायां पुण्यानि कुर्वन् पवनाशनः सन् ॥ स यत्फलं पश्यति तत्सहस्रधा स्थित्वा कपालेश्वरसंनिधौ क्षणम् ॥ १३ ॥ कपालेश्वरदेवस्य संनिधौ क्रियते नरैः ॥ जपयज्ञादिकं किंचित्तदनंतफलं स्मृतम् ॥ १४ ॥ एतद्भजनमात्रेण वांछितं लभते नरः ॥ सर्वे रोगाः क्षयं यांति कपालेश्वरदर्शनात् ॥ १५ ॥ अत्र ते कथयिष्यामि कथामेकां पुरातनीम् ॥ यां श्रुत्वा मुच्यते पापात्कोटिजन्मसमुद्भवात् ॥ १६ ॥

कपालेश्वर लिंगाच्या माहात्म्याचा अंत नाहीं. बारा लिंगांच्या दर्शनानें मनुष्याला जें फल मिळतें ॥ १२ ॥ त्यापेक्षां शंभरपट पुण्य कपालेश्वराच्या दर्शनानें मिळतें. आजन्म काशीक्षेत्रांत वायू भक्षण करून जो राहतो व पुण्यकृत्य करितो, त्यास मिळणाऱ्या फलाच्या सहस्रपट अधिक पुण्य, एक क्षण कपालेश्वरलिंगाच्या समोर राहिल्यानें मिळतें ॥ १३ ॥ कपालेश्वर लिंगाच्या समोर मनुष्यांनीं जप, यज्ञादि कर्में केलीं असतां त्यांना अनंतफलाची प्राप्ति होते ॥ १४ ॥ कपालेश्वराच्या भजनानें इष्ट अर्थाची प्राप्ति होते व सर्व रोगांचा नाश होतो ॥ १५ ॥ ह्याविषयींची पुरातन एक कथा आहे ती मी सांगतों; म्हणून मार्कंडेयानें सांगण्यास आरंभ केला. ती पुरातन कथा कोटि जन्मांच्या पातकांचा नाश करणारी आहे ॥१६॥

अनंतशयने पूर्वं ब्राह्मणोऽभून्महाधनः ॥ स दीक्षित
इति ख्यातो नाम्नां वेदांतपारगः ॥ १७ ॥ दैवात्तस्य
शरीरे तु व्याधिः प्राप्तो महात्मनः ॥ द्रव्यं च तस्करै-
र्नीतं शरीरं कृशतां गतम् ॥ १८ ॥ न शक्तिर्वर्त्तते
तस्य शरीरे मुनिसत्तम ॥ श्वासकासादिकं तस्य बभूव
विपुलं मुने ॥ १९ ॥ एकः सुतस्तस्य बभूव भार्याद्वयं
च कन्यात्रयमेव बंधोः ॥ रोगेण देहे परिपीडितोऽभूद्दा-
रिद्र्यदुःखेन विशेषतश्च ॥ २० ॥ एवं हि वर्त्तमानस्य
बहवो दिवसा गताः ॥ कदाचिन्नासिकस्थानाद्ब्रह्मणो
वेदपारगः ॥ २१ ॥ विष्णुशर्मा महाप्राज्ञः सर्वशास्त्रार्थ-
कोविदः॥कुर्वन् दक्षिणतीर्थानि दैवादत्र समागतः॥२२॥

अनंतशयन नांवाचे गांवीं पूर्वी एक श्रीमान दीक्षित ब्राह्मण रहात असे. त्याचें नांव वेदांतपारग हें होतें ॥ १७ ॥ दुर्दैवानें त्याचे शरिराला व्याधी उत्पन्न झाली. त्याचें द्रव्य चोरांनीं चोरून नेलें. त्याचें शरीर अतिशय कृश झालें ॥ १८ ॥ हे मुनिश्रेष्ठा, त्याचें शरीर दिवसेंदिवस अतिशय अशक्त झालें. त्याला कफ खोकला इत्यादि रोग उत्पन्न झाले ॥ १९ ॥ त्याला एक मुलगा होता. त्याला दोन बायका होत्या. त्याच्या भावाला तीन मुली होत्या. त्याचें शरीर रोगानें अतिशय पीडित झालें होतें व त्याला दारिद्र्याचें दुःख अतिशय होत होतें ॥ २० ॥ ह्याप्रमाणें पुष्कळ दिवस गेले. एके दिवशीं एक वेदशास्त्रसंपन्न विष्णुशर्मा नांवाचा ब्राह्मण, दक्षिणेकडील तीर्थयात्रा करीत करीत नासिक क्षेत्राहून अनंतशयन ( आनंदवल्ली ) गांवीं आला ॥ २१ ॥ २२ ॥

अनंतशयनं दृष्ट्वा स विप्रो मुदमाययौ ॥ तत्र तीर्थ-
विधिं कृत्वा मासमेकमुवास ह ॥ २३ ॥ कदाचिद्दे-
वयात्रार्थं गच्छता विष्णुशर्मणा ॥ दीक्षितो वीक्षितस्तेन
ददर्श विमलं तदा ॥ २४ ॥ दीक्षितो विष्णुशर्माणं
प्रणिपत्य वचोऽब्रवीत् ॥ दीक्षित उवाच ॥ भवंतः
पुण्यरूपा हि दिव्यदेहाः सुवर्चसः ॥ भवतां क स्थितिः
का च देवता सेव्यते सदा ॥ २५ ॥ धनं मे तस्करैर्नीतं
गृहं दग्धं च वह्निना ॥ व्याधिश्च बलवान्देहे कुटुंबं वर्त्तते
भृशम् ॥ २६ ॥ केनोपायेन मे शांतिः कथ्यतां यदि बुध्यते ॥
विष्णुशर्मोवाच ॥ शृणु दीक्षित वक्ष्यामि तव लोक-
हिताय च ॥ २७ ॥

अनंतशयन गांव पाहून त्या विष्णुशर्मा ब्राह्मणाला मोठें समाधान वाटलें. तेथें तीर्थविधी करून एक महिनाभर तो तेथेंच राहिला ॥ २३ ॥ एके दिवशीं देवयात्रेकरितां विष्णुशर्मा निघाला असतां दीक्षिताची गांठ पडली ॥२४॥ दीक्षितानें विष्णुशर्म्याला नमस्कार करून तो त्याला म्हणाला—महाराज ! आपण मोठे पुण्यवान्, तेजस्वी व दिव्य देहधारी आहांत. आपला गांव कोणता व आपली उपास्यदेवता कोणती ? ॥ २५ ॥ माझें सर्व द्रव्य चोरांनीं हरण केलें. घर जळालें, माझ्या शरीराला भयंकर रोग उत्पन्न झाला आहे. घरीं कुटुंब मोठें आहे ॥ २६ ॥ काय करूं महाराज ! काय उपाय केला असतां मला शांतता मिळेल. आपणांस एखादा उपाय माहित असल्यास कृपा करून सांगावा. विष्णुशर्मा ब्राह्मण म्हणाला—हे दीक्षित ! तुमच्या व लोकांच्या हिताकरितां मी एक उपाय सांगतों ॥ २७ ॥

नासिके सर्वदेवानां कपालेश्वरसंज्ञकः ॥ स्तोत्रं तस्य महापुण्यं विष्णुना निर्मितं पुरा ॥ २८ ॥ दुर्लभं सर्वलोकेषु सर्वकामफलप्रदम् ॥ तत्ते नूनं प्रवक्ष्यामि सर्वसिद्धिकरं नृणाम् ॥ २९ ॥ कपालेशस्य महिमा वर्णितुं केन शक्यते ॥ तस्य स्तोत्रं परं गुह्यं तव दास्यामि तत्पठ ॥ सर्वरोगहरं पुण्यं श्रीपुष्टिदमनुत्तमम् ॥ ३० ॥ कामना तेऽपि पूर्णा स्यान्मम वाक्यान्न संशयः ॥ दुर्लभं परमं पुण्यं भुक्तिमुक्तिप्रदं भुवि ॥ ३१ ॥ ॥ अथ स्तोत्रम् ॥ ॥ श्रीमत्कपालेश्वर देवदेव दासोस्म्यहं ते शरणागतोऽस्मि ॥ पापानि दुःखानि च नाशय त्वमनेकजन्मांतरसंचितानि ॥ १ ॥

नासिक क्षेत्रांत एक कपालेश्वर नांवाचें महास्थान आहे. त्याचें महापुण्यकारक स्तोत्र विष्णूनें केलें आहे ॥ २८ ॥ तें सर्व लोकांमध्यें दुर्लभ आहे, व सर्व कामना परिपूर्ण करणारें आहे. तें सर्व कार्यसिद्धि करणारें स्तोत्र तुला कथन करितों ॥ २९ ॥ कपालेश्वराचा महिमा वर्णन करण्यास कोण समर्थ आहे. त्या देवाचें स्तोत्र अत्यंत गुप्त आहे. पण तें तुला सांगतों. त्याचा तूं पाठ कर. तें सर्व रोगांचा नाश करणारें आहे, पुण्यकारक आहे, पुष्टि देणारें आहे व ह्यापेक्षां दुसरें श्रेष्ठ स्तोत्र नाहीं ॥ ३० ॥ तुझी ही इच्छा माझ्या वचनावरून निःसंशय पूर्ण होईल. हें स्तोत्र दुर्लभ, परम पुण्यकारक व भुक्तिमुक्ति देणारें आहे ॥ ३१ ॥ तें स्तोत्र ह्याप्रमाणें—हे देवदेवा, कपालेश्वरा, मी तुझा दास असून तुला अनन्य भावानें शरण आलों आहें. तूं माझ्या अनेक जन्मांत संचित केलेल्या पातकांचा नाश कर ॥ १ ॥

त्वं देवदेवः पुरुषः पुराणस्त्वामाद्यमाहुः कवयः समस्ताः ॥ त्वमेव धाता जगतां विधाता संहारकर्त्ता परिपालकस्त्वम् ॥ २ ॥ कल्याणकर्ता विपदां निहन्ता संपत्प्रदाता करुणाकरश्च ॥ त्वत्पादपद्मप्रणता नरा ये भवंति ते नाथ सतां शरण्याः ॥ ३ ॥ त्वन्नाममात्रस्मरणेन पुंसां विलीयते पातकिपातकावलिः ॥ के न त्वया नाथ महेश मोचिता दुःखार्णवात्त्वत्सदृशो न विद्यते ॥ ४ ॥ त्रातुं भवाब्धेः शरणागतं जनं सुरेश मां रक्ष जगत्प्रियंकर ॥ पुरा त्वया देवगणाः समस्ताः प्रपीडिताः पूर्वसुरैर्यथेष्टम् ॥ ५ ॥ संरक्षिता दैत्यवरान्निहत्य संग्रामभूमौ त्रिपुराणि दग्ध्वा ॥ विष्णुस्त्वमीशः कमलासनश्च जिष्णुः शशी भास्करनामधेयः ॥ महीस्थलं प्राप्य महांश्च वायुर्व्योमापि कालश्च दिशश्च सर्वाः ॥६॥

सर्व कवी तुला पुराणपुरुष ह्मणतात. तूंच ह्या जगाची उत्पत्ति, संरक्षण व नाश करणारा आहेस ॥ २ ॥ तूं कल्याण करणारा, विपत्तींचा नाश करणारा, संपत्ति देणारा, करुणा करणारा आहेस. जे तुझ्या पायांचे दास होतात ते दुसऱ्याला शरण जाण्यास योग्य होतात ॥ ३ ॥ तुझे नामाचें स्मरण केलें असतां, पातकी लोकांच्या पातकांच्या पंक्ती नाश पावतात. जगांत हे नाथ, तूं कोणाला मुक्त केलें नाहींस ? ह्मणून जगांत दुःखसमुद्रांतून सोडविणारा तुझ्यासारिखा दुसरा कोणी नाहीं ॥ ४ ॥ माझें संसारसमुद्रांतून रक्षण करावें ह्मणून मी तुला शरण आलों आहें. जगाचें प्रिय करणारे देवा, माझें तूं रक्षण कर. पूर्वीच्या दैत्यांनीं यथेच्छ त्रस्त केलेल्या सर्व देवांचें, दैत्यांचा नाश करून व त्रिपुर दग्ध करून तूं संरक्षण केलेंस ॥५॥ विष्णु तूंच आहेस. चंद्र,

सर्वं त्वमेवासि न किंचिदस्ति त्वत्तोन्यदाभाति हत-प्रभं न ॥ त्वामेव सर्वं परिपूर्णरूपं जानंति देवाः कपिलादयोऽपि ॥ ७ ॥ ॐकारवाच्योऽसि सनातनोऽसि सर्वाद्यदेवः शशिचूडनामा ॥ कपालमाली च पिनाक-हस्तस्त्रिशूलखट्वांगधरो महेशः ॥ ८ ॥ उमापतिः पंचवटीनिवासी गंगाधरः पापहरो विधाता ॥ स्मरस्य हर्त्ता त्रिदिवस्य कर्त्ता सनातनस्त्वं पुरुषोत्तमोऽसि ॥ ९ ॥ त्वां ये भजंतः पुरुषं पुराणं ते मुक्तिमार्गस्य सतां प्रद-र्शकाः ॥ भवंति नाके गुरवो जगत्पते नमोऽस्तु ते शंकर ते नमोऽस्तु ॥१०॥ इति स्तुतोऽसौ हरिणा दयालुर्ज-गत्त्रयस्यापि वरप्रदोऽभूत् ॥ यद्यद्धरे वांछसि तत्समस्तं करे स्थितं पश्यसि मत्प्रसादात् ॥ ११ ॥

सूर्य, इंद्र, सर्व जगाला व्यापणारा वायू, काळ व सर्व दिशा तूंच आहेस ॥ ६ ॥ जगांत सर्व तुझेंच रूप आहे. तुझ्याहून इतर कांहीं नाहीं. कपिलादिक देव तुलाच पूर्ण रूप मानतात ॥ ७ ॥ ओंकार वाचक, सनातन, सर्वांत आद्यदेव, चंद्रशेखर नाम धारण करणारा, कपाल-माली, पिनाक धनुष्य धारण करणारा, त्रिशूळ व खट्वांग धारण करणारा, महेश, ॥ ८ ॥ उमापति, पंचवटीवासी, गंगाधर, पाप-हरण करणारा, जग उत्पन्न करणारा, मदनाचा नाशक, त्रिभु-वनाचा कर्ता, सनातन व पुरुषोत्तम आहेस ॥ ९ ॥ पुराणपुरुष जो तूं त्या तुला जे भजतील ते सत्पुरुषांना मुक्तिमार्गाचे दर्शक होतात. तसेंच ते स्वर्गांत गुरु होतात. हे जगत्पते! तुला नमस्कार असो. हे शंकरा, तुला नमस्कार असो ॥ १० ॥ ह्याप्रमाणें विष्णूनें स्तवन केल्यानंतर दयाळु शंकर त्रिभुवनाला वरप्रद झाले, आणि

कपालेशो वरं दत्वा तत्रैवान्तर्बभूवह ॥ विष्णुरेवं वरं प्राप्य सोऽपि चांतर्दधे पुनः ॥ १२ ॥ दीक्षितोऽपि कपालेशस्तोत्रं प्राप्य द्विजोत्तमात् ॥ जजाप परया भक्त्या षण्मासं विजितेंद्रियः ॥ १३ ॥ त्रिकालं पाप्मना मुक्तो राज्ञापि बहुमानितः ॥ ग्रामाणां दशकं दत्तं समृद्धश्चातिवीर्यवान् ॥ १४ ॥ इत्थं कपालेश्वरपादपंकजद्वयस्य भक्तेर्महिमा निरूपितः ॥ शृणोति यः श्रावयते परान् स प्राप्नोति कामान् सकलानभीष्टान् ॥ १५ ॥ ४६ ॥ इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्ये कपालेश्वरस्तोत्रमाहात्म्यनिरूपणं नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ ॥ ॥ ॥

ह्मणाले—हे विष्णो, तुं जें जें इच्छिशील तें तें सर्व माझ्या प्रसादानें सिद्धीस जाईल ॥ ११ ॥ ह्याप्रमाणें कपालेश्वरानें वर देऊन ती मूर्ती तेथेंच गुप्त झाली. विष्णूला हा वर मिळाल्यानंतर विष्णुही तेथेंच गुप्त झाले ॥ १२ ॥ दीक्षितालाही विष्णुशर्मा ब्राह्मणापासून ह्याप्रमाणें स्तोत्र मिळाल्यानंतर त्यानें जितेंद्रिय होऊन सहा महिने मोठ्या भक्तीनें त्याचा जप केला ॥ १३ ॥ त्रिकाळ स्नानादिक करून जप केल्यामुळें तो पातकांतून मुक्त झाला. राजानें त्याचा फार सन्मान केला. त्याला दहा गांव इनाम दिले. असा तो ब्राह्मण ऐश्वर्यसंपन्न झाला ॥ १४ ॥ असा हा कपालेश्वराचे चरणकमलाचा महिमा वर्णन केलेला आहे. जो हा ऐकेल व ऐकवील त्याच्या सर्व इष्टार्थांची त्याला प्राप्ति होईल ॥ १५ ॥ इति कपालेश्वरमाहात्म्यनिरूपणं नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ ॥

॥ मार्कंडेय उवाच ॥ अधुना कथयिष्यामि विठ्ठलस्य कथानकम् ॥ कदाचित् सूर्यनगरात् ब्राह्मणा विष्णुसेवकाः ॥ गौतमीं स्नातुमायाता जीवे सिंहगते सति ॥ १ ॥ कपालेश्वरमागत्य चक्रुस्तीर्थविधिं द्विजाः ॥ अरुणासंगमप्रांते गालवस्याश्रमो महान् ॥ २ ॥ तत्र स्थित्वा विधिं चक्रुर्यथोक्तं मुनयः पुरा ॥ सप्तरात्रमतिक्रम्य गंतुकामान द्विजान्मुनीन् ॥ ३ ॥ उवाच गालवो विप्रो ब्राह्मणान् गंतुमुत्सुकान् ॥ अहमद्यैव गंतास्मि पांडुरंगस्य दर्शने ॥ ४ ॥ आषाढी निकटा याता वार्षिकं गमनं मम ॥ भीमा नदी पुण्यतमा विठ्ठलस्तत्र वर्त्तते ॥ ५ ॥ आषाढ्यामुत्सवस्तत्र भविष्यति महान् द्विजाः ॥ वैष्णवानां च सर्वेषां संगमस्तत्र जायते ॥६॥

मार्कंडेय सांगतात—आतां मी विठ्ठलाचा कथाभाग सांगतों ऐका. एकदां सिंहेचा गुरु असतां कोणी विष्णुभक्त ब्राह्मण सूर्यनगरापासून गोदावरीगंगेचें स्नान करण्यास आले ॥ १ ॥ कपालेश्वराजवळ येऊन त्यांनीं तीर्थविधी केला. अरुणेच्या संगमाजवळ गालवांचा मोठा आश्रम होता तेथें येऊन त्यांनीं यथाशास्त्र तीर्थविधी केला ॥ २ ॥ त्या मुनीनीं विधी केल्यानंतर सात रात्री तेथें राहून नंतर ते तेथून जाण्यास निघाले ॥ ३ ॥ तेव्हां तो गालव ब्राह्मण त्या ब्राह्मणांना म्हणाला—मी आज पांडुरंगाच्या दर्शनास जाणार आहें ॥ ४ ॥ आषाढी एकादशी जवळ आली आहे. माझा वार्षीक विठ्ठलाचे दर्शनास जाण्याचा नेम आहे. पुण्यकारक भीमेच्या कांठीं श्रीविठ्ठलाची मूर्ती आहे ॥ ५ ॥ हे ब्राह्मण हो, आषाढी एकादशीला तेथें मोठा उत्सव होणार आहे. तेथें सर्व

पुण्यक्षेत्रं पांडुरंगविठ्ठलस्य प्रकीर्तितम् ॥ इति तस्य वचः श्रुत्वा ब्राह्मणा मुनिमब्रुवन् ॥ ७ ॥ अपूर्वं वैष्णवक्षेत्रं विठ्ठलस्य मतं यदि ॥ अनुगृह्णीष्व चास्मासु वयं यास्यामहे मुने ॥ ८ ॥ अवश्यमिति तेनोक्ताः पर्जन्यो हि महानथ ॥ अतिवृद्धतमो विप्रो विश्वनाथोऽयमीक्षते ॥ अयं गंतुमशक्तोऽस्ति स्थापनीयोऽश्रमे मतिः ॥ ९ ॥ वायुर्बलीयान् पथि कर्दमश्च वृष्टिर्विशिष्टा विषमश्च पंथाः ॥ नूनं न वृद्धैर्गमनं विधीयते पर्जन्यकालः परमो विशिष्टः ॥ अनेन गंतुं कथमप्यशक्यं ममाश्रमे तिष्ठतु विश्वनाथः ॥ १० ॥ ततस्ते ब्राह्मणाः सर्वे साधु साध्विति चाब्रुवन् ॥ ११ ॥

वैष्णवांचा संगम होणार आहे ॥ ६ ॥ श्रीविठ्ठलपांडुरंगाचें तें महापुण्यक्षेत्र आहे. असें त्या गालव ब्राह्मणाचें भाषण ऐकून ते ब्राह्मण बोलावयास लागले ॥ ७ ॥ जर विठ्ठलाचें क्षेत्र अपूर्व आहे तर आम्हांवर कृपा करा, आम्हीही तुमच्याबरोबर येऊं ॥ ८ ॥ गालवानें सांगितलें ठीक आहे. पर्जन्य अतिशय पडतो आहे. हा विश्वनाथ ब्राह्मण अतिशय वृद्ध असून अशक्त आहे, म्हणून ह्याला बरोबर न घेतां ह्याला येथेंच ठेवावा असें मला वाटतें. असें गालव ब्राह्मण ह्मणाला ॥ ९ ॥ रस्त्यानें वारा फार आहे, चिखल फार, पाऊस अतिशय, वाट बिकट; म्हणून म्हातारे ह्या पर्जन्यकाळांत गमन करीत नाहींत. ह्या विश्वनाथ ब्राह्मणाच्यानें येववणार नाहीं. म्हणून ह्यानें माझ्या आश्रमांत राहावें ॥ १० ॥ नंतर ते सर्व ब्राह्मण म्हणाले ठीक आहे ॥ ११ ॥

तस्मिन्नेव क्षणे भुक्त्वा गालवाद्या महर्षयः ॥
प्रस्थितास्ते च संस्थाप्य वृद्धं तं ब्राह्मणोत्तमम् ॥ १२ ॥
तेषु यातेषु विप्रेषु विठ्ठलस्य पुरं प्रति ॥ परमं खेद-
मापन्नो विश्वनाथो जरत्त्वचः ॥ १३ ॥ निनिंद स
जरां वृद्धमात्मानं खिन्नमानसः ॥ किं नु पापं मया चीर्णं
वार्द्धक्यं येन चागतम् ॥ १४ ॥ विठ्ठलस्य कृपा नास्ति
येनाहमक्षमः कृतः ॥ दैवं हि बलवन्मन्ये नात्र कार्या
विचारणा ॥ १५ ॥ मत्तोऽपि बहवः संति वृद्धावृद्धतमा
नराः ॥ सुखेन यात्रां कुर्वंति गच्छंति पथि वेगतः ॥ १६ ॥
किंतु तावन्न भोक्ष्येहं यावद्रक्ष्यामि नो विभुम् ॥ इत्थं
विनिश्चयं कृत्वा निराहारो जितेंद्रियः ॥ १७ ॥ ध्यायन्
नक्तं दिवं तत्र विठ्ठलं क[illegible]विश्रुतम् ॥ एवं हि वर्त्तमानस्य
वृद्धस्यास्य द्विजन्मनः ॥ १८ ॥

नंतर सर्वांनीं भोजन करून विश्वनाथाला तेथेंच ठेवून प्रस्थान केलें ॥ १२ ॥ ह्याप्रमाणें सर्वांनीं पंढरपुरास प्रयाण केल्यानंतर, त्या म्हाताऱ्या विश्वनाथाला फार खेद झाला ॥ १३ ॥ त्यानें आपली व म्हातारपणाची अतिशय निंदा केली. मी काय पाप केलें कोण जाणे. कारण मला हें म्हातारपण आलें आहे ॥ १४ ॥ श्रीविठ्ठलाचीच कृपा नाहीं, म्हणून त्यानें मला अशक्त केलें. मला वाटतें, माझें नशीबच बलवत्तर आहे ॥ १५ ॥ माझ्यापेक्षांही कांहीं लोक जास्त म्हातारे असतात; पण ते सुखानें तीर्थयात्रा करितात ॥ १६ ॥ पण माझाही निश्चय आहे कीं, जोंपर्यंत विठ्ठलाचें दर्शन झालें नाहीं तोंपावेतों भोजन करावयाचें नाहीं. असें म्हणून जितें-द्रिय होऊन त्यानें अन्नपान सोडिलें ॥ १७ ॥ ह्याप्रमाणें कानांनीं

मासमात्रमतिक्रांतं निराहारस्य वै सतः ॥ प्राणमात्रधरस्याथ कस्मिंश्चिद्दिन एव च ॥ १९ ॥ वृद्धब्राह्मणरूपेण विठ्ठलः समुपस्थितः ॥ वंशपात्रे समादाय पक्वान्नं घृतसंयुतम् ॥ दुग्धं च मधुरं चैव पुरस्कृत्वा वचोऽब्रवीत् ॥ २० ॥ वृद्धब्राह्मण उवाच ॥ विश्वनाथ द्विजश्रेष्ठ किमर्थं क्लिश्यते तनुः ॥ अन्नं भुंक्ष्व मया दत्तं किमर्थं तप्यते तनूः ॥ २१ ॥ विश्वनाथ उवाच ॥ ॥ विठ्ठलांघ्रिं यदा द्रक्ष्ये तदा भोक्ष्ये न चान्यथा ॥ इत्यहं निश्चयं कृत्वा भुनज्मि कथमन्यथा॥२२॥त्वं गच्छ गेहं धर्मात्मन् कृपानिधिरुदारधीः ॥ वृद्ध उवाच ॥ वृद्धस्त्वं धार्मिकः पुण्यः को हठोऽत्र विधीयते ॥ २३ ॥

ऐकिलेल्या विठ्ठलाचें रात्रंदिवस त्यानें ध्यान केलें. असा तो वृद्ध ब्राह्मण असतांना ॥ १८ ॥ असा एक महिना गेला. निराहार करणाऱ्या ब्राह्मणाचें केवळ अस्थिचर्म राहिलें ॥ १९ ॥ एके दिवशीं विठ्ठल हा म्हाताऱ्या ब्राह्मणाच्या वेषानें तेथें आला. वेळूच्या पात्रांत तुपासुद्धां पक्वान्न, दूध वगैरे घेऊन तो त्या विश्वनाथ ब्राह्मणाला म्हणाला ॥ २० ॥ म्हातारा ब्राह्मण म्हणतो—हे ब्राह्मणश्रेष्ठा विश्वनाथा, शरीराला पीडा कां देतोस ? मीं दिलेलें हें अन्न भक्षण कर. देहाला पीडा देऊं नकोस ॥ २१ ॥ विश्वनाथ म्हणाला—जेव्हां मी विठ्ठलाचे पाय पाहीन तेव्हांच भोजन करीन. पांडुरंगाच्या दर्शनावांचून भोजन करावयाचें नाहीं, असा माझा दृढ निश्चय आहे ॥ २२ ॥ बाबा, तूं आपल्या घरीं जा. तूं मोठा उदार व दयाळू दिसतोस. वृद्ध ब्राह्मण म्हणाला—तूंच मोठा धार्मिक व पुण्यवान् आहेस. तूं असा हट्ट कां करितोस ॥ २३ ॥

तीर्थमात्रे शिलाः पुण्याः स्नानं तोये विधीयते ॥ नापितैर्मुंडनं कार्यं भोजनीया हि वाडवाः ॥२४॥ चित्तं समाधाय विप्र भुंक्ष्व मद्वाक्यतोऽधुना ॥ एवं सर्वेषु तीर्थेषु विशेषः क्वापि कोपि न ॥ २५ ॥ पाषाणाश्च जलं विप्राः सुवासिन्यश्चतुर्थकाः ॥ चत्वारि सर्वतीर्थेषु पंचमं नास्ति भूतले ॥ २६ ॥ अधीतं भवता शास्त्रं वेदाश्च पठितास्त्वया ॥ मूढानामिव संस्कारो दृश्यते त्वयि नान्यथा ॥ अभिमानं परित्यज्य भुंक्ष्व चान्नं मयार्पितम् ॥ २७ ॥ विश्वनाथ उवाच ॥ गुरौ मानवबुद्धिं च गंगायां जलबुद्धिताम् ॥ प्रतिमासु शिलाबुद्धिं ना कुर्वन् यात्यधोगतिम् ॥ २८ ॥

तीर्थांचे ठिकाणीं पाषाण हे पुण्यकारक असतात. तेथें स्नान करावें. न्हाव्याकडून क्षौर करावें. ब्राह्मणांना भोजन घालावें ॥ २४ ॥ हे विप्र, तूं आतां मनाचे ठिकाणीं समाधान ठेवून, माझ्या म्हणण्याप्रमाणें भोजन कर. ह्याचप्रमाणें सर्व तीर्थांचे ठिकाणीं विधी असतो. दुसरा कांहीं विशेष नाहीं ॥ २५ ॥ पाषाण, पाणी, ब्राह्मण व सुवासिनी ह्याच चार गोष्टी प्रत्येक तीर्थांचे ठिकाणीं असतात. पांचवा पदार्थ कोठेंही नाहीं ॥२६॥ तूं वेदांचें व शास्त्रांचें अध्ययन केलें आहेस. परंतु तुझ्या ठिकाणीं त्या अध्ययनाचा मूर्खाप्रमाणें कांहींएक संस्कार दिसत नाहीं. आतां अभिमान टाकून दिलेलें हें अन्न भक्षण कर ॥ २७ ॥ विश्वनाथ म्हणाला—जो क्षेत्रस्थ गुरुरूपी ब्राह्मणांच्याविषयीं केवळ मनुष्य बुद्धी, गंगेच्या ठिकाणीं पाणी म्हणून बुद्धी, प्रतिमेच्या ठिकाणीं पाषाणबुद्धी ठेवील तो मनुष्य अधोगतीला जातो ॥ २८ ॥

इत्यादि परुषं वाक्यं त्वथ वक्तुं न शक्यते ॥ त्वयि भूतदया श्रेष्ठा त्वयि नीतिर्विलोक्यते ॥ २९ ॥ परंतु धर्मशास्त्राणां विरुद्धं वाक्यमुच्यते ॥ अदृष्ट्वा विठ्ठलं देवं न भुनज्मीति निश्चयः ॥ ३० ॥ अग्रे वक्तुं न शक्तोहं गच्छ वा तिष्ठ वाथवा ॥ इत्युक्तवति विप्रेंद्रे स्वयं प्रादुरभूद्धरिः ॥ ३१ ॥ विठ्ठलस्य स्वरूपेण रुक्मिण्या स्वगणैः सह ॥ सनकाद्या गणास्तत्र ऋषयः सिद्धचारणाः ॥ ३२ ॥ हरिभक्ताश्च ये केचित्त्रैलोक्ये संति तैः सह ॥ विठ्ठलः स्वगणैः सार्द्धं प्रादुरासीज्जगद्गुरुः ॥ ३३ ॥ श्रीविठ्ठलं वीक्ष्यगणैः समेतं पुरं च भीमां च नदीं स विप्रः ॥ कृतार्थतां प्राप्य तदा मुरारेः प्रणम्य पादौ स वचो बभाषे ॥ ३४

तूं असें कठोर वाक्य बोलणें बरें नाहीं. तुझ्या ठिकाणीं भूतदया व नीति दिसते ॥ २९ ॥ परंतु धर्मशास्त्राच्या विरुद्ध कसें बोलतोस. विठ्ठलाचें दर्शन घेतल्याशिवाय भोजन करावयाचें नाहीं, असा माझा दृढ निश्चय झाला आहे ॥ ३० ॥ माझ्यानें पुढें जास्त बोलवत नाहीं. तूं जा अथवा उभा रहा. असें विश्वनाथाचें बोलणें संपल्याबरोबर तेथें प्रत्यक्ष श्रीविष्णू प्रगट झाले ॥ ३१ ॥ विठ्ठलाच्या रूपानें बरोबर रुक्मिणी व स्वगण मंडळी घेऊन प्रभू प्रगट झाले. सनकादिक, ऋषी, सिद्ध, चारण वगैरे जे हरिभक्त जगांत आहेत, त्या सर्वांसुद्धां जगद्गुरु श्रीविठ्ठल तेथें प्रगट झाले ॥ ३२ ॥ ३३ ॥ विठ्ठलाचें दर्शन झालें, व भीमेचें पवित्र तीर्थ दृष्टीस पडलें तेव्हां तो कृतार्थ झालेला विश्वनाथ ब्राह्मण मुरारीच्या पायां पडून बोलावयास लागला ॥ ३४ ॥

विश्वनाथ उवाच ॥ स्वामिन् कृपासागर दीनबंधो दयानिधे त्वां शरणागतोहम् ॥ कोनुग्रहोयं मयि दीन-नाथ यत्स्वीयदासैः सह संप्रयातः ॥३५॥ अहो भाग्य-महो भाग्यं पूर्वजानां वितर्क्यते ॥ यच्छ्रीविठ्ठलदेवस्य दृष्टं पादांबुजद्वयम् ॥ ३६ ॥ भक्तानां भवबंधमोचनकरं सिद्धैः सदा सेवितं नानाकामदमात्मरूपमखिलं सन्निर्मलं योगिभिः ॥ ध्येयं वेदपुराणशास्त्रनिगमैर्गीतं सुरैर्वंदितं रुक्मिण्या सहितं नमामि शिरसा श्रीविठ्ठलांघ्रिद्वयम् ॥ ३७ ॥ यद्ध्यायंति सुरासुरा मुनिवरा विप्राश्च वेदां-तिनो मन्यंते निखिलागमस्य जगतः सारं परं पावनम् ॥ पुण्यं पापहरं परं परगुणं विश्वात्मकं भासुरं रुक्मिण्या सहितं नमामि शिरसा श्रीविठ्ठलांघ्रिद्वयम् ॥ ३८ ॥

विश्वनाथ ह्मणतो—हे कृपासागरा, दयानिधे, दीनबंधो देवा, मी तुला अनन्यभावानें शरण आलों आहें तुझी मजवर फार कृपा आहे. कारण तूं आपलया परिवारासुद्धां येथें आलास ॥ ३५ ॥ माझ्या पूर्वजांचें मोठें भाग्य होतें असें वाटतें. कारण माझ्या दृष्टीस आज श्रीविठ्ठलाचे पाय पडले ॥ ३६ ॥ भक्तांच्या भवबं-धाचा नाश करणारे, सिद्धांनीं निरंतर सेवन केलेले, सर्व कामना परिपूर्ण करणारे, निर्मळ व योगी निरंतर ज्याचें ध्यान करितात असे वेद पुराण शास्त्र ह्यांनीं गाइलेले, सर्व इंद्रप्रभृति देवांना वंद्य असे रुक्मिणीसहित तुझे चरण, त्यांना माझा साष्टांग नमस्कार असो ॥ ३७ ॥ सुर व असुर, मुनिश्रेष्ठ, ब्राह्मण, वेदांती, लोक ज्याला सर्व जगाचें व वेदांचें सार ह्मणतात, जे परम पावन, पवित्र भासुर असे रुक्मिणीसहित जे विठ्ठलाचे चरणकमल त्याला नमस्कार असो ॥ ३८ ॥

प्रभुं पुराणं पुरुषं सनातनं मायाविहीनं यतिभिः सुसेवितम् ॥ प्रपंचसंतापहरं मुरारिं श्रीविठ्ठलं चेतसि चिंतयामि ॥ ३९ ॥ यं द्वारकावासिनमामनंति त्रैलोक्यवासं त्रिगुणात्मरूपम् ॥ सुरासुरैः सेवितपादपीठं श्रीविठ्ठलं चेतसि चिंतयामि ॥ ४० ॥ श्रीविठ्ठल प्रणतपापहर कृपालो योगींद्रसेव्यचरणांबुज दीननाथ ॥ पापानि नाशय भवांतरसंचितानि कर्माणि कारय हरे सुसुखप्रदानि ॥ ४१ ॥ त्वया व्याप्तं जीवो जगदिदमनंतं पशुरिव भ्रमत्येकस्तावल्लघुमतिरयं त्वद्गुणकृतम् ॥ अटन् वारंवारं क्षितितलमिदं शांतिरहितः कृपा यावन्न स्यात्रिभुवनपते विठ्ठल तव ॥ ४२ ॥

जो पुराणप्रभु सनातन आहे, जो मायाविरहित असून संन्यासी लोक ज्याचें निरंतर सेवन करितात, जो प्रपंचसंबंधीं सर्व तापांचें हरण करितो, जो मुर नांवाच्या दैत्याचा शत्रू श्रीविठ्ठल त्याचें मी मनानें चिंतन करितों ॥ ३९ ॥ ज्याला द्वारकावासी ह्मणतात, जो त्रिभुवनांत वास करितो, जो त्रिगुणात्मरूप आहे, ज्याच्या पादपीठाचें देवदैत्य सेवन करितात, त्या विठ्ठलाचें मी चिंतन करितों ॥ ४० ॥ हे श्रीविठ्ठला, तूं प्रणतांचें पाप हरण करणारा आहेस, तूं कृपाळू आहेस, योगींद्र तुझ्या चरणांबुजाचें नेहमीं सेवन करितात, तूं दीनांचा नाथ आहेस, देवा, तूं माझ्या जन्मांतरामध्यें संचित केलेल्या सर्व पातकांचा नाश कर, व माझे हातून सुखकारक अशीं कर्में करीव ॥ ४१ ॥ हे त्रिभुवनाधीशा, विठ्ठला, जों पावेतों तुझी कृपा झाली नाहीं तोंपर्यंत जीव हा तूं व्यापलेल्या सर्व जगांत पशूसारखा निरंतर भ्रमण करीत असतो ॥ ४२ ॥

तावदेव सकलं विराजते यावदस्ति भवतः कृपा-
परा ॥ श्रीनिवास शरणागतं जनं पाहि पालय भवां-
बुधिं गतम् ॥ ४३ ॥ श्रीविठ्ठलेति तव नाम मुखे
सदास्तु त्वत्पादपंकजरजः परिपूतगात्रः ॥ त्वत्सेवयैव
सकलं मम यातु चायुस्त्वत्पादतीर्थगमने मम देहयात्रा
॥ ४४ ॥ इति स्तुतोसौ भगवान् कृपालुः संभोज्य मिष्टं
प्रददौ दयालुः ॥ भक्तिं निजां चेतसि तस्य दत्वा श्रीवि-
ठ्ठलस्तत्र चकार वासम् ॥ ४५ ॥ तद्दिनाद्विठ्ठलस्तत्र
वर्तते भवपाशहत् ॥४६॥ श्रीगौतमी तीरगतं च विठ्ठलं
स्थितं च मत्वा मुनयः समस्ताः ॥ सिषेविरे सर्वमपास्य
देवं श्रीविठ्ठलं मुक्तिसुखप्रदायिनम् ॥ ॥ ४७ ॥ ॥
इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्ये श्रीविठ्ठलमाहात्म्य-
निरूपणं नाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥ ॥

जों पावेतों तुझी कृपा असते तोंपर्यंत सर्व व्यवस्थित असतें. हे लक्ष्मीकांता, संसारसमुद्रांत पडलेला व तुला शरण आलेला जो मी त्या मला कृपा करून सांभाळ ॥ ४३ ॥ तुझें श्रीविठ्ठल हें नाम निरंतर माझे मुखांत राहो. तुझ्या चरणकमलाच्या धुळीनें माझें सर्व शरीर पवित्र होवो. तुझ्या सेवेमध्यें माझें सर्व आयुष्य जावो, व माझी देहयात्रा तुझ्या चरणतीर्थाच्या गमनानें जावो ॥ ४४ ॥ याप्रमाणें स्तुत केलेल्या भगवंतानें दयेनें त्या विश्वनाथ ब्राह्मणाला गोड पदार्थांचें भोजन घातलें. त्याचे मनांत आपली निरंतर भक्ती उत्पन्न करून विठ्ठलानें तेथेंच निरंतर वास केला ॥४५॥ त्या दिवसापासून भवपाशाचें हरण करणारी श्रीविठ्ठलमूर्ती तेथेंच राहिली ॥४६॥ सर्व ऋषींनीं, श्री विठ्ठल हे गौतमी गंगेच्या तीरावर आले आहेत हें जाणून भुक्तिमुक्ति देणाऱ्या प्रभूचें सेवन केलें ॥ ४७ ॥ इतिश्रीनासिक माहात्म्ये श्रीविठ्ठलमाहात्म्य नाम चतुर्थोऽध्यायः ॥४॥

मार्कंडेय उवाच ॥ उमेश्वरस्य माहिमा श्रूयतां मुनि-
सत्तम ॥ यमाकर्ण्य नरः पापान्मुच्यते नात्र संशयः
॥ १ ॥ उमेति नाम्ना विदिता पृथिव्यां शूद्रस्य भार्या
वपुषातिसुंदरी ॥ लावण्यभावेन विमोहितास्तया नृपा
महेंद्रेण समानसिद्धयः ॥ २ ॥ वेश्या बभूवात्र महीतले
हि सा वार्द्धक्यभावेन विपन्नविग्रहा ॥ उमा कदाचिन्नर-
देवसैनिकैः सह प्रयाता किल गौतमीं प्रति ॥ ३ ॥ धर्मं
न जानामि विलोक्य सा तदा विप्रान् समाहूय वचो
बभाषे ॥ भो वाडवाः शूद्रकुलेषु जातां जानीत वेश्यां
विपुलं धनं मया ॥ उपार्जितं तस्य गतिर्भवद्भिर्विचार-
णीया च गतिर्मदीया ॥ ४ ॥

श्रीमार्कंडेय ह्मणतात—हे मुनिसत्तमा, उमेश्वराचा महिमा
ऐक. जो ऐकिला असतां मनुष्य निःसंशय सर्व पातकांतून मुक्त
होतो ॥ १ ॥ पूर्वी उमा ह्या नांवाची एक शूद्राची स्त्री अत्यंत रूप-
वती होती. तिला पाहून तिच्या लावण्यानें इंद्रासारखे ऐश्वर्यसंपन्न
राजेसुद्धां मोहित झाले ॥ २ ॥ पुढें तिनें वेश्येचा धंदा केला. ती
कांहीं दिवसांनीं ह्मातारी झाली. एके दिवशीं एका राजाच्या सैन्या-
बरोबर ती गौतमी गंगेला गेली ॥ ३ ॥ तिनें गौतमीला पाहून
तेथच्या ब्राह्मणांना ती ह्मणाली—महाराज, मला कांहींएक धर्म
माहीत नाहीं. मी शूद्र कुळांत जन्मलेली एक वेश्या आहें. मजजवळ
मी मिळविलेलें पुष्कळ द्रव्य आहे त्याचा विनियोग मी कसा करूं
तो सांगा. कारण मला सद्गती मिळाली पाहिजे ॥ ४ ॥

दशसूनासमश्चक्री दशचक्रिसमो ध्वजी ॥ दशध्वजिसमा वेश्या सर्वधर्मबहिष्कृता ॥५॥ इति शास्त्रं मया ज्ञातं वृद्धानां वचनात्पुरा॥६॥जातानुतापास्मि भवत्समीपं यातास्मि मे येन शुभा गतिः स्यात् ॥ न मे निवासो नरकेषु भूयात्तथा कुरुध्वं शरणागतास्मि ॥ ७ ॥ एतावदुक्त्वा द्विजपुंगवांस्तान् प्रणम्य मूर्ध्ना शरणं जगाम ॥ सर्वं धनं ब्राह्मणसाच्च कृत्वा गंगां गतासीत् ऋषिभिः समेताम् ॥ ८ ॥ तत्संगमे स्वां तनुमुत्ससर्ज ततो द्विजैस्तत्र समेत्य पश्चात् ॥ देवालयं तत्र विधाय लिंगं संस्थापितं रोधसि पुण्यनद्याः ॥ ९ ॥ शेषं विभज्यैव तु तैर्गृहीतं धनं द्विजेंद्रैस्तु महानुभावैः ॥ दीनांधपंगून् कृपणान् दरिद्रजान् संतर्प्य बालान् द्रविणेन तस्याः ॥ १० ॥

दहा हिंसा करणाराची योग्यता एका कुंभाराला असते, दहा कुंभाराइतका दोषी एक तेली व दहा तेल्यांची बरोबरी करणारी एक वेश्या व ती सर्व धर्मबहिष्कृत समजावी ॥ ५ ॥ असें शास्त्रवचन मी पूर्वी ज्ञात्याच्यांच्या तोंडून ऐकिलें आहे ॥६॥ मला हल्लीं अनुताप झाला आहे, व ह्मणूनच मी तुमचेकडे आल्यें आहें. करितां तुह्मीं असें करा कीं, मला नरकासारखी दुर्गती प्राप्त न होतां माझा उद्धार होईल. मी तुह्मांला अनन्य भावानें शरण आलें आहें ॥७॥ असें बोलून त्या ब्राह्मणांना नमस्कार करून ती शरण गेली. सर्व द्रव्य ब्राह्मणांचे स्वाधीन करून, ऋषींनीं युक्त जी गंगा तिचे तीरावर गेली ॥ ८ ॥ गंगेच्या संगमावर तिनें आपल्या देहाचें विसर्जन केलें. ब्राह्मणांनीं तेथें पुण्यनदीच्या तीरावर शंकराच्या लिंगाची स्थापना केली, व तेथें एक देवालय बांधिलें. बाकी राहिलेल्या द्रव्यापैकीं कांहीं द्रव्य गरीब, आंधळे, पांगळे ह्यांना वांटून बाकीचें द्रव्य त्या ब्राह्मणांनीं वांटून घेतलें ॥ १० ॥

उमेश्वरो नाम शिवः प्रतिष्ठितो गोदातटे वाडवपुंगवैस्तैः॥ देहं परित्यज्य उमापि जाता निःपापरूपा त्रिदिवं जगाम ॥ ११ ॥ घृतं यथेष्टं द्विजपुंगवेभ्यो गोदातटे दत्तमतो मृगाक्षी ॥ नाम्ना घृताचीति बभूव नारी शक्रादिकानामतिवल्लभाभूत् ॥ १२ ॥ उमेश्वरं पश्यति यस्त्रिकालं प्रणम्य पूजां प्रकरोति जंतुः ॥ विधूय पापानि पुरा कृतानि स शक्रलोके सुखमश्नुते चिरम् ॥ ॥ १३ ॥ उमेश्वरस्य माहात्म्यं कथितं पापनाशनम् ॥ यः शृणोति नरो भक्त्या सोपि पापैः प्रमुच्यते ॥१४॥ इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्यकथनन्नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ ॥ ॥ ॥

ब्राह्मणांनीं गोदेच्या तीरावर उमेश्वर ह्या नांवाच्या शंकराची स्थापना केली. उमा ही देहविसर्जन करून निष्पाप होऊन स्वर्गास गेली ॥ ११ ॥ त्या मृगाक्षीनें गोदेच्या तीरावर ब्राह्मणांना यथेष्ठ तूप दिलें ह्मणून तिचें नांव घृताची होऊन ती इंद्राची अतिशय आवडती अप्सरा झाली ॥१२॥ जो मनुष्य उमेश्वराची पूजा करून त्रिकाल दर्शन करून प्रणाम करील तो पूर्वीच्या सर्व पातकांतून मुक्त होऊन स्वर्गामध्यें आनंदानें चिरकाळ नांदेल ॥ १३ ॥ ह्याप्रमाणें उमेश्वराचें माहात्म्य सांगितलें. हें जे लोक ऐकतील ते सर्व पातकांतून मुक्त होतील ॥ १४ ॥ इति श्रीनासिकमाहात्म्ये उमेश्वरमाहात्म्यकथनं पंचमोध्यायः ॥ ५ ॥ ॥

॥ मार्कंडेय उवाच ॥ ॥ नृसिंहस्य कथां वक्ष्ये शृणु त्वं मुनिसत्तम ॥ यां श्रुत्वा मुच्यते जंतुः कोटिजन्मकृतादघात् ॥ १ ॥ कदाचित् ब्राह्मणः कश्चिद्वेदवेदांतपारगः ॥ नृसिंहोपासना तस्य सम्यग्गुरुकृपापि च ॥ २ ॥ कदाचिन्माधवे मासि वैशाखस्नानहेतवे ॥ एकाकी संगमे स्नातुं प्रयातस्तत्र धार्मिकः ॥ ३ ॥ ब्राह्मे मुहूर्त्तकाले तु शौचं कृत्वा स धार्मिकः ॥ तालप्रमाणं दीर्घास्यं ललज्जिव्हं चलच्छिखम् ॥ ४ ॥ ऊर्ध्वकेशं महानादं धावमानं च सन्मुखम् ॥ ब्रह्मराक्षसमालोक्य स भीतो धार्मिको द्विजः ॥ उच्चैस्तत्र स्वनं कृत्वा नारसिंहेत्यवोचत ॥ ५ ॥

मार्कंडेय सांगतात–श्रीनृसिंहाची कथा मी सांगतों ती मुनिश्रेष्ठा ऐकावी. जी ऐकिली असतां मनुष्य कोटी जन्मांतील पातकांपासून मुक्त होतो ॥ १ ॥ कोणीएक वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण राहात असे. त्याला नृसिंहाची उपासना होती व त्यावर गुरूची कृपाही असे ॥ २ ॥ तो धार्मिक ब्राह्मण एके वेळीं वैशाख महिन्यांत संगमावर वैशाखस्नानास एकटाच गेला ॥ ३ ॥ ( ब्राह्मे मुहूर्ते ) ब्राह्म मुहूर्तावर तो धार्मिक ब्राह्मण शौच वगैरे करून स्नानास गेला असतां, ताडासारखा उंच, मोठ्या तोंडाचा, तोंडांत जिव्हा वळवळ करणारा ॥ ४ ॥ ज्याचे केश उभे असून, जो मोठ्यानें शब्द करीत समोरून ब्राह्मणाकडे धांवत येत होता असा ब्रह्मराक्षस त्या धार्मिक ब्राह्मणानें पाहिला व तो घाबरला आणि मोठ्यानें हे नारसिंह म्हणून ओरडला ॥ ५ ॥

आर्त्तस्वरं धार्मिकविप्रवर्यं भीतं समालोक्य नृसिंहदेवः ॥ आविर्बभूवास्य पुरस्तदानीं जग्राह कंठे स्वकरेण रोषात् ॥ ६ ॥ कंठे गृहीत्वास्य बभंज सद्यस्तं धार्मिकं प्राह स श्यामराजः ॥ मामा भयं त्वं कुरु वत्स सद्यो मया हतोयं तव भीतिकर्ता ॥ ७ ॥ अयं दुरात्मा शतवर्षमात्रं स्थित्वा मनुष्यांस्तु भुनक्ति नित्यम् ॥ दैवादसौ त्वामिह भोक्तुमागतस्त्वं भक्तिमान्मे कृपया तवाद्य ॥ ८ ॥ शेते पृथिव्यां गतभीरथ त्वं वदन् वृणीष्वेति महान् नृसिंहः ॥ धार्मिक उवाच ॥ त्वत्पादपद्मेस्तु सदैव भक्तिस्त्वत्सेवया गच्छतु शेषकालः ॥ अयं वरो मेस्तु न मेन्यदीप्सितं कृपानिधेनुग्रह एष एव ॥ ९ ॥

धार्मिक ब्राह्मण भीतीनें अतिशय ओरडतो आहे असें पाहून नृसिंहाची स्वारी तेथेंच प्रकट होऊन रागानें राक्षसाला त्या नृसिंहानें कंठाच्या ठिकाणीं धरलें ॥ ६ ॥ श्यामराजानें त्या राक्षसाला प्राणमारें मारून त्या ब्राह्मणाला अभय दिलें व ह्मणाले कीं, वत्सा भिऊ नको. तुला भीति देणारा मारला आहे ॥ ७ ॥ हा दुष्ट राक्षस आज शंभर वर्षें येथें राहात असून ह्यानें येथें मनुष्य नित्य भक्षण करावे. आज तुला खाण्याकरितां तुझे अंगावर आला होता, पण माझ्या कृपेनें तूं आज सुरक्षित राहिलास ॥ ८ ॥ आज हा राक्षस मात्र जमिनीवर पडला आहे. तूं आतां मजजवळ वर माग. असें नृसिंहानें त्या धार्मिक ब्राह्मणास सांगितलें. धार्मिक ब्राह्मण ह्मणतो—देवा नृसिंहा, माझी तुझ्या पायांच्या ठिकाणीं निरंतर भक्ती असो. हें सर्व आयुष्य तुझ्या सेवेंत जावो. कृपानिधे, एवढाच मला वर मिळावा. मला दुसरी कोणतीही इच्छा नाहीं ॥ ९ ॥

इह स्थित्वा जगन्नाथ भक्तान्पालय नित्यशः ॥ तथे-त्युक्त्वा नरहरिस्तत्रैवांतरधीयत ॥ १० ॥ तदादि नारसिंहोत्र संगमे पाति मानवान् ॥ न प्रेतं न च भूतानि डाकिन्यो न च राक्षसाः ॥ ११ ॥ विचरंति दिवा रात्रौ संध्यायामथवा क्वचित् ॥ १२ ॥ नारसिंहं समालोक्य भस्मसाच्च भवंति हि ॥ महिमा नारसिंहस्य मया ते परिकीर्तितः ॥१३॥ यः शृणोति नरो भक्त्या सर्वकामानवाप्नुयात् ॥ १४ ॥ ॥ इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्ये नरसिंहमाहात्म्यनिरूपणं नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥ मार्कंडेय उवाच ॥ ॥ अथ रामगया निगद्यते कथिता पंचवटीसमीपतः ॥ अरुणा-वरुणासरस्वतीनां पुरतो यत्र विभाति गौतमी ॥ १ ॥

त्याचप्रमाणें देवा, आपण येथें निरंतर राहून भक्तांचें संरक्षण करावें. नरहरीनें ती गोष्ट कबूल करून स्वारी गुप्त झाली ॥ १० ॥ तेव्हांपासून संगमावर नरहरी सर्वांचें संरक्षण करीत आहेत; आणि ह्मणूनच प्रेत, पिशाच, डाकिनी, राक्षस, रात्री, दिवसा, संध्या-काळीं केव्हांही संचार करीत नाहींत ॥ ११ ॥ जर कोणी संचार केलाच तर नृसिंह त्यांना भस्म करितात. असा नृसिंहाचा महिमा मी तुला सांगितला ॥ १२ ॥ १३ ॥ जो मनुष्य हा नृसिंहाचा महिमा ऐकेल, त्याच्या सर्व कामना परिपूर्ण होतील ॥ १४ ॥ इति श्रीपद्मपुराणे नरसिंहमाहात्म्यं नाम षष्ठोध्यायः ॥ ६ ॥ श्रीमार्कंडेय उवाच—मार्कंडेय ह्मणतात—पंचवटीच्या समोर राम-गया ह्मणून तीर्थ आहे. अरुणा वरुणा सरस्वतींचे तेथें सान्निध्य असून गौतमीगंगा तेथें विशेषेंकरून शोभते ॥ १ ॥

एषा रामगया नाम पितॄणां मोक्षदायिनी ॥ अत्र स्नानं च दानं च पिंडदानं विशेषतः ॥२॥ ये कुर्वंति नरा विप्र यांति ते परमां गतिम् ॥ अस्मद्वंशोद्भवः कोऽपि पिंडदानं करोति यः ॥ ३ ॥ गत्वा रामगयां धेनुं दास्यति श्रद्धयान्वितः ॥ तेन पुण्यप्रभावेण चिरं वासो भवेद्दिवि ॥ ४ ॥ वांछंति पितरो नित्यं स्वर्गस्था निरयं गताः ॥ तस्मात्प्राज्ञेन कर्त्तव्यं पिंडदानं यथाविधि ॥ गावश्चैव प्रदातव्या नानालंकारभूषिताः ॥ ५ ॥ ज्ञात्वा दुर्गतिमागतस्य च पितुर्मुक्त्यै स्वयं राघवो गत्वा रामगयां चकार विधिवच्छ्राद्धं ददौ गास्ततः ॥ मुक्तः पंक्तिरथोऽपि दिव्यवपुषा यातो हरेर्मंदिरं स्थित्वा पुष्पकमध्य एव बहुभिः सार्द्धं निजैः पूर्वजैः ॥ ६ ॥

ही रामगया पितरांना मोक्ष देणारी आहे. येथें स्नान, दान, पिंडदान ह्यांचें विशेष माहात्म्य आहे ॥ २ ॥ ह्या रामगयेवर स्नानादि करणारे परम गतीला जातात. आमच्या वंशांत उत्पन्न होणारा कोणी तरी पिंडदान करील ॥ ३ ॥ रामगयेवर जाऊन श्रद्धेनें धेनुदान करील व त्या पुण्यप्रभावानें चिरकाळ स्वर्गांत वास मिळेल ॥४॥ अशी इच्छा नरकांत गेलेले पितर करतात. ह्मणून शहाण्यानें यथाविधी पिंडदान करावें व नानालंकारांनीं भूषित केलेल्या गाई दान द्याव्या ॥ ५ ॥ आपल्या पित्याला दुर्गती प्राप्त झाली आहे, असें रामास कळल्यावरून रामानें रामगयेवर जाऊन स्वतः तेथें यथाविधी श्राद्ध केलें व गाई दान दिल्या. त्यामुळें दशरथालाही मुक्ती प्राप्त होऊन, आपल्या पूर्वजांसह तो पुष्पक विमानांत बसून वैकुंठास गेला ॥ ६ ॥

धन्यास्त एव कृतपंचवटीप्रवासाः श्रीरामचंद्रचरणांबुजभक्तिभाजः ॥ श्राद्धं विधाय विधिवन्निजपितृमुक्त्यै यच्छंति गा द्विजकुलाय गयां प्रविश्य॥७॥ धन्यास्त एव रविवंशभवा नरेंद्रा येषां कुले दशरथो नृपतिर्बभूव ॥ यस्यालये सुतवधूत्वमुपेत्य रेमे रामः स्वयं क्षितिजया सह किं ब्रवीमि ॥ ८ ॥ प्रविश्य ये रामगयां पितृभ्यः पिंडं न यच्छंति न गा द्विजेभ्यः ॥ निरर्थकं जन्म गतं नराणां वने यथा जन्म हि मालतीनाम् ॥ ९ ॥ ये ये दुर्गतिमागताः क्षितितले शक्रादयो दुर्मदास्ते ते रामगयां प्रविश्य सुरभीर्दत्त्वा तु मुक्ता भयात् ॥ श्रीरामेण महेश्वरेण विधिना शक्रेण देवर्षिभिर्या नित्यं भुवि सेव्यते सुरगणैः सा पातु वो गौतमी ॥ १० ॥

जे पंचवटींत वास करून श्रीरामाच्या चरणकमलाची निरंतर भक्ती करतात व रामगयेवर गंगास्नान करून आपल्या पितृमुक्तीकरितां यथाशास्त्र श्राद्ध करून गोप्रदान करितात ते लोक धन्य आहेत ॥ ७ ॥ ज्यांच्या कुळांमध्यें राजा दशरथ जन्माला आला त्या सूर्यवंशांतील राजे धन्य आहेत. ज्या दशरथाच्या घरीं सीतेसह रामानें आनंदानें वास केला त्या दशरथाचें वर्णन काय करावें ॥ ८ ॥ जे लोक रामगयेवर गंगास्नान करीत नाहींत, व पितरांच्या उद्देशानें पिंडदान करून ब्राह्मणाला गोप्रदान करीत नाहींत, त्यांचा जन्म रानांत असलेल्या मोगऱ्याच्या वेलीसारखा व्यर्थ आहे ॥ ९ ॥ इंद्रप्रभृति जे जे देव दुर्गती पावून भूमीवर आले त्यांनीं रामगयेवर स्नान करून गोप्रदान करून आपली भीतीपासून सुटका करून घेतली. श्रीराम, शंकर, ब्रह्मदेव, इंद्र व देवर्षि या सर्वांनीं मृत्युलोकीं सर्व देवांसुद्धां ज्या गौतमीगंगेचें सेवन केलें, ती गंगा तुमचें पालन करो ॥ १० ॥

इति रामगयाकथा मया कथिता तेऽपि विमुक्तिदायिनी ॥ शृणुते प्रयतो हि यो नरो द्विजहापि प्रतियाति सद्गतिम् ॥११॥ इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्ये रामगयामाहात्म्यनिरूपणं नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

॥ मार्कंडेय उवाच ॥ ॥ काचिच्छूर्पणखा नाम राक्षसी रावणानुजा ॥ कदाचित्सा वनं याता नरमांसं विचिन्वती ॥१॥ ददर्श ब्राह्मणान्पंच व्रजतः पथि लीलया ॥ दृष्ट्वा तान्वेगतो गत्वा विशिरस्कांश्चकार ह ॥ २ ॥ ततस्तान्भक्षयामास यथेष्टं राक्षसी स्वयम् ॥ तेषां शिरांसि चादाय मध्यान्हे गृहमागता ॥ ३ ॥ अन्नपानादिकं त्यक्त्वा मांसभक्षा निरंतरम् ॥ त्रिजटायै निजं कर्म कथयामास लीलया ॥ ४ ॥

मुनिसत्तमा, याप्रमाणें रामगयेची मुक्ती देणारी कथा मी सांगितली. जो मनुष्य ही कथा ऐकेल तो ब्रह्महत्या करणारा असला तरी सद्गतीला जाईल ॥११॥ इति श्रीपद्मपुराणांतील नासिकमाहात्म्यांपैकीं रामगयेचें माहात्म्य अ० ७ वा संपूर्ण ॥ श्रीमार्कंडेय सांगतात—कोणीएक शूर्पणखा नांवाची रावणाची बहीण मनुष्याचे मांसाकरितां एके वेळी रानांत गेली ॥ १ ॥ वाटेंत तिला पांच ब्राह्मण भेटले. ती आनंदानें त्यांचेकडे धांवत गेली व त्यांचा शिरच्छेद केला ॥२॥ नंतर राक्षसीनें त्यांना यथेच्छ भक्षण केलें व माध्यान्हकाळीं त्यांचीं मस्तकें घेऊन घरीं आली ॥ ३ ॥ अन्नपान न करितां ती निरंतर मांसभक्षण करीत असे. तिनें सहज तें आपलें कृत्य त्रिजटेला सांगितलें ॥ ४ ॥

त्रिजटोवाच ॥ पूर्वजन्मकृतैः पापै राक्षसीं तनुमागता॥ अन्नपानादिकं त्यक्त्वा मांसभक्षा निरंतरम्॥५॥ मानुषाणां विशेषेण ब्राह्मणानां विशेषतः ॥ अनेकजन्मसाहस्यानिष्कृतिस्ते न विद्यते ॥ ६ ॥ जीवानां प्राणिनः श्रेष्ठाः प्राणिनां बुद्धिजीविनः ॥ बुद्धिमत्सु नराः श्रेष्ठा नरेषु ब्राह्मणास्तथा ॥ ७ ॥ ब्राह्मणेषु च विद्वांसो विद्वत्सु कृतबुद्धयः ॥ कृतबुद्धिषु कर्तारः कर्तृषु प्रियवादिनः ॥ ८ ॥ तेषां मांसानि भुक्त्वा त्वं निरयान्प्रतियास्यसि ॥ ९ ॥ शूर्पणखोवाच ॥ अनेकशो मया भुक्ता विप्राः परमयोगिनः ॥ मया न ज्ञायते किंचित्पापपुण्यादिकं सखि ॥ १० ॥

त्रिजटा ह्मणते—पूर्वजन्मांत केलेल्या महापातकामुळें तुला हा राक्षसीचा जन्म प्राप्त झाला आहे. आणि आतांही तूं अन्न वगैरे न खातां फक्त मांस भक्षण करीत आहेस ॥५॥ मनुष्यांचें व त्यांतूनही ब्राह्मणांचें मांस भक्षण करणाऱ्यांना अनेक सहस्र जन्मांतसुद्धां पातकांची निष्कृति नाहीं ( ह्मणजे त्या पातकांची हानि होत नाहीं ) जीवांत प्राणी श्रेष्ठ, प्राण्यांत बुद्धिजीवी श्रेष्ठ, बुद्धिमानांत मनुष्य श्रेष्ठ, मनुष्यांत ब्राह्मण श्रेष्ठ ॥ ७ ॥ ब्राह्मणांत विद्वान, विद्वानांत ज्यांचे बुद्धीवर ज्ञानाचा संस्कार झाला आहे ते श्रेष्ठ, त्या कृतबुद्धीचे ठिकाणीं यथासांग कर्म करणार श्रेष्ठ व त्यांच्यांतही गोड बोलणारे श्रेष्ठ ॥ ८ ॥ अशांचें मांस तूं भक्षण करीत आहेस. त्यामुळें तूं निःसंशय नरकांत जाशील ॥ ९ ॥ शूर्पणखा सांगते—मी शेंकडो ब्राह्मण मारिले, भक्षण केले, परमयोगीसुद्धां मी खाल्ले. मला पापपुण्य कांहींच समजत नाहीं ॥ १० ॥

अज्ञाहं बालिशा मां त्वं किंचिच्छिक्षय सांप्रतम् ॥
अतोहं न करिष्यामि ब्राह्मणानां विहिंसनम् ॥ ११ ॥
हतानां निष्कृतिं ब्रूहि तव पादौ नमाम्यहम् ॥ त्वामहं
शरणायाता ज्येष्ठा त्वं भगिनी मम ॥१२॥ अद्यारभ्य
करिष्यामि विप्र हिंसां कदापि न ॥ या करिष्यति
विप्राणां मनुष्याणां विहिंसनम् ॥ १३ ॥ सा नारी
निरयं यातु अस्तु सा पितृगामिनी ॥ कृतानां
निष्कृतिं ब्रूहि कृपां कृत्वा ममोपरि ॥ १४ ॥ त्रिजटो-
वाच ॥ त्रयाणां निष्कृतिर्दृष्टा पातकानां मया सखि॥
चतुर्थे निष्कृतिर्नास्ति त्वथ संख्या न विद्यते ॥ १५ ॥
श्रूयते हि पुराणेषु रामो रावणहेतवे ॥ पंचवट्यां सह
भ्रात्रा यास्यति त्रिदशालयात् ॥ १६ ॥

मी अज्ञानी आहें, म्हणून तूं मला कांहीं तरी उपदेश कर, म्हणजे मी ब्राह्मणांची हिंसा करणार नाहीं ॥ ११ ॥ तसेंच मी जे ब्राह्मण मारले त्याबद्दलही मला प्रायश्चित्त सांग. मी तुला शरण आलें आहे. तूं माझी वडील बहीण आहेस ॥ १२ ॥ मी आजपासून ब्राह्मणांची केव्हांही हिंसा करणार नाहीं. जी स्त्री मनुष्यांची व त्यांतूनही ब्राह्मणांची हिंसा करील ॥१३॥ ती स्त्री नरकाला जाईल, व तिला पितृगमनाचा दोष लागेल. पण त्रिजटे, तूं कृपा करून मला माझ्या पापाबद्दल प्रायश्चित्त सांग ॥ १४ ॥ त्रिजटा म्हणते—सखे, मी तीन प्रकारच्या पातकांना प्रायश्चित्त ऐकिलें आहे. चवथ्या पातकाला प्रायश्चित्त नाहीं ॥ १५ ॥ मी असें ऐकिलें आहे:—पुराणांत असें सांगितलें आहे कीं, [illegible]पासून राम बंधूसुद्धां रावणाच्या वधाकरितां पंचवटींत येई[illegible] ॥ १६ ॥

तस्य सीतां स संभ्रांतश्चोरवन्नेष्यति स्वयम् ॥ शिलाभिः सागरं बध्वा स लंकां प्रति यास्यति ॥ १७ ॥ लंकायां राक्षसैः सार्द्धं महद्युद्धं भविष्यति ॥ रावणः कुंभकर्णश्च मरणं प्रतियास्यतः ॥ १८ ॥ बिभीषणस्तु राजा स्यादिति वाल्मीकिनिर्णयः ॥ अतस्त्वं नासिके गच्छ रामो यास्यति निश्चितम् ॥ १९ ॥ तदीयं चरणद्वंद्वं दृष्ट्वा मोक्षमवाप्स्यसि ॥ त्रिजटाया वचः श्रुत्वा ययौ शूर्पणखा ततः ॥ २० ॥ नासिके वसतिं कृत्वा प्रेक्षमाणा रघूत्तमम् ॥ गते बहुतिथे काले रामोपि सह सीतया ॥ २१ ॥ लक्ष्मणेन युतश्चापि ययौ पंचवटीं प्रति ॥ ततः शूर्पणखा दृष्ट्वा रामं सीतासमन्वितम्॥२२॥

त्याची स्त्री सीता रावण हा चोरासारखी हरण करील. नंतर राम समुद्रांत पाषाणांचा सेतु बांधील. नंतर लंकेंत जाईल ॥ १७ ॥ नंतर रामाचें राक्षसांबरोबर मोठें युद्ध होईल, व रावण कुंभकर्ण हे त्या युद्धांत मरतील ॥ १८ ॥ पुढें बिभीषण हा लंकेचा राजा होईल. असें वाल्मीकीनें आपल्या रामायणांत सांगितलें आहे. तूं आतां नासिकास जा. राम तेथें निःसंशय येणार आहे ॥ १९ ॥ त्या रामाच्या चरणकमलाचें दर्शन तुला झालें म्हणजे तूं मोक्षाला जाशील. हें त्रिजटेचें भाषण ऐकून शूर्पणखा लागलीच नासिकास गेली ॥२०॥ रामाची वाट पहात ती पुष्कळ दिवस तेथें राहिली. पुष्कळ दिवस गेल्यावर सीतेसुद्धां राम ॥ २१ ॥ लक्ष्मणाला बरोबर घेऊन पंचवटींत आले. नंतर सीतेसुद्धां रामाला शूर्पणखेनें पाहिलें ॥ २२ ॥

कंदर्पसदृशं तत्र जाता मदनविव्हला ॥ अतीव सुंदरं रूपं धृत्वा शूर्पणखा ततः ॥ २३ ॥ देहभावं च विस्मृत्य राममेव दिवानिशम् ॥ आत्मानं सकलां पृथ्वीं रामरूपामलोकयत् ॥ २४ ॥ जल्पंती रामरामेति वचसा मनसा तदा ॥ शतशो वारिता तेन लक्ष्मणेन च सीतया ॥ २५ ॥ पंचवट्यां दिवा रात्रौ भ्रमंती वायुवत्तदा ॥ राम त्वं मां गृहाणात्र वदंती वचसा मुहुः ॥ २६ ॥ साधूनां महिमा नूनं निर्णेतुं केन शक्यते ॥ त्रिजटायाः कृपा पूर्णा जाता तस्यां महामते ॥ २७ ॥ दिवानिशं रामपदांबुजद्वयं सदा स्मरन्ती मनसा जपंती ॥ न किंचिदूचे न च भक्षयंती बभ्राम भूमिं खलु पंचवट्या ॥२८॥

मदनासारख्या दिव्य रामाला पाहून ती मदनानें विव्हळ झाली. नंतर तिनें सुंदर रूप धारण केलें ॥ २३ ॥ नंतर आपला देहभाव विसरून रात्रंदिवस स्वतःला व सर्व पृथ्वीला रामरूपच पहावयास लागली ॥ २४ ॥ रामराम ह्याप्रमाणें नेहमीं रामनाम घ्यावयास लागली व मनही रामाकडेस लागलें. शेंकडो वेळीं लक्ष्मणानें व सीतेनें निवारण केलें असूनही ॥ २५ ॥ पंचवटींत रात्रंदिवस वायूसारखी भ्रमण करावयास लागली. रामा, तूं माझा स्वीकार कर म्हणून रामाची वारंवार प्रार्थना करावयास लागली ॥ २६ ॥ साधूंच्या संगतीचें माहात्म्य कोणी वर्णन करावें. त्रिजटेची तिजवर पूर्ण कृपा झाली ॥२७॥ रात्रंदिवस रामनामाचा जप ती करी. कांहीं एक दुसरें भाषण ती करीत नव्हती व खाणेंही तिनें वर्ज करून पंचवटींत निरंतर ती हिंडत असे ॥ २८ ॥

ततस्तदा कोपि महातपस्वी विलोक्य तां वाच मिमां जगाद ॥ गंगामिमां पश्य कुरुष्व मज्जनं रामं स्मर त्वं भव दिव्यरूपा ॥ २९ ॥ सा तस्य वचनाद्याता गंगां दृष्ट्वा यथाविधि ॥ त्रिर्निमज्ज पपातोच्चै राममुच्चार्य तालवत् ॥ ३० ॥ देहमुत्सृज्य सहसा विमानं दिव्यमागतम् ॥ देवतायाः स्वरूपेण वैकुंठभुवनं ययौ ॥ ३१ ॥ ततः शूर्पणखातीर्थं बभूव भुवि पूजितम् ॥ पंचवट्याः प्रभावेण त्रिजटायाः प्रसादतः ॥ ३२ ॥ राक्षसी स्वर्गमापन्ना रामचंद्रप्रभावतः ॥ ३३ ॥ अनेकपापानि विधूय मूढा सा राक्षसी मुक्तिमवाप सद्यः ॥ फलं सदा साधुसमागमस्य श्रीरामनाम्नस्तु हि पंचवट्याः ॥ न शक्यते वक्तुमलं प्रभावो गंगाजलस्यापि कदापि केन ३४

एके दिवशीं एक महा तपस्वी पुरुषाची व तिची गांठ पडली, तेव्हां तो ह्मणाला—अगे, ही गौतमी गंगा पहा. हिच्यांत तूं स्नान कर व रामचंद्राचें स्मरण करून दिव्यरूप हो ॥ २९ ॥ त्या तपस्व्याच्या शब्दाप्रमाणें ती गंगेवर गेली. यथाविधी स्नान करून मोठ्यानें राम राम ह्मणाली व ताडासारखा तिनें आपला देह भूमीवर टाकिला ॥ ३० ॥ ती देहत्याग करिते तोंच दिव्य विमान आलें, व ती देवतेचें रूप धारण करून वैकुंठास गेली ॥ ३१ ॥ नंतर पंचवटीच्या प्रभावानें व त्रिजटेच्या प्रसादानें भूमीवर पूज्य असें शूर्पणखा तीर्थ झालें. रामाच्या प्रसादानें ती राक्षसी स्वर्गास गेली ॥ ३२ ॥ ३३ ॥ अनेक पापें करणारी अशी ती राक्षसी सर्व पापापासून मुक्त होऊन मोक्षाला गेली. हें साधुसंगतीचें, रामनामाचें व पंचवटीचें माहात्म्य आहे. त्याचप्रमाणें गंगेच्या उदकाचेंही माहात्म्य कोणाकडून वर्णन केलें जात नाहीं ॥ ३४ ॥

अस्मिञ्छूर्पणखातीर्थे स्नानमात्रेण देहिनः ॥३५॥ मुच्यंते किल्बिषाद्धोरान्नात्र कार्या विचारणा ॥ अतः शूर्पणखातीर्थं पावनं परमं मतम् ॥ ३६ ॥ उक्तं मया पंचवट्याः प्रभूतं माहात्म्यमेतत्सकलं पापहारि ॥ शृणोति यः श्रावयते परांश्च प्राप्नोति कामान्सकलानभीष्टान् ॥ ३७ ॥ इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्ये शूर्पणखातीर्थवर्णनं नाम अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ मार्कंडेय उवाच ॥ ॥ गोदाया उत्तरे तीरे प्रोक्ता पंचवटी मुने ॥ तदाश्रितानि तीर्थानि कथितानि मया तव ॥ १ ॥ अधुना दक्षिणे तीरे वर्त्तते नासिकं पुरम् ॥ तदाश्रितानि तीर्थानि कथयिष्ये तवानघ ॥ २ ॥ न नासिकसमं क्षेत्रं भुक्तिमुक्तिप्रदं भुवि ॥ वसुरुद्रादित्यरूपाः पितरो मुनिसत्तम ॥ ३ ॥

ह्या शूर्पणखा तीर्थांत केवळ स्नान केल्यानें प्राणी सर्व प्रकारच्या पातकांतून मुक्त होतो. ह्याजबद्दल विचार करावयास नको ॥ ३५ ॥ आणि ह्मणून शूर्पणखा तीर्थ हें परम पवित्र मानलें आहे ॥ ३६ ॥ असें हें पंचवटीपासून उत्पन्न झालेलें माहात्म्य सर्व पाप हरण करणारें मी वर्णन केलें आहे. जो हें ऐकेल किंवा ऐकविल त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतील व तो परमगतीला जाईल ॥ ३७ ॥ इति श्रीनासिकमाहात्म्यांतर्गत शूर्पणखातीर्थमाहात्म्यं अष्टमोध्यायः ॥८॥ श्रीमार्कंडेय सांगतात–हे मुनिवरा ! पंचवटी ही गोदेच्या उत्तर तीरावर आहे व तिच्या ठिकाणीं असलेलीं तीर्थें मी तुला वर्णन करून सांगितलीं ॥ १ ॥ आतां गोदेच्या दक्षिण तीरावर असलेल्या नासिक क्षेत्रांतील तीर्थें सांगतों तीं निष्पापा ऐक ॥ २ ॥ नासिक क्षेत्रासारिखें भूमीवर भोग व मुक्ति देणारें दुसरें क्षेत्र

वसंति सततं तत्र नासिके सुरसेविते ॥ कव्यवाडा-
दयश्चैव पितरः संति नित्यशः ॥ ४ ॥ देवाश्चतुर्विधाः
संति नासिके सततं मुने ॥ धूरिलोचनसंज्ञाश्च पुरूर्वा-
र्द्रवसंज्ञकाः ॥ ५ ॥ कामकालसंज्ञकाश्च तथा सत्यवसु-
संज्ञकाः ॥ एवं चतुर्विधा देवा नासिके निवसंति हि
॥ ६ ॥ ब्रह्मा विष्णुः शिवश्चैव गणेशश्च दिवाकरः ॥
पार्वती च महाकाली महालक्ष्मीः सरस्वती ॥ ७ ॥
सावित्री चैव गायत्री कामधेनुश्च नंदिनी ॥ इंद्रादय-
स्तथा देवाः कश्यपाद्या महर्षयः ॥ ८ ॥ अन्ये च बहवः
संति शौनकाद्याः सुरर्षयः ॥ नारदाद्याश्चैव संति यज्ञाः
संति च सर्वशः ॥९॥ इंद्रो वन्हिः पितृपतिर्नैर्ऋतो वरुणो
मरुत् ॥ कुबेरश्च तथेशानो दिक्पालाः संति नासिके १०

नाहीं. वसु, रुद्र व आदित्यरूपी पितर हे मुनिसत्तमा ॥ ३ ॥ ह्या देवांनीं सेवन केलेल्या नासिकक्षेत्रांत निरंतर राहतात. तसेंच काव्यवाडवादि पितरही नित्य येथें राहतात ॥ ४ ॥ चार प्रकारचे देव हे मुनिवरा, येथें आहेत. ते चार प्रकार म्हणजे १ धूरिलोचन २ पुरूरवार्द्र ॥ ५ ॥ ३ कामकाल व ४ सत्यवसू हे होत. असे चार नांवाचे देव येथें राहतात ॥ ६ ॥ ब्रह्मदेव, विष्णू, शंकर, गणपती, सूर्य, पार्वती, महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती ॥७॥ सावित्री, गायत्री, कामधेनू, नंदिनी, इंद्रादिदेव, कश्यपादि ऋषी, दुसरे शौनकादि ऋषी, नारदादि देवऋषी, सर्व यज्ञ, हे नासिकक्षेत्रांत आहेत ॥ ८ ॥ ९ ॥ इंद्र, अग्नि, पितर, नैऋत, वरुण, वायू, कुबेर व ईशान हे अष्ट दिक्पाल नासिकक्षेत्रांत राहतात ॥ १० ॥

शेषादयः सर्वनागा वसंति सततं मुने ॥ यौवनाश्वश्च मांधाता धुंधुमारस्तथार्जुनः ॥ ११ ॥ भगदत्तो नलश्चैव हरिश्चंद्रः पुरूरवाः ॥ कार्तवीर्यो नरपतिर्धर्मराजो युधिष्ठिरः ॥ १२ ॥ अन्ये च बहवो भूपा नासिके निवसंति हि ॥ पुष्कराद्यानि तीर्थानि गंगाद्याः सरितस्तथा ॥ १३ ॥ कुरुक्षेत्रं गया चैव नासिके वर्त्तते मुने ॥ अथ किं बहुनोक्तेन त्रैलोक्ये वर्त्तते महत् ॥ तत्सर्वं कलया विप्र नासिके वर्त्तते सदा ॥ १४ ॥ न नासिकसमं तीर्थं न नासिकसमं पुरम् ॥ न नासिकसमं क्षेत्रं न नासिकसमं स्थलम् ॥ १५ ॥ अनेकब्रह्मावलिभी रम्यं नासिकमुत्तमम् ॥ सेव्यं पुंभिस्तु परमसुखमिच्छद्भिरन्वहम् ॥ १६ ॥

शेषादि नाग हे येथें रहातात. यौवनाश्व, मांधाता, धुंधुमार, अर्जुन, ॥११॥ भगदत्त, नल, हरिश्चंद्र, पुरूरवा, कार्तवीर्य, राजा धर्म ॥ १२ ॥ असे दुसरे पुष्कळ राजे नासिकक्षेत्रांत रहातात. पुष्करादिक तीर्थें व गंगाप्रभृति नद्या, ॥ १३ ॥ कुरुक्षेत्र, गया हीं नासिकांत आहेत. फार काय सांगावें, त्रैलोक्यांत जें श्रेष्ठ म्हणून आहे तें सर्व नासिकक्षेत्रांत आहे ॥ १४ ॥ नाशिकक्षेत्रासारिखें क्षेत्र नाहीं. नासिक शहरासारखें शहर नाहीं. नासिकासारिखें तीर्थ नाहीं व नासिकासारिखें स्थळ नाहीं ॥ १५ ॥ अनेक ब्राह्मणांच्या पंक्तींनीं सुंदर असें हे नासिकक्षेत्र आहे. सुखाच्या इच्छेनें सुखेच्छू लोकांनीं निरंतर सेवन करण्यास योग्य असें हें नासिक आहे ॥ १६ ॥

सदा साधूनां च द्विजनृपतिधर्मिष्ठधनिनां निवासस्थानं वै भुवि सुलभमास्ते सुकृतिनाम् ॥ महासुक्तेः स्थानं भवभयहरं नासिकमिदं पदं तद्ब्रह्माद्यामरवरगणानां परिचयात् ॥ १७ ॥ नासिकं सकलदेशनासिकं वासितं सकलतीर्थदेवतैः ॥ भूषितं विविधरत्नसंचयैः पूजितं सकलदेवतागणैः ॥ १८ ॥ मकरमेषतुलाधिगते रवौ स्पृशति वारिव सुच्छदपद्मजम् ॥ अनुदिते हि रवौ सततं नरः स हरिमेति विधूय तु किल्बिषम् ॥ ॥ १९ ॥ जलकमलनिवासी नायको देवतानां विधिरपि निजहस्ते पात्रतो यां बिभर्ति ॥ तदनु निखिलमूर्तिः शंकरोऽपि स्वशीर्षे तदनु सततमंभः पामराणां सुसाध्यम् ॥ २० ॥

सत्पुरुषांना, धार्मिक व धनिक ब्राह्मण व राजांना व पुण्यवान् लोकांना निरंतर राहण्यास हें नासिक योग्य आहे. तसेंच ब्रह्मदेवादि देवांचें हें वासस्थान असल्यामुळें हें महामुक्तिस्थान व संसारभय दूर करणारें असें आहे ॥ १७ ॥ नासिक हें सर्व देशांचें जणूं नाक आहे. सर्व तीर्थांनीं व देवांनीं येथें वास केला आहे. निरनिराळ्या रत्नसमुदायांनीं हें भूषित असून, सर्व देवांनीं हें पूज्य मानेल आहे ॥ १८ ॥ मकर, मेष व तुला ह्या राशींना सूर्य गेला असतां सूर्योदयापूर्वी जो मनुष्य ह्या नासिक क्षेत्रांत गंगेचें स्नान करील तो सर्व पातकांपासून मुक्त होऊन हरिपदाला गमन करील ॥ १९ ॥ जलकमळांत वास्तव्य करणारा ब्रह्मदेव सर्व देवांचा नायक असूनही हातांतील पात्रांत जें गंगोदक धारण करितो, त्याचप्रमाणें अष्टमूर्ती शंकर जें गंगोदक आपल्या मस्तकीं जटेंत धारण करितात, तें गंगोदक ह्या नासिक क्षेत्रांत पामरां-

पामरा अपि नरास्तु नासिके गौतमीजल सुधां पिबंति वै ॥ दुर्लभं त्रिदिववासिनामिदं दुर्लभं किमिहि चास्य सेवनात् ॥ २१ ॥ निरंतरं यत्र भवंति यज्ञा निरंतरं यत्र पठंति वेदान् ॥ निरंतरं यत्र वसंति सिद्धा निरंतरं यत्र वसंति संतः ॥ २२ ॥ सिद्धाः संति कलौ युगेपि महतां मान्याश्च पूज्या बुधास्तेचैवात्र निजस्वरूपमखिलं संदर्शयंति क्षणात् ॥ तान्यः कश्चन वेत्ति पुण्यनिचयैः पूज्यांश्च भक्तिं चरन्नित्यं यः शरणं प्रयाति शिरसा श्रीविष्णुवच्छंभुवत् ॥ २३ ॥ तस्मै ते प्रकटीभवंति सहसा संदर्शयंति स्वयं नित्यं निर्मलमप्रमेयमखिलं ज्योतिःस्वरूपं महत् ॥ सत्यं ज्ञानमयं सुखात्मकमहो चिद्रूपमाद्यं परं योगिध्येयमचिंत्यमात्मनि गतं भार्यायुतं चैव यत् ॥ २४ ॥

नासुद्धां साध्य झालें आहे ॥ २० ॥ पामर लोकसुद्धां ह्या नासिक क्षेत्रांत गंगोदकरूपी अमृताचें प्राशन करितात. हें गंगोदक वास्तविक स्वर्गांत राहणाऱ्यांनासुद्धां दुर्मिळ आहे. मग आपण जर ह्या नासिक क्षेत्रांत वास केला तर आपल्याला कोणती गोष्ट मिळण्यास अशक्य होईल ॥ २१ ॥ ह्या क्षेत्रांत नेहमी यज्ञ होतात. येथें वेदपाठ निरंतर चालले आहेत. सिद्ध व सत्पुरुष यांचें हें वसतिस्थान झालें आहे ॥ २२ ॥ मोठ्यांना मान्य व पूज्य असे विद्वान् व सिद्ध ह्या कलियुगांत ह्या नासिक क्षेत्रांतच आपलें दर्शन देतात. पण अशांची गांठ पडणें सुलभ नाहीं. जो निरंतर भक्तिमान् असेल त्यालाच त्याच्या पुण्याच्या प्रभावानें अशांचें दर्शन होतें व तोच त्यांना विष्णू शंकरासारखें पूज्य मानून मस्तकानें नमस्कार करून शरण जातो ॥२३॥ अशा शरणांगताला ते दर्शन देतात व आपलें

सतां सेवया केवलं तेधिगम्याः खलैर्निंदिता वंदिताः साधुसंघैः ॥ पुराणेन पुण्येन तान्वै लभंते स्थिरां भक्तिमातन्वतो वंदनीयान् ॥ २५ ॥ यादःपतीन्द्रसदृशा अपि भक्तिहीनास्तेषां कुतो भवति सिद्धसमीपवासः ॥ तेषां च तैश्च न कदापि समागमः स्याद्भानोस्तमिस्रनिचयैर्हि कुतोस्ति योगः ॥ २६ ॥ नानाविधानां सिद्धानामालयं नासिकं परम् ॥ पिशाचरूपेण च ते केचिद्यान्ति स्वरूपतः ॥ २७ ॥ विप्रस्वरूपेण वसंति केचिन्म्लेंछस्य वाणीं प्रवदंति चान्ये ॥ उन्मत्तवत्केपि सदा भ्रमंति भिक्षाशनास्ते निवसंति लोके ॥ जानंति तान्नैव कदापि मूढाः प्रायेण निंदंति जनैः समेताः ॥ २८ ॥

जें नित्य, सुखात्मक, ज्ञानमय, चिद्रूप असें ब्रह्मरूप त्याचा अनुभव त्याला देतात. तसेंच सगुण मूर्तींचे जे अवतार त्यांचेंही दर्शन देतात ॥ २४ ॥ अशा महात्म्यांची दुष्ट लोक जरी निंदा करीत असले, तथापि सत्पुरुष व चांगले लोक त्यांची स्तुतीच करून त्यांना वंदन करितात. अशा माहात्म्यांची गांठ साधूच्या सेवेनें व पूर्वपुण्यानेंच होते. ॥ २५ ॥ नक्रासारख्या भक्तिहीनांना सिद्धांच्या समीप कोठून राहण्यास मिळणार. त्यांच्या समीप राहण्याचा योग कधींही येणें शक्य नाहीं. जसा सूर्यप्रकाशाचा अंधकाराशीं योग अशक्य, त्याप्रमाणें ॥ २६ ॥ नानाप्रकारच्या सिद्धांचें नासिक हें घर आहे. कित्येक सिद्ध पिशाच रूपानें राहतात व कित्येक स्वतःच्या रूपानें राहतात ॥ २७ ॥ कित्येक ब्राह्मणांच्या रूपानें असतात तर कित्येक म्लेंछाची भाषा बोलतात. कोणी उन्मत्तासारिखे हिंडतात, कित्येक भिक्षेवर आपली उपजीविका करितात. मूर्ख लोकांना त्यांची ओळख नसल्यामुळें ते त्यांची निंदा करीत असतात ॥२८॥

ये भाग्यवंतः कृतपुण्यसंघास्तएव जानंति नमंति तेभ्यः ॥ त एव भक्तिं दधते मनुष्या गृह्णंति तेषां नु त एव सिद्धाः ॥ २९ ॥ तिलभांडेश्वरो देवो नासिके वर्त्तते सदा ॥ अनादिसिद्धो देवोयं वर्त्तते सर्वकामदः ॥ ३० ॥ प्रत्यब्दं तिलमात्रं तु वर्द्धते भगवाञ्छिवः ॥ प्राप्ते प्रदोषसमये ब्रह्माद्याः सुरसत्तमाः ॥ ३१ ॥ इंद्रादयोपि दिक्पालाः शौनकाद्या महर्षयः ॥ गंधर्वाप्सरसो यक्षा नागाश्च वसवस्तथा ॥ ३२ ॥ दर्शनार्थं समायांति विष्णुश्चैव प्रजापतिः ॥ नित्यं प्रदोषे संप्राप्ते त्रैलोक्यमखिलं परम् ॥ ३३ ॥ तिलभांडेशदेवस्य दर्शनार्थं प्रयाति च ॥ तिलभांडेशमहिमा देवैरपि न बुध्यते ॥ ३४ ॥ इदं ब्रह्मांडसदृशं भविष्यति यदा तदा ॥ रुद्रस्य प्रलयोपि स्यादन्येषां तत्र का कथा ॥ ३५ ॥

जे त्या सिद्ध पुरुषांना ओळखून नमस्कार करितात ते ह्या जगांत मोठे भाग्यवान् व पुण्यवान् समजावे. त्यांनाच भक्ति उत्पन्न होते व त्यांचेवरच सिद्ध अनुग्रह करितात ॥२९॥ तिळभांडेश्वर ह्या नांवाचें नासिक क्षेत्रांत एक लिंग आहे. हें देवस्थान अनादिसिद्ध असून ही देवता सर्वांच्या कामना परिपूर्ण करिते ॥३०॥ दरवर्षी हें शिवलिंग तिळप्रमाण वाढतें. प्रदोपकाळीं ब्रह्मदेवादि देव ॥ ३१ ॥ इंद्रादि लोकपाल, शौनकादि महर्षि, गंधर्व, अप्सरा, यक्ष, नाग, वसू ॥३२॥ विष्णु व प्रजापती हे सर्व ह्या देवाचे दर्शनार्थ येतात. सर्व त्रैलोक्य नित्यप्रदोपकाळीं तिळभांडेश्वराच्या दर्शनार्थ येत असतें ॥ ३३ ॥ तिळभांडेश्वराचा महिमा देवांनासुद्धां कळत नाहीं ॥ ३४ ॥ हें तिळभांडेश्वराचें लिंग जेव्हां ब्रह्मांडाएवढें वाढेल, तेव्हां रुद्राचासुद्धां प्रळय होईल. मग बाकीच्यांची काय गोष्ट ! ॥ ३५ ॥

ब्रह्मांडे यानि लिंगानि वसंति स्थापितानि च ॥ तेषां दर्शनजं पुण्यं प्राप्यतेऽस्य विलोकनात् ॥ ३६ ॥ तिलभाण्डेश्वरद्रष्टुर्देहे पापं न विद्यते ॥ केनेदं स्थापितं लिंगं कस्मिन्काले कथं पुरा ॥ ३७ ॥ ब्रह्मापि नैव जानाति का कथाप्यन्यदेहिनाम् ॥ अमुष्य भजनाद्रोगा विनश्यंति न संशयः ॥ ३८ ॥ विलयं याति दारिद्र्यं पुत्रपौत्रादि संपदः ॥ भवंति कामनाः सर्वास्तिलभांडेशदर्शनात् ॥ ३९ ॥ सप्तजन्मकृतपुण्यसंचयैः प्राप्यते हि तिलवृद्धिदर्शनम् ॥ भक्तिरस्य विमलाभिजायते मानवस्य कृतपुण्यसंचयैः ॥ ४० ॥ पृथिव्यां यानि लिंगानि यानि तीर्थानि संति हि ॥ तेषां दर्शनजं पुण्यं प्राप्यते तस्य दर्शनात् ॥ ४१ ॥

ब्रह्मांडांत जितकीं लिंगें स्वयंभू किंवा स्थापित आहेत त्यांच्या दर्शनाचें पुण्य तिळभांडेश्वराच्या दर्शनानें प्राप्त होतें ॥ ३६ ॥ तिळभांडेश्वराच्या दर्शनानें पवित्र झालेल्या मनुष्याच्या शरीरांत पातक मुळींच राहात नाहीं. हें लिंग पूर्वी कोणी व केव्हां स्थापन केलें ॥ ३७ ॥ हें ब्रह्मदेवालासुद्धां समजत नाहीं मग बाकीच्या देवांची कोण कथा. तिळभांडेश्वराच्या सेवनानें सर्व रोग शांत होतात ॥३८॥ दारिद्र्य लयाला जातें, पुत्रपौत्रादिकांची प्राप्ति होते तिळभांडेश्वराच्या दर्शनानें सर्व कामना परिपूर्ण होतात॥३९॥सात जन्मांत केलेल्या पुण्यानें तिळभांडेश्वराचें दर्शन होतें. त्याचप्रमाणें पूर्वीच्या पुण्यप्रभावानेंच ह्या देवाची भक्ति उत्पन्न होते ॥ ४० ॥ पृथ्वीवर जितकीं लिंगें आहेत आणि जेवढीं तीर्थें आहेत त्यांच्या दर्शनाचें पुण्य श्रीतिळभांडेश्वर दर्शनानें येतें ॥ ४१ ॥

तिलभांडेशमापूज्य क्रतुतीर्थे निमज्य च ॥ जायते जन्मसाफल्यं प्राप्यते परमा गतिः ॥ ४२ ॥ सुखसंपत्तिमाप्नोति कीर्तिं च विपुलं यशः ॥ शत्रवो निधनं यांति दीर्घमायुश्च विंदति ॥ ४३ ॥ पुत्रान्पौत्रांस्तथा देशं कलत्रं परमं धनम् ॥ राज्यं च विपुलं सौख्यं प्राप्नोति धनसंपदम् ॥ ४४ ॥ यद्यत्कामयते चित्ते प्राप्यते चास्य सेवया ॥ गोदा च रामचंद्रश्च तिलभांडेश्वरस्तथा ॥ संपूर्णे नासिके क्षेत्रे सारमेतत्त्रयंपरम् ॥ ४५ ॥ इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्ये तिलभांडेश्वरमाहात्म्यनिरूपणं नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ मार्कंडेय उवाच ॥ अधुना चक्रतीर्थस्य महिमा श्रूयतां मुने ॥ दैत्यानां च बलं दृष्ट्वा विष्णुर्भयविशंकितः ॥ १ ॥

क्रतुतीर्थाचें स्नान करून तिलभांडेश्वराची पूजा केली असतां जन्माचें साफल्य होऊन परमगति प्राप्त होते ॥४२॥ सुख, संपत्ति, कीर्ति, स्वच्छ पुष्कळ यश ह्याची प्राप्ति होते. शत्रूंचा क्षय होतो. दीर्घायुष्याची प्राप्ति होते ॥ ४३ ॥ पुत्र, पौत्र, देश, स्त्री, परम धन, राज्य, अतिशय सुख व धनसंपत्तीची प्राप्ति होते ॥ ४४ ॥ श्रीतिलभांडेश्वराच्या सेवेनें मनांत जी जी इच्छा आणावी ती ती सर्व सफल होते. गोदावरी, श्रीराम व तिलभांडेश्वर हीं तीन सर्व नासिकक्षेत्रांत सारभूत आहेत ॥ ४५ ॥ इति श्रीनासिकमाहात्म्यांतर्गत तिलभांडेश्वरमहिमावर्णनं नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥ ॥

श्रीमार्कंडेय ह्मणतात—आतां तुला मीं चक्रतीर्थाचा महिमा सांगतों, तो तूं मुनिवरा, सावधान अंतःकरणानें ऐक. विष्णूनें दैत्यांचें बळ पाहिल्याबरोबर विष्णूचे मनांत शंका उत्पन्न झाली व भीतीही वाटली ॥ १ ॥

दैत्यारिरिति मे नाम कथं सिद्धिं गमिष्यति ॥ दैत्याश्च बहवो जाता बलवंतो मनीषिणः ॥ २ ॥ गदां वहामि शार्ङ्गं च द्वे ममायुधसत्तमे ॥ गदया निकटस्थानां रिपूणां जायते क्षयः ॥ ३ ॥ शार्ङ्गबाणैर्दूरगानां शत्रूणां क्रियते क्षयः ॥ अंतरालस्थितानां तु येन स्यात्परमक्षयः ॥ ४ ॥ एतादृशं भवेच्चक्रं तदा सम्यक् भविष्यति ॥ इत्थं विचार्य मनसा विष्णुर्गोदातटे स्थितः ॥ ५ ॥ तताप परया भक्त्या ध्यायंश्चेतसि शंकरम् ॥ निराहारो यतात्मा च शिवपूजारतः सदा ॥ ६ ॥ अल्पेनैव तु कालेन परितुष्टः सदाशिवः ॥ मनोगतं ददौ तस्मै चक्रं परमसुंदरम् ॥ ७ ॥

मला लोक दैत्यांचा शत्रू ह्मणतात तें माझें नांव कसें सार्थ होईल. दैत्य तर अतिशय बुद्धिमान् व बलाढ्य झाले आहेत ॥ २॥ माझ्या हातांत दोन आयुधें आहेत. एक गदा व दुसरें शार्ङ्ग धनुष्य. जवळ असलेल्यांचा संहार गदेनें होतो ॥ ३ ॥ लांब अंतरावर असलेल्या शत्रूंचा नाश शार्ङ्ग धनुष्यापासून सोडलेल्या बाणांनीं होतो. पण जवळ नाहींत व फार लांबही नाहींत अशांचा नाश कसा होईल ॥ ४ ॥ जर एखादें चक्र असतें तर फार बरें झालें असतें; असा विचार मनांत आणून विष्णूची स्वारी गोदेच्या तीरावर उभी राहिली ॥ ५ ॥ परम भक्तीनें शंकरांचें ध्यान करून तपश्चर्या केली. आहाराचा परित्याग करून आत्म्याचें नियमन करून श्रीशंकराच्या पूजेमध्यें विष्णू रत झाले ॥ ६ ॥ थोड्याच वेळानें शंकर संतुष्ट झाले व अत्यंत सुंदर असें विष्णूच्या मनाप्रमाणें चक्र शंकरानें विष्णूस दिलें ॥ ७ ॥

चक्रतीर्थं तदारभ्य गंगायां परमं कृतम् ॥ चक्रेश्वरे-
ति देवस्य नाम ख्यातं ततोऽभवत् ॥ ८ ॥ यश्च-
क्रतीर्थे कुरुते निमज्जनं चक्रेश्वरस्यापि समर्चनं च ॥
संसारचक्रं परिहृत्य सर्वं स याति विष्णोः पदमंबिका-
पतेः ॥ ९ ॥ दशाश्वमेधिके तीर्थे यो मज्जति नरः
स्वयम् ॥ दशाश्वमेधजं पुण्यं स्नानदानेन लभ्यते
॥ १० ॥ दशाश्वमेधान् युगपद्विधाता स्वयं चकारेति
श्रुतिर्जगाद ॥ श्रीनीलकंठं च तटे महेशं संस्थापयामास
मुनींद्रवंद्यः ॥ ११ ॥ ततो महेशेन सुतुष्टचेतसा दत्ता
जगत्स्रष्टुममुष्य शक्तिः ॥ तीर्थं च लोकत्रयमध्यविश्रुतं
बभूव नाम्ना च दशाश्वमेधिकम् ॥ १२ ॥ श्रीनीलकंठश्च
जगत्प्रसिद्धः सिद्धिं ददात्यत्र तपःस्थितानाम् ॥ तपः
स्विनोऽप्यत्र बभूवुरुग्रा व्यासादयः श्रीकपिलादयश्च १३

तेव्हांपासून चक्रतीर्थ नांवाचें तीर्थ परम पवित्र गंगेत झालें. तेथील देवास चक्रेश्वर नांव मिळालें ॥ ८ ॥ जो चक्रतीर्थाचें स्नान करून चक्रेश्वराची पूजा करील त्याचें संसारचक्र नष्ट होऊन तो विष्णु-पदाला जाईल ॥९॥ दशाश्वमेध नांवाच्या तीर्थाचें जो स्नान करील त्याला दहा अश्वमेध केल्याचें पुण्य मिळेल ॥ १० ॥ मुनींद्रांना वंद्य अशा ब्रह्मदेवानें एकदम दहा अश्वमेध यज्ञ केले असें वेदांत सांगितलें आहे. व श्रीनीलकंठ ह्या नांवाचें शिवलिंग स्थापन केलें ॥११॥नंतर संतुष्ट झालेल्या शंकरानें ब्रह्मदेवाला जग निर्माण कर-ण्याची शक्ति दिली. तेव्हांपासून त्या तीर्थाला दशाश्वमेध तीर्थ हें नांव मिळालें ॥१२॥ श्रीनीलकंठ महादेव येथें तपश्चर्या करणाऱ्या लोकांना त्यांच्या तपाची सिद्धि देतात. ह्या जागीं व्यासादि व कपिलादि मोठेमोठे तपस्वी झाले ॥ १३ ॥

अत्र तीव्रं तपश्चैके मुनयः सनकादयः ॥ कश्यपाद्याश्च मुनयो भूपालाश्च नृगादयः ॥ १४ ॥ नलेनापि तपस्तप्तं कलिव्याप्तेन भूभुजा ॥ हरिश्चंद्रेण रामेण जामदग्न्येन धीमता ॥ १५ ॥ सिद्धिक्षेत्रमिदं पुण्यं सर्वलोकेषु कथ्यते ॥ हालाहलं पुरा पीत्वा शंकरो दाहपीडितः ॥ १६ ॥ तस्य तापस्य शांत्यर्थं गोदायास्तटमागतः ॥ तताप परमं तीव्रं तपः शंभुः श्रिया युतः ॥ १७ ॥ नीलकंठ इति ख्यातः शांतिं च परमां गतः ॥ अत्र स्नानेन दानेन तत्पुण्यं प्राप्यते नरैः ॥ १८ ॥ नान्यत्र कोटिगुणितैस्तपोभिः प्राप्यते सुखम् ॥ अत्र व्यासस्तपस्तेपे बहुवर्षाणि शुश्रुम ॥ १९ ॥ महाभारतमाख्यानं कर्तुमिच्छन् प्रसिद्धये ॥ अत्र देवः प्रसन्नोभूच्छंकरो लोकशंकरः ॥ २० ॥

येथें सनकादि महामुनींनीं तपश्चर्या केली. कश्यपादि मुनी व नृगप्रभृति राजे ह्यांनींही येथें तपाचरण केलें ॥ १४ ॥ कलीनें व्यापलेल्या नलराजानें, हरिश्चंद्र व जमदग्नीचा पुत्र जो बुद्धिमान् परशुराम त्यानेंही येथें तप केलें आहे ॥ १५ ॥ सर्व लोकांत ह्याला सिद्धक्षेत्र म्हणतात. पूर्वीं शंकरांनीं हालाहल विष भाशन केल्यामुळें त्यांना अतिशय दाह उत्पन्न झाला ॥ १६ ॥ तो दाह शमन व्हावा म्हणून शंकर हे गंगेच्या तीरावर आले. तेथें त्यांनीं परमतीव्र तपश्चर्या केली ॥ १७ ॥ शंकराला तेव्हांपासून नीलकंठ हें नांव मिळालें. येथें स्नानदानानें जें पुण्य मानवांना मिळतें ॥ १८ ॥ तें दुसऱ्या ठिकाणीं कोटीपट जास्त तप करूनही मिळत नाहीं. पूर्वीं व्यासांनीं बहुत वर्षें तप केलें असें ऐकिवांत आहे ॥ १९ ॥ हें तप करण्याचें कारण व्यासांचे मनांत महाभारत करावें हें आलें, व त्यामुळें

पाराशर्याय च ददौ पंच रत्नानि तोषितः ॥ येन भारतमाख्यानं भाति लोके चराचरे ॥ २१ ॥ सहस्त्र-नामस्तोत्रं तदात्मकं वैष्णवं तथा ॥ सनत्सुजातव्याख्यानं गीताद्वयमनुत्तमम् ॥ २२ ॥ एतानि पंचरत्नानि विख्यातानि च भारते ॥ एतैः पंचमहारत्नैर्भूषितं भारतं ततः ॥ २३ ॥ भाति सर्वेषु देवेषु रतिः सर्वेषु जंतुषु ॥ तरणं सर्वपापानां तस्माद्भारतमुच्यते ॥ २४ ॥ पंचरत्नेश्वराख्यानं लिंगस्याभूत्तदापि च ॥ व्यासेन स्थापितं लिंगं व्यासेश्वर इति स्मृतम् ॥ २५ ॥ पंचरत्नप्रदानेन पंचरत्नेश्वराभिधम् ॥ पंचरत्नेश्वरं नत्वा पूजयित्वा यथाविधि ॥ २६ ॥ सर्वान् कामानवाप्नोति नात्र कार्या विचारणा ॥ पंचरत्नेश्वरं दृष्ट्वा महापातककोटयः ॥२७॥

त्यांनीं तपश्चर्या केली. शंकर प्रसन्न झाले ॥ २० ॥ संतुष्ट झालेल्या शंकरांनीं पंचरत्नें दिलीं व त्यामुळें सर्व जगांत भारताची प्रसिद्धी झाली ॥ २१ ॥ तीं पंचरत्नें म्हणजे एक विष्णुसहस्त्रनाम २ रें सनत्सुजाताख्यान, दोन गीता व विष्णुमाहात्म्य पांचवें ॥ २२ ॥ भारतांत हीं पंचरत्नें प्रसिद्ध आहेत. ह्या पांच रत्नांनींच भारताला अतिशय शोभा आली आहे ॥ २३ ॥ सर्व देवांमध्यें हें अतिशय शोभतें. सर्व पापांचें हें तरणोपायाचें साधन आहे ह्मणून ह्याला भारत म्हणतात ॥ २४ ॥ तेव्हांपासून त्या लिंगाला पंचरत्नेश्वर हें नांव मिळालें. व्यासानेंही तेथें लिंग स्थापन करून व्यासेश्वर हें त्याचें नांव ठेविलें ॥ २५ ॥ पंचरत्नेश्वराची यथाविधी पूजा करून त्याला नमस्कार केला असतां व पंचरत्नांचें दान केलें असतां ॥ २६ ॥ सर्व कामना परिपूर्ण होतात ह्यांत कांहींएक संशय नाहीं. पंचरत्नेश्वराच्या दर्शनानें कोट्यावधी महापातकें ॥२७॥

विलीयंतेऽस्य पुण्यानि वर्द्धते सततं परम् ॥ पंचरत्ने-
शमाहात्म्यं कथितं ते मयानघ ॥ यः शृणोति नरो
भक्त्या सर्वान् कामानवाप्नुयात् ॥ २८ ॥ यः पंचरत्ने-
श्वरनीलकंठचक्रेश्वराख्यानकथां शृणोति ॥ विधूय
पापानि पुरा कृतानि प्राप्नोति लोकं जगदीश्वरस्य
॥ २९ ॥ इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्ये दशा-
श्वमेधतीर्थमाहात्म्यानिरूपणं नाम दशमोध्यायः ॥ १० ॥
॥ मार्कंडेय उवाच ॥ ॥ अथानंदघनं नाम तीर्थं पाप-
प्रणाशनम् ॥ अरुणासंगमादग्रे वर्तते सर्वकामदम् ॥
॥ १ ॥ इहानंदघनो नाम कश्चिद्योगी पुराभवत् ॥
निराहारो यतात्मा च तपस्तेपेति दारुणम् ॥ २ ॥

क्षयाला जातात व त्या दर्शन घेणाऱ्या मनुष्याचें पुण्य सतत वृद्धिंगत होतें. पंचरत्नेश्वराचें माहात्म्य ह्याप्रमाणें मी सांगितलें आहे. हें ऐकिलें असतां सर्व कामना परिपूर्ण होतात ॥ २८ ॥ जो पंचरत्नेश्वर व नीलकंठेश्वर यांचें माहात्म्य ऐकेल तो पूर्वी केलेल्या सर्व पातकांतून मुक्त होऊन जगदीश्वराच्या लोकांप्रत जाईल ॥ २९ ॥ इति श्रीनासिकमाहात्म्यांतर्गत दशाश्वमेधतीर्थमाहात्म्यनाम दशमोध्याय संपूर्ण ॥ १० ॥ ॥ श्रीमार्कंडेय सांगतात—हे विप्रवर्या, अरुणासंगमाचे सन्निध आनंदघन ह्या नांवाचें तीर्थ आहे. तें सर्व पातकांचें शमन करणारें आहे ॥ १ ॥ पूर्वी आनंदघन ह्या नांवाचा एक योगी होता. त्यानें अन्नाचा परित्याग करून व आत्मसंयमन करून मोठें तप केलें ॥ २ ॥

अल्पेनैव च कालेन परितुष्टः सदाशिवः ॥ योगसिद्धिं ददौ तस्मै तत्तीर्थं तस्य नामतः ॥ ख्यातिं जगाम परमां गंगातीरेऽतिदुर्लभाम् ॥ ३ ॥ य आनंदघने तीर्थे स्नाति नित्यं यथाविधि ॥ ४ ॥ योगसिद्धिं च लभते सर्वान् कामानवाप्नुयात् ॥ आनंदघनतीर्थस्य महिमा केन वर्ण्यते ॥ ५ ॥ वक्तुं मुखेन सकलो जंतूनां सर्वकामदः ॥ सर्वे रोगाः प्रणश्यंति भवंति सुखसंपदः ॥ ६ ॥ धनानि धान्यानि यशश्च कीर्तिः पुत्राश्च पौत्राश्च सुखानि संपदः ॥ आरोग्यमैश्वर्यमभीप्सितं च भवंति चानंदघने निमज्जताम् ॥ ७ ॥ नश्यंति रिपवः सर्वे जायंते सुखसंपदः ॥ भवंति कामनाः सर्वा वश्यतां यांति जंतवः ॥ ८ ॥

थोड्याच काळांत शंकर प्रसन्न होऊन त्यांनीं त्याचे तपाची सिद्धि दिली व त्याचेंच नांव तीर्थाला दिलें. तें आनंदघन तीर्थ गंगातीरावर परम विख्यात झालें ॥ ३ ॥ जो ह्या आनंदघन तीर्थाचें स्नान यथाविधी करील ॥ ४ ॥ त्याला योगसिद्धि मिळून त्याच्या सर्व कामना परिपूर्ण होतील. ह्या तीर्थाचा महिमा वर्णन करण्यास कोण समर्थ आहे ॥ ५ ॥ ह्या तीर्थाच्या प्रसादानें सर्व कामना पूर्ण होतात व सुख संपत्ति मिळते ॥ ६ ॥ धन, धान्य, यश, कीर्ती, पुत्र, पौत्र, सुख, संपत्ती, आरोग्य, ऐश्वर्य व जें इष्ट असेल तें सर्व आनंदघन तीर्थांत स्नान करणाऱ्याला मिळतें ॥ ७ ॥ सर्व शत्रू नष्ट होतात, सर्व संपत्तीची प्राप्ति होते, सर्व कामना परिपूर्ण होतात व सर्व प्राणी वश होतात ॥ ८ ॥

सदाशिवः प्रसन्नोत्र जायते पूजितः स्तुतः ॥ आनंदघनतीर्थे यः श्राद्धं भक्त्या करिष्यति ॥ ९ ॥ पितरस्तेन वै तृप्तास्तस्य यच्छंति वांछितम् ॥ गयाश्राद्धसमं श्राद्धं पितॄणां च सुतृप्तिदम् ॥ १० ॥ गयाश्राद्धेन गच्छंति स्वर्गमेव हि पूर्वजाः ॥ आनंदघनतीर्थे च पुत्रैः संतर्पिता नराः ॥ ११ ॥ नैष्यंति च पुनर्योनिं गर्भवासादिकं नहि ॥ योगिनः प्रातरायांति स्नानार्थं नित्यमेव हि ॥ १२ ॥ अत्र स्नानं च दानं च तथा ब्राह्मणतर्पणम् ॥ ये कुर्वंति नरास्तेषां सर्वसिद्धिर्न संशयः ॥ १३ ॥ गोसहस्रप्रदानेन भूमिदानेन यत्फलम् ॥ तुलापुरुषदानेन हैमेन रविपर्वणि ॥ १४ ॥ आनंदघनतीर्थस्य तत्फलं स्नानमात्रतः ॥ इत्यर्थे कथयिष्यामि कथामेकां पुरातनीम् ॥ १५ ॥

या ठिकाणीं शंकराची पूजा व स्तुति केली असतां शंकर प्रसन्न होतात. आनंदघन तीर्थाचे ठिकाणीं जो भक्तीनें श्राद्ध करितो ॥ ९ ॥ त्याचे पितर तृप्त होऊन इष्टसिद्धि देतात, आनंदघन तीर्थाचे ठिकाणीं केलेलें श्राद्ध पितरांची तृप्ति करणारें आहे ॥ १० ॥ गयाश्राद्धानें सर्व पूर्वज स्वर्गाला जातात. आनंदघन तीर्थाचे ठिकाणीं मुलांनीं श्राद्ध केलें म्हणजे पूर्वज गर्भवासादि दुःखांतून मुक्त होऊन पुनर्जन्माला येत नाहींत ॥ ११ ॥ जे लोक या तीर्थाचे ठिकाणीं स्नान, दान व ब्राह्मणसंतर्पण करतील त्यांची सर्व सिद्धि होते ॥ १३ ॥ सहस्र गोप्रदानानें किंवा भूमिदानानें किंवा सूर्यपर्वणीच्या दिवशीं सोन्याच्या तुलापुरुषाचें दान केलें असतां जें पुण्य प्राप्त होतें तेंच पुण्य आनंदघन तीर्थाचें स्नान केल्यानें होतें. याविषयीं पूर्वीची एक कथा आहे ती मी सांगतों ॥ १४ ॥ १५ ॥

कश्चित्पूयस्रवा नाम गलत्कुष्ठी द्विजोत्तमः ॥ आनंदतीर्थमागत्य नित्यं मज्जति लीलया ॥ १६ ॥ एकांते स्नानसंध्यां च कुरुते लोकलज्जया ॥ षण्मासाद्रोगनिर्मुक्तो बभूव शुभलक्षणः ॥ १७ ॥ दिव्यदेहो बभूवात्र किं वक्तव्यमतः परम् ॥ १८ ॥ आनंदतीर्थस्य मया महामुने संवर्णितेयं च तवाग्रतः कथा ॥ शृणोति यः श्रावयते परान्स प्राप्नोति कामान्सकलानभीष्टान् ॥ १९ ॥ इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्ये आनंदघनतीर्थमाहात्म्यनिरूपणं नाम एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

॥ मार्कंडेय उवाच ॥ ॥ महिमा सुंदरपुरः कथ्यते श्रूयतां मुने ॥ भवंति श्रवणादस्याः पूताः पातकिनो नराः ॥ १ ॥

एक पूयस्रवा नांवाचा गलत्कुष्ठी ब्राह्मण राहात असे. तो आनंदतीर्थावर येऊन नित्य लीलेनें स्नान करीत असे ॥ १६ ॥ लोकलज्जेमुळें तो एकांतांत जाऊन स्नानसंध्या करीत असे. सहा महिने ह्याप्रमाणें स्नान संध्या केल्यानें तो रोगमुक्त झाला व दिव्यदेहयुक्त झाला. ह्यापेक्षां जास्त माहात्म्य काय वर्णन करावें ? ॥ १७ ॥ १८ ॥ आनंदतीर्थाची कथा ह्याप्रमाणें मुने, तुझ्यासमोर मी वर्णन केली. जो ही ऐकेल किंवा ऐकवील त्याच्या सर्व कामना परिपूर्ण होतील ॥ १९ ॥ इति पद्मपुराणांतर्गत आनंदघनतीर्थमहिमावर्णनं नाम एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ॥ ॥ ॥

श्रीमार्कंडेय सांगतात— हे मुने ! तुला सुंदरपुरीचा महिमा सांगतों ऐक. पातकी लोक हा ऐकल्यानें पातकमुक्त होतात ॥ १ ॥

इहार्थे कथयिष्यामि कथामेकां पुरातनीम् ॥ आसी-
ज्जालंधरो नाम दानवो बलवान्महान् ॥ २ ॥ वृंदा
नामेति तद्भार्या विख्याता वसुधातले ॥ पतिव्रता महा-
भागा सुंदरी परमा मता ॥ ३ ॥ देवानां कार्यसिद्ध्यर्थं
कदाचिद्भगवान् हरिः ॥ पातिव्रत्यस्य भंगेन तद्भर्तुर्मर-
णाय च ॥ ४ ॥ आदिदेश सुराधीशं न च शक्तो
बभूव सः ॥ जालंधरः सदा देवान् पीडयामास दैत्य-
राट् ॥ ५ ॥ पातिव्रत्यस्य भंगाद्धि वृंदाया वीक्ष्य कर्म
च ॥ नान्यथा मरणं तस्य ज्ञात्वा विष्णुः स्वयं प्रभुः
॥ ६ ॥ छलेन वृंदामगमत्तदा विष्णुः स्वयं प्रभुः ॥ पाति-
व्रत्यस्य भंगेन क्षीणायुः सोऽपि दैत्यराट् ॥ ७ ॥

ह्याविषयीं पूर्वीची एक कथा आहे. पूर्वी जालंधर नांवाचा महापरा-
क्रमी दानव राहात असे. त्याची स्त्री वृंदा नांवाची सर्वपृथ्वीवर मख्यात
होती. ती परम सुंदर होती व महाभाग्यवती असून पतिव्रता होती
॥ २॥३ ॥ देवांच्या कार्यसिद्धीकरितां भगवान विष्णूनें तिच्या
पतीच्या मरणाकरितां तिच्या पातिव्रत्याचा भंग केला ॥ ४ ॥
पातिव्रत्याचा भंग करून जालंधराच्या नाशाविषयीं विष्णूनें
इंद्राला आज्ञा केली, पण इंद्राच्या हातून तें घडलें नाहीं ॥ ५ ॥
दैत्यांच्या राजानें देवांना अतिशय पीडा दिली. पातिव्रत्याच्या
भंगानें त्याचा नाश करावा असें देवानें ठरविलें. स्वतः भगवान
विष्णूनेंही दुसऱ्या उपायानें हा मरणारा नाहीं असें जाणून कप-
टानें वृंदेच्या पातिव्रत्याचा भंग केला. वृंदेचें पातिव्रत्य नष्ट झाल्या-
बरोबर त्या दैत्याचेंही आयुष्य क्षीण झालें ॥ ६ ॥ ७ ॥

शंकरेण रणे दैत्यो निहतो बलवान् रिपुः ॥ हृषिता देवताः सर्वा दैत्ये च निधनं गते ॥ ८ ॥ दिवि दुंदुभयो नेदुर्दुःखिताः सर्वदानवाः ॥ गते बहुतिथे काले विष्णुः सर्वसुरेश्वरः ॥ ९ ॥ वृंदागमनपापेन पीडितो बहुदुःखभाक् ॥ कुरूपो दुष्टगंधिश्च बभूव सततं हरिः ॥ १० ॥ तस्य संसर्गदोषेण पीडितं सकलं पुरम् ॥ शिवाय कथितं तेन सर्वदुःखं पुरस्य च ॥ ११ ॥ गौतमीं गच्छ विष्णो त्वं स्वपुरेण समन्वितः ॥ इत्याज्ञप्तो महेशेन विष्णुर्गोदावरीं ययौ ॥ १२ ॥ निजं पुरं समादाय गोदायास्तटमागतः ॥ गोदायाः स्नानमात्रेण पूतोभून्मधुसूदनः ॥ १३ ॥ पुरं च सकलं पूतं सुंदरं च बभूव ह ॥ विष्णुः सुरूपतां प्राप्तः पुरं च सकलं तथा ॥ सुरूपमभवद्विष्णुस्तत्र तस्थौ यथासुखम् ॥ १४ ॥

शंकरानें तो बलाढ्य दैत्य रणभूमीवर मारिला. त्यामुळें सर्व देवांना अतिशय आनंद झाला ॥८॥ स्वर्गांत दुंदुभी वाजूं लागल्या. सर्वदानवांना अतिशय दुःख झालें. पुष्कळ दिवस गेल्यानंतर सर्व देवांचा ईश्वर जो विष्णु तो वृंदेच्या पातिव्रत्यभंगानें अतिशय दुःखपीडित झाला. तो कुरूप होऊन त्याच्या शरीराला दुर्गंध सुटला ॥ ९॥१० ॥ त्या विष्णूच्या संसर्ग दोषानें सगळें नगर पीडित झालें. तेव्हां विष्णूनें आपलें दुःख शंकरास कथन केलें ॥ ११ ॥ शंकरानें विष्णूस सांगितलें कीं, तूं आपल्या नगरासुद्धां गौतमीगंगेवर गमन कर. अशी शंकरानें आज्ञा केल्यावर विष्णूनें गंगेवर गमन केलें ॥ १२ ॥ नगरासुद्धां गंगेवर जाऊन मधुसूदनानें स्नान केल्याबरोबर त्याचे ठिकाणीं पवित्रता उत्पन्न झाली ॥ १३ ॥ तें नगर सर्व सुंदर झालें. विष्णूलाही सुरूपता प्राप्त झाली, आणि विष्णूनें

सुंदरं च पुरं जातं सुंदरश्च जनार्दनः ॥ बभूव गौतमीस्नानात् सर्वं पापक्षयो महान् ॥ ततस्तत्सुंदरं नाम पुरमासीज्जगत्पतेः ॥ १५ ॥ नारायणोऽपि विजहौ कुरूपं पापनिर्मितम् ॥ सुंदरं परमं प्राप रूपमत्यद्भुतं हरिः ॥ १६ ॥ ततः प्रभृति तत्तीर्थं सुंदराख्यां जगाम ह ॥ विष्णुनापि वरो दत्तो हरेणापि पुनःपुनः ॥ गौतमी सर्वकामानां दात्री भवतु निश्चयात् ॥ १७ ॥ पूजिता परमा ख्याता सर्वकामफलप्रदा ॥ भुक्तिमुक्तिप्रदा चैव सर्वरोगविनाशिनी ॥ १८ ॥ एतत्तीर्थसमं तीर्थं त्रैलोक्येऽपि न विद्यते ॥ एतद्वः कथितं तीर्थं विष्णुर्येन स्वयं हरिः ॥ पापहा सर्वलोकानां विमुक्तः पापसंचयात् ॥ १९ ॥ इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्ये सुंदरपुरमाहात्म्यनिरूपणं नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ ॥ ॥ ॥ ॥

आनंदानें वास केला ॥ १४ ॥ नगर सुंदर झालें. जनार्दनालाही सुंदरता प्राप्त झाली. गौतमीच्या स्नानानें सर्व पापाचा क्षय झाला, व तें जगत्पतीचें सुंदरपुर झालें ॥ १५ ॥ नारायणाचेंही तें पापनिर्मित कुरूपत्व नष्ट झालें, व त्याला अत्यंत अद्भुत असें सुंदर स्वरूप प्राप्त झालें ॥ १६ ॥ तेव्हांपासून त्या तीर्थाला सुंदरतीर्थ हें नांव मिळालें. विष्णूनें व शंकरानें गोदावरीगंगेस वर दिला कीं, तूं निश्चयानें सर्व कामना परिपूर्ण करणारी होशील ॥ १७ ॥ तूं परमपूज्य, विख्यात, सर्व कामना परिपूर्ण करणारी भुक्तिमुक्ति देणारी, सर्व रोगांचा नाश करणारी होशील ॥ १८ ॥ ह्या सुंदर तीर्थासारिखें तीर्थ त्रिभुवनांत नाहीं. ह्याप्रमाणें सर्व लोकांच्या पातकांचा नाश करणारा विष्णूसुद्धां ह्या तीर्थाच्या माहात्म्यानें पातकमुक्त झाला ॥ १९ ॥ इति श्रीपद्मपुराणांतर्गत सुंदरमाहात्म्यनिरूपणं नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

॥ मार्कंडेय उवाच ॥ अग्नितीर्थस्य माहात्म्यं कथ-
यामि समासतः ॥ शृण्वंतु मुनयः सर्वे कामदं सर्वपा-
पहम् ॥ १ ॥ च्यवनस्य पुरा पित्रा शप्तोऽसौ हव्यवा-
हनः ॥ सर्वभक्षो भवस्वेति कस्माच्चित्कारणात्ततः ॥२॥
निंद्योऽभूत्सर्वलोकेषु मानहीनो हुताशनः ॥ अपूज्यश्च
कृतस्तेन मुनिना हव्यवाहनः ॥ ३ ॥ ततः स गौतमीं
गत्वा तपस्तेपेऽतिदारुणम् ॥ महेशं पूजयामास चिर-
कालं हुताशनः ॥ ४ ॥ बहुकालं तपस्तेपे गोदातीरे
स्थितश्चिरम् ॥ गोदावर्याः प्रसादेन शंकरस्य प्रसादतः
॥५॥ वन्हिः पूज्यतमो जातो वन्हितीर्थं ततः स्मृतम् ॥
वन्हीश्वरोऽपि तेनैव स्थापितः सर्वकामदः ॥ ६ ॥ ततः
प्रभृति तीर्थं वै वन्हिनाम्ना क्षितावभूत् ॥ वन्हितीर्थे
नरः स्नात्वा सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ७ ॥

श्रीमार्कंडेय सांगतात-हे मुनीहो, मी अग्नितीर्थाचें माहात्म्य सांगतों.
तें पापनाशक असून कामना पूर्ण करणारें आहे. तें ऐका ॥ १ ॥
पूर्वी च्यवनाच्या बापानें कांहींएक कारणावरून अग्नीला शाप
दिला कीं, तूं सर्वभक्ष होशील ॥ २ ॥ त्यामुळें तो सर्व लोकांत
निंद्य झाला. त्याला कोणी सन्मान देईना. त्या मुनीनें अग्नीला
अपूज्य केला ॥ ३ ॥ नंतर अग्नीनें गौतमीवर जाऊन अतिदारुण
तप केलें. अग्नीनें पुष्कळ दिवस शंकराची उपासना केली ॥ ४ ॥
पुष्कळ दिवस गोदेच्या तीरावर राहून तप केल्यामुळें गोदेच्या व
शंकराच्या कृपेनें व प्रसादानें ॥ ५ ॥ अग्नी हा पुनः पूज्य झाला
व तेव्हांपासून अग्नितीर्थ हें निर्माण झालें. तेथें वन्हीश्वराची ही
स्थापना अग्नीनें केली ॥६॥ तेव्हांपासून अग्नितीर्थ निर्माण झालें.
त्या वन्हितीर्थांत स्नान केल्यानें सर्व पातकांचा नाश होतो ॥ ७ ॥

वन्हिर्द्विजेन्द्रेण पुरा प्रशप्तः स सर्वभक्षो विहितो विगर्हितः ॥ पुनः प्रपूज्यत्वमवाप लोके श्रीगौतमीशंकरयोः प्रसादात् ॥ ८ ॥ इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्ये अग्नितीर्थमाहात्म्यनिरूपणं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ मार्कंडेय उवाच ॥ ॥ प्राप्ते कलियुगे घोरे चोरैर्व्याकुलिता मही ॥ यवनैर्ध्वंसिता पृथ्वी सर्वे विप्राश्चकंपिरे ॥ १ ॥ एकपादश्च धर्मोऽभूत् व्याकुलीकृतमानसः ॥ सर्वेऽपि मुनयो जग्मुर्हित्वा तु वसुधातलम् ॥ २ ॥ स्वाहाकाराः स्वधाकारा वषट्काराश्च न कचित् ॥ सर्वे देवा महीं त्यक्त्वा स्वर्गं प्राप्ता महर्षयः ॥ ३ ॥ धर्मो गतः क्षितितलाद्विधवा बभूवुर्नार्यः स्वनाथमपहाय विटालयानि ॥ जग्मुर्यथासुखमपास्य कुलानि जाता वेश्याश्च सर्वनगरेषु धनैः समृद्धाः ॥४॥

पूर्वी ब्राह्मणानें अग्नीला तूं सर्वभक्ष हो, असा शाप देऊन अपूज्य केला होता. पण पुनः गौतमी व शंकराच्या कृपेनें तो पूज्य व मान्य झाला ॥ ८ ॥ इति श्रीपद्मपुराणांतर्गत अग्नितीर्थमाहात्म्यवर्णनं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ श्री–मार्कंडेय ह्मणतात– कलियुगामुळें सर्व पृथ्वी ही चोरांनीं व्यापिली. सर्व पृथ्वी चोरांनीं जर्जर केली व सर्व विप्र हे त्रस्त झाले ॥ १ ॥ धर्माचे तीन पाद नष्ट होऊन तो धर्म विव्हल झाला. सर्व मुनींनीं पृथ्वी सोडिली ॥ २ ॥ स्वाहाकार, स्वधाकार व वषट्कार हे सर्व जगांतून नष्ट झाल्यामुळें, देव व महर्षींनीं मृत्युलोक सोडून स्वर्गाचा मार्ग धरिला ॥ ३ ॥ पृथ्वी सोडून धर्म गेला. पृथ्वीवर पुष्कळ स्त्रिया विधवा होऊं लागल्या. स्त्रियांनीं आपल्या पतीचा त्याग करून जारांच्या

राजानस्तस्करा जाता म्लेंछाश्च बहवो नृपाः ॥ पर्जन्योऽपि क्वचिद्देशे क्वचिद्धान्यानि पेचिरे ॥ ५ ॥ दासभावं गता विप्रा वेदाध्ययनवर्जिताः ॥ वृषलीपतयो विप्राः स्नानसंध्याविवर्जिताः ॥ ६ ॥ कश्चित्तु मातरं हंति कश्चिद्धंति तथाग्रजम् ॥ पितरं नैव मन्यंते धनलोभेन केचन ॥ ७ ॥ श्वशुरं नैव मन्यंते वध्वः श्वश्रूं च काश्चन ॥ भूपालं नैव मन्यंते सेवकाः स्वामिनिष्ठुराः ॥ ८ ॥ संग्रामे नृपतिं हित्वा पलायनपरायणाः ॥ राजानं वेष्टितं दृष्ट्वा गृहं यांति पराङ्मुखाः ॥ ९ ॥ पतिं वृद्धं परित्यज्य तरुणं समुपाश्रिताः ॥ कामिन्योपि तथा जग्मुर्विधवा जारमाश्रिताः ॥ १० ॥

चरांचा मार्ग धरिला. वेश्यांचा अतिशय सुळसुळाट होऊन सर्व गांवांतून त्या ऐश्वर्यसंपन्न झाल्या ॥ ४ ॥ राजांनीं तस्करांची वृत्ती स्वीकारली. सर्व राजे म्लेंछरूप बनले. पर्जन्य कोठें पडतो कोठें पडत नाहीं, तशींच धान्यें कोठें पिकतात कोठें पिकत नाहींत ॥५॥ ब्राह्मणांनीं वेदादि अध्ययन सोडून चाकरीचा मार्ग धरिला, स्नान संध्या सोडून शूद्र स्त्रियांशीं विष व्यवहार करूं लागले ॥ ६ ॥ कोणी आपल्या आईचा खून करितो तर कोणी आपल्या वडील भावाला ठार मारितो, तर द्रव्याच्या लोभानें कोणी आपल्या बापाचे प्राण घेतो ॥ ७ ॥ सुना सासु सासऱ्याला विचारिनाशा झाल्या, तसेंच सेवक आपल्या धन्याला मुळींच न जुमानणारे झाले ॥ ८ ॥ उलट रणभूमीवर राजाला सोडून पळून जाणारे असे सैनिकरूपी सेवक बनले. राजाला शत्रूंनीं वेढलेला पाहून पळून जाण्याची वृत्ति सैनिक वीरांनीं पत्करिली ॥ ९ ॥ तरुणींनीं वृद्ध पतीचा त्याग

दंभेन क्रियते धर्मो दंभेन द्विजपूजनम् ॥ दंभेन दीयते दानं दंभेन क्रियते मखः ॥ ११ ॥ दंभेन पूज्यते विष्णुर्दंभेन क्रियते तपः ॥ दंभेन मातुर्भजनं पितॄणां सेवनं तथा ॥ १२ ॥ महादानानि गृह्णंति कलौ विप्रा विमोहिताः ॥ अग्निहोत्रं च दंभेन कलौ कुर्वंति वाडवाः ॥ १३ ॥ धर्मे मतिर्न कस्यापि बभूव वसुधातले ॥ धनस्योपार्जनं चक्रुरन्यायेन कलौ युगे ॥ १४ ॥ म्लेंछेभ्योपि प्रगृह्णंति शूद्रेभ्यस्तु समन्ततः ॥ शूद्रेभ्योपि धनं लब्ध्वा दंभेन विदधुर्मखान् ॥ १५ ॥ अग्निहोत्रं ततश्चक्रुर्म्लेंछोपार्जितवृत्तयः ॥ एवं विप्राः कलौ जाताश्चांडाला इव केवलम् ॥ १६ ॥

करून तरुणांचा आश्रय केला. विधवांनींही जारांचा स्वीकार करण्यास आरंभ केला ॥ १० ॥ लोक दांभिकपणानें धर्म करूं लागले. ढोंगानेंच ब्राह्मणपूजन करूं लागले. दान व यज्ञ यांच्या मुळाशींही दांभिकपणा मूळभूत झाला ॥ २१ ॥ विष्णुपूजन, तपश्चर्या, आईबापांची सेवा हीं सर्व दंभामुळेंच सर्व करूं लागले ॥ १२ ॥ महादानांचा स्वीकार मोहवश झालेले ब्राह्मण करूं लागले. कलियुगांत ब्राह्मण अग्निहोत्रही दांभिकपणानेंच घेऊं लागले ॥ १३ ॥ कलियुगामुळें धर्माची वासना कोणासही होईनाशी झाली. कलियुगांत सर्व लोक अन्यायानें धनसंग्रह करूं लागले ॥ १४ ॥ म्लेंछापासून व शूद्रापासून ब्राह्मण प्रतिग्रह घेऊं लागले, व शूद्रापासून मिळविलेल्या द्रव्यावर यज्ञ करूं लागले ॥ १५ ॥ म्लेंछापासून जीविकेचें साधन मिळवून अग्निहोत्रादि ब्राह्मण करूं लागले आणि ह्मणूनच

सूर्यग्रहे शूद्रनृपार्जितानि गृह्णंति दानानि महांति विप्राः ॥ १७॥ पत्नी निंदति नायकं च तनयस्तातं तथा मातरं भ्राता भ्रातरमत्र निंदति गुरुं शिष्यो नृपं सेवकः ॥ वेदं निंदति दुर्जनश्च सुजनं पाखंडमार्गस्थितो जामाता श्वशुरं च निंदति वधूः श्वश्रूं कलौ सर्वदा ॥ १८ ॥ इत्याद्यनेककलिवृत्तमवेक्ष्य गौरी श्रीनासिके सकलदैवत-यज्ञधर्मान् ॥ संरक्षणाय गणपं स्वगणैः समेतं गोदातटे निजसुतं प्रतिनोदयंती ॥ १९ ॥ पार्वत्युवाच ॥ गोदाया दक्षिणे तीरे त्वं तिष्ठ गणनायक ॥ लोकानां सन्मतिं देहि दुष्टबुद्धिं निवारय ॥ २० ॥ वेदशास्त्रादिकं सर्वं मंत्रबीजानि पालय ॥ द्विजान् पालय पापेभ्यो धर्मं स्थापय सज्जनम् ॥ २१ ॥

ब्राह्मण हे चांडालप्राय झाले ॥ १६ ॥ सूर्यग्रहासारख्या महापर्वणीच्या दिवशीं शुद्रादि राजापासून ब्राह्मण महादानें घ्यावयास लागले ॥ १७ ॥ बायकांनीं नवऱ्याची निंदा, मुलांनीं आई, बाप व भावांची निंदा करण्यास सुरवात केली, शिष्यानें गुरूची, सेवकानें राजाची, दुर्जनानें वेदांची, पाखंडी लोकांनीं सज्जनांची, जांवयानें सासऱ्याची व सुनेनें सासूची निरंतर निंदा करावी ॥ १८ ॥ इत्यादि अनेक कलियुगामध्यें होणारे प्रकार पाहून श्रीगौरी-देवीनें देवता, यज्ञ, धर्म इत्यादिकांचें संरक्षण व्हावें म्हणून आपल्या गणपती नांवाच्या मुलाला गणमंडळीसुद्धां नासिक क्षेत्रांत पाठविण्याचें मनांत आणून त्याला सांगितलें ॥ १९ ॥ पार्वती म्हणते— गणनायका, तूं गोदेच्या दक्षिणतीरीं रहा, व लोकांना सद्बुद्धी देऊन त्यांच्या दुष्ट बुद्धीचें निवारण कर ॥२०॥ सर्व वेदशास्त्रांचें व मंत्रबीजांचें

अपायं ये करिष्यंति तांश्च दंडय नित्यशः ॥ नव-दुर्गास्थलं चैव नासिकं परमं मतम् ॥ २२ ॥ सिद्धा-नामाश्रमो ह्येष परमो मम वल्लभः ॥ आदिस्थानमिदं लक्ष्म्याधिष्ठितं नासिकं पुरा ॥ २३ ॥ महेशोऽपि भव-त्प्रीत्यै त्वत्समीपे समाश्रितः ॥ हनुमानपि गोदायास्तीरे स्थास्यति निश्चलः ॥ २४ ॥ चतुर्धा स्ववपुः कृत्वा स्थास्यत्येव ममाज्ञया ॥ तव भक्तिं करिष्यंति ये जनास्ते मम प्रियाः ॥ २५ ॥ तेषां गृहे स्थिरा लक्ष्मीर्विद्या चैव सरस्वती ॥ स्थास्यत्येव गणाध्यक्ष त्वं च पूरय कामनाम् ॥२६॥ महालक्ष्म्याः स्थलं चैव नासिके परमं मतम् ॥ कलिकालभयं नास्ति नासिके सततं नृणाम् ॥ २७ ॥

पालन कर. ब्राह्मणांचें पालन कर. पापापासून त्यांचें संरक्षण करून सज्जनांना धर्माचे ठिकाणीं दृढ कर ॥२१॥ जे अपायकारक असतील त्यांना शिक्षा कर. नासिक हें नवदुर्गांचें परमस्थान आहे॥२२॥नासिक क्षेत्र मला अतिशय आवडतें आहे. हा मला आवडता असा सिद्धांचा आश्रम आहे. नासिक क्षेत्र हें लक्ष्मीचें आदिस्थान आहे ॥ २३ ॥ श्रीशंकर हे तुझ्या प्रीतीमुळेंच तुझ्यासमोर राहतील. त्याचप्रमाणें हनुमान मारुती हे गोदेच्या तीरावर निश्चल राहतील ॥ २४ ॥ माझ्या आज्ञेवरून आपलें शरीर चार भाग करून मारुती हा गंगे-वर राहील. हे गणपते, जे लोक तुझी भक्ति करतील ते मला अति-शय प्रिय होतील ॥ २५ ॥ त्यांच्या घरीं लक्ष्मी, विद्या व सरस्वती स्थिर राहील. हे गणाध्यक्षा, तूंही त्यांची कामना पूर्ण कर ॥२६॥ नासिक क्षेत्रांत महालक्ष्मीचेंही उत्कृष्ठ स्थान आहे. नासिक क्षेत्रांत सर्वकाळ राहणारांना कलिकाळाचें मुळींच भय नाहीं ॥ २७ ॥

नवदुर्गास्थलानीह वर्त्तते नासिके सदा ॥ चित्रघंटा-
दिदुर्गाणां संति स्थानानि नासिके ॥ २८ ॥ तत्र
साक्षात्स्वयं शक्तिराद्या देवी हरिप्रिया ॥ तया संपू-
जितं सर्वं नासिकं मम वल्लभम् ॥ २९ ॥ इत्याद्यनेकानि
गणेश्वराय विज्ञाप्य माता गिरिराजपुत्री ॥ महेशयुक्तं
गणनायकं तं गोदातटे स्थापयाति स्म तत्र ॥ ३० ॥
इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्ये गणेशतीर्थमाहा-
त्म्यनिरूपणं नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ॥
मार्कंडेय उवाच ॥ ॥ उत्तरद्वारमासीनं गणनाथमु-
मासुतम् ॥ पालयंतं जनस्थानं हनुमत्सहितं प्रभुम्
॥ १ ॥ महालक्ष्मीर्जगन्माता नानाभूतैः समन्विता ॥
प्रादुरासीत्पुरद्वारि पूर्वे कोटिगणान्विता ॥ २ ॥ जगर्ज
गगनं सर्वं प्रलयानलसंनिभम् ॥ भीतानि सर्वभूतानि
पृथिव्यादीनि सर्वतः ॥ ३ ॥

नासिक क्षेत्रांत नवदुर्गांचीं नऊ स्थानें आहेत. त्यांचीं नांवें चित्र-
घंटाप्रभृती आहेत ॥ २८ ॥ तेथें हरीची आवडती जी आद्या
शक्ती ती प्रत्यक्ष वास करिते, व तिच्या अस्तित्वामुळें नासिक हें
मला फार आवडतें आहे ॥ २९ ॥ पार्वतीनें ह्याप्रमाणें पुष्कळ गोष्टी
गणपतीला सांगून गोदेच्या तटावर त्याची स्थापना केली ॥ ३० ॥ इति
श्रीपद्मपुराणांतर्गत गणेशतीर्थवर्णनं नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥
श्रीमार्कंडेय सांगतात--उमापुत्र गणनाथ हे उत्तर द्वाराचे ठिकाणीं
मारुतीसह राहून जनस्थानाचें पालन करीत आहेत ॥ १ ॥ पूर्वद्वाराचे
ठिकाणीं कोट्यावधी गणासुद्धां व नानाप्रकारच्या भूतगणांसुद्धां
जगन्माता महालक्ष्मी प्रकट झाली आहे ॥ २ ॥ जेव्हां महालक्ष्मी

कोटिसूर्यसमं व्योम दुर्निरीक्ष्यमभूत्तदा ॥ नासिके देवताः सर्वा भयभीताश्चकंपिरे ॥ ४ ॥ गणेशश्च हनूमांश्च ययतुस्तत्र विस्मितौ ॥ अनेकगणसंयुक्तौ धावमानावितस्ततः ॥ ५ ॥ दुर्निरीक्ष्यं महो दृष्ट्वा गणेशः प्राप निश्चयम् ॥ इत्थं साक्षाद्भगवती विष्णुमाया पुरस्थिता ॥ ६ ॥ अनया सह को योद्धुं समर्थः पृथिवीतले ॥ अतोऽहं शरणं यास्ये महालक्ष्मीं हरिप्रियाम् ॥ ७ ॥ गणेश उवाच ॥ त्वद्योगेन हरेर्हरस्य च विधेर्नामानि रूपाणि च त्रैलोक्याधिकतामहत्वमखिलं लोकाधिपत्यं च यत् ॥ त्वामाद्यां श्रुतयो वदंति परमां मायां सवित्रीं पुनः कर्त्रीं कामदुघां नमामि मनसा कायेन वाचा पराम् ॥ ८ ॥

प्रकट झाली तेव्हां तिनें मोठ्यानें गर्जना केली. तेव्हां पृथ्वीप्रभृति सर्व भूतें भयभीत झालीं ॥ ३ ॥ कोट्यावधी सूर्यांच्या प्रकाशानें प्रकाशित झालेल्या आकाशाकडे कोणाच्यानेंही पाहवेना. तेव्हां नासिक क्षेत्रांतील सर्व देवता भीतीनें कांपूं लागल्या ॥ ४ ॥ गणपती व मारुती विस्मित होऊन तेथें आले. त्यांचे बरोबर शेंकडों गण होते. ते सर्व इकडे तिकडे धांवूं लागले ॥ ५ ॥ दुःखानें सुद्धां पाहण्यास कठीण असें तें तेज पाहून गणपतीनें महालक्ष्मी प्रकट झाली हें ठरविलें साक्षात् भगवती विष्णुमाया समोर उभी राहिलेली पाहिली ॥ ६ ॥ तेव्हां या जगांत हिच्याशीं युद्ध करण्याला कोण समर्थ आहे ! ह्मणून मी ह्या महालक्ष्मीला शरण जातों असें ह्मणून गणपतीनें महालक्ष्मीचें स्तवन करण्याला प्रारंभ केला ॥७॥ गणेश ह्मणतात–ब्रह्मदेव, विष्णू व महेश ह्यांना तुझ्याचमुळें नाम

त्वां देवि देवः शरणं प्रपन्नो विष्णुस्तु लक्ष्मीपतिरास लोके ॥ ब्रह्मादयस्त्वां सततं भजंति भवंति लोकस्य चराचरस्य ॥ ९ ॥ कृपां विधातुं सकलं च दातुं पूतं च कर्तुं कुशलानि दातुम् ॥ त्वं देवतानामपि देवतासि प्रसीद लक्ष्मि प्रणतोऽस्मि तुभ्यम् ॥ १० ॥ त्वं विश्वरूपासि समस्तमेतत् त्वयैव पूतं च कृतं ऋतं च ॥ ये त्वां परित्यज्य समृद्धि दात्रीमन्यां भजंते न हि ते विमुक्ताः ॥ ११ ॥ तस्मात्प्रसीद भवतीं शरणं प्रपन्नो बालोऽस्मि ते मम मतिर्विपुला प्रदेया ॥ त्वं वांछितानि सकलानि ददासि नित्यं मातः क्षमस्व निखिलं तु ममापराधम् ॥ १२ ॥

व रूप प्राप्त झालेलें आहे. त्रिभुवनांत श्रेष्ठत्व, सर्व महत्त्व व लोकांमध्यें आधिपत्य जें त्यांना मिळालें आहे त्यालाही कारण तूंच आहेस. वेद तुला आद्या, परम माया उत्पन्न करणारी व सर्व कामना परिपूर्ण करणारी ह्मणतात, त्या तुला काया, वाचा, मनें-करून माझा नमस्कार असो ॥ ८ ॥ हे देवी, विष्णु तुला शरण आल्यानें त्याला लक्ष्मीपतीत्व मिळालें. ब्रह्मादि देव तुला शरण आले व सतत तुझें भजन करितात; ह्मणून स्थावर जंगम जग उत्पन्न करण्याचें त्यांना सामर्थ्य आलें ॥ ९ ॥ देवी, मजवर तूं कृपा कर, माझ्या सर्व इच्छा सफळ कर, माझे इष्ट मनोरथ दे, व माझें कुशल कर; तूं देवांचा देव आहेस. हे लक्ष्मी देवी, तूं प्रसन्न हो मी तुला शरण आलों आहें ॥ १० ॥ तूंच सर्व विश्वाचें रूप धारण केलें आहेस, तूंच हें सर्व केलें आहेस व पवित्र केलें आहेस. समृद्धी देणारी जी तूं त्या तुला सोडून जे अन्य देवतेचें भजन करितात ते मुक्त होत नाहींत ॥ ११ ॥ हे देवी, तूं प्रसन्न हो मीं तुला शरण आलों आहें. मी तुझा बालक

त्वां देवि दानवपतिर्महिषासुरोथ शुंभो निशुंभसहितो न्यवमत्य धाम्ना ॥भस्मीबभूव निजसर्वगणैः समेतः कस्त्वां प्रति क्षितितलेऽस्ति कृताभिमानः ॥१३॥ विश्वं करोषि परिपालयसि प्रकामं विश्वं च संहरसि देवि पुनःपुनस्त्वम् ॥ त्वल्लीलयैव सकलानि जगंति मातर्भूयो भवंति न भवंति चराचराणि ॥ १४ ॥ देवि त्वमब्जजसुता परमां हि भूत्वा विद्यां बिभर्षि नटयस्यथ विश्वमेतत् ॥ त्वां नैव वेत्ति पुरुषोऽपि पुराण एष कृष्णः पतिस्त्रिभुवनस्य चराचरस्य ॥ १५ ॥ त्वन्मायया जगदिदं परिमोहितं सत् त्वां नैव वेत्ति भवतीं च जगत्स्वरूपाम् ॥ त्वं क्ष्मासि वारि सकलं च महः समस्तं वायुर्नभश्च सगुणं च दिशश्च सर्वाः ॥ १६ ॥

आहे. मला चांगली बुद्धि दे. तूं सर्वांच्या सर्व कामना परिपूर्ण करितेस, माझाही अपराध सहन कर ॥१२॥ हे देवि, तुझा अपमान सर्व दानवांचा राजा महिषासुर यानें केला. तसाच शुंभ निशुंभांनीं केला. पण तूं त्यांना आपल्या सामर्थ्यानें त्यांच्या गणासुद्धां भस्म केलेंस. ह्यावरून जगांत तुझा अपमान करून तुझ्याशीं अभिमानबुद्धीनें कोण वागेल ! ॥ १३ ॥ तूं जग उत्पन्न करितेस त्याचें पालन करितेस, व शेवटीं पुनः संहारहि तूंच करितेस. पुनः तुझ्याच लीलेनें जगाची व स्थावर जंगमांची उत्पत्ति होते ॥१४॥ हे देवी, तूंच ब्रह्मदेवाची मुलगी होऊन सरस्वतीरूपानें सगळें जग नटावितेस. तुला पुराणपुरुषही जाणूं शकत नाहीं. त्रिभुवनांचा पति व स्थावरजंगमाचा स्वामी जो कृष्ण, तोही तुझें माहात्म्य जाणूं शकत नाहीं ॥ १५ ॥ तुझ्या मायेनें मोहित झालेलें जग, जगत्स्वरूप जी तूं त्या तुला मुळींच ओळखत नाहीं. तूं पृथ्वी, उदक, तेज, वायू व आकाश ह्या पंचमहाभूतांच्या

एवं स्तुवन् गणपतिर्हरिशक्तिमाद्यां लक्ष्मीं पपात पदयोरथ देवतायाः ॥ लक्ष्म्याश्चराचरगुरोर्मधुसूदनस्य माया स्म पश्यति तदा शरणं प्रपन्नम् ॥ १७ ॥ एवं स्तुता भगवती महालक्ष्मीर्गजाननम् ॥ वरं ब्रूहि वरं ब्रूहि गणेश मनसेप्सितम् ॥ १८ ॥ उत्तिष्ठ तात भद्रं ते प्रीतास्मि तव बालक ॥ नासिकं सकलं त्रातुं पापेभ्यः प्रेषितास्म्यहम् ॥ १९ ॥ विष्णुना त्वां समालोक्य प्रणतं शिवनंदनम् ॥ नगराद्बहिरेवाहं स्थास्याम्यत्यंततोषिता ॥ २० ॥ उग्राणि मम भूतानि करिष्यंति व्यथां जने ॥ त्वमेव नगरं पाहि ममाज्ञामात्रधारकः ॥ २१ ॥ त्वया यद्विहितं स्तोत्रं ममातिप्रीतिकारकम् ॥ ये पठिष्यंति सततं तेषां सिद्धिर्भविष्यति ॥ २२ ॥

रूपानें व सर्व दिशांच्या रूपानें नटली आहेस ॥ १६ ॥ अशा रूपानें गणपतीनें परम व आद्य शक्तीचें स्तवन करून तिच्या पायावर आपला देह नम्र केला. तेव्हां चराचरांचा जो गुरु मधुसूदन त्याच्या मायेनें शरण आलेल्या गणपतीकडे पाहिलें ॥ १७ ॥ वर सांगित ल्याप्रमाणें स्तवन केलेली भगवती महालक्ष्मी गजाननाला तूं इष्ट वर माग, असें ह्मणाली ॥ १८ ॥ बाबा ऊठ, हे मुला, मी तुला प्रसन्न आहें. सर्व नासिक क्षेत्राचें पातकांपासून संरक्षण करावें ह्मणून मला विष्णूनें पाठविलें आहे ॥ १९ ॥ शिवपुत्र जो तूं, तुला प्रणत झालेला पाहून, संतुष्ट झालेली मी नगराच्या बाहेर राहीन ॥ २० ॥ मी शहरांत राहिल्यास माझे भूतगण लोकांना त्रास देतील. ह्मणून माझ्या आज्ञेवरून नगराचें रक्षण नगरांत राहून तूंच कर ॥ २१ ॥ तूं केलेलें माझें स्तोत्र जे सतत पठण करतील त्यांची सतत

तेषां गेहे पुत्रपौत्रसुखानि धनसंपदः ॥ अरयोऽपि क्षयं यांति सदा पुष्टिर्भविष्यति ॥२३॥ गणेश उवाच ॥ यदि तुष्टासि मे मातर्वरं त्वं दातुमिच्छसि ॥ पार्वत्यास्तु प्रसादेन विद्यां दातुं क्षमोस्म्यहम् ॥ ऋद्धिं दातुं न शक्ताऽस्मि सा शक्तिर्मम दीयताम् ॥ २४ ॥ महालक्ष्मीरुवाच ॥ विद्यां च लक्ष्मीं च सरस्वतीं च मोक्षं च कामान्सकलानभीष्टान् ॥ मम प्रसादेन समस्तदाता भक्ताय भावीति न संशयोत्र ॥ २५ ॥ मार्कंडेय उवाच ॥ इत्युक्त्वा सा महालक्ष्मीस्तस्य शीर्षे करं ददौ ॥ २६ ॥ तदादि गणनाथोऽपि भक्तानां सर्वकामदः ॥ बभूव मुनिशार्दूल महालक्ष्म्याः प्रसादतः ॥ २७ ॥ इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्ये महालक्ष्मीमाहात्म्यनिरूपणं नाम पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ॥ ॥ ॥

कार्यसिद्धि होईल. कारण तें स्तोत्र मला फार आवडतें आहे॥२२॥ त्यांच्या घरीं पुत्र, पौत्र, सुख, धन संपत्ति ह्यांची वृद्धि होईल. त्यांचे शत्रू नष्ट होतील, व त्यांची पुष्टि होईल ॥ २३ ॥ गणपती ह्मणतात–आई, तूं प्रसन्न असशील तर मला ऋद्धि नांवाची शक्ति तूं दे. कारण पार्वतीच्या प्रसादानें मला फक्त विद्या देण्याचेंच सामर्थ्य प्राप्त झालें आहे ॥ २४ ॥ देवी ह्मणते–गणपते, तूं माझ्या कृपेनें भक्तांच्या विद्या, लक्ष्मी, सरस्वती, मोक्ष व सर्व कामना परिपूर्ण करणारा होशील ह्यांत शंका नाहीं ॥ २५ ॥ मार्कंडेय सांगतात–महालक्ष्मीनें ह्याप्रमाणें वर देऊन त्याचे मस्तकावर हात ठेविला ॥ २६ ॥ हे मुनिश्रेष्ठा, तेव्हांपासून भक्तांच्या सर्व कामना परिपूर्ण करणारा गणाधीश झाला ॥ २७ ॥ इति श्रीनासिकमाहात्म्यांतर्गत महालक्ष्मीमाहात्म्ये पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ॥ ॥

मार्कंडेय उवाच ॥ अतः कलियुगे घोरे नासिकं निर्भयं स्मृतम् ॥ श्रीमद्विष्णोः प्रसादेन पापं नैवात्र निश्चयः ॥ १ ॥ सर्वे वेदाश्च यज्ञाश्च सर्वे देवाः कलौ युगे ॥ नासिके सततं संति निर्भयाः सकलागमाः ॥२॥ सिद्धाश्च मुनयः संति तीर्थानि च यथासुखम् ॥ इति नासिकमाहात्म्यं कथितं ते मयानघ ॥ यः शृणोति नरो भक्त्या सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ३ ॥ कलिकृतकलुषौघैर्नैव ते मानुषौघाः सततकृतनिवासा नासिके पंचवट्याम् ॥ विहितसकलधर्माः पुण्यरूपाः पृथिव्यां क्वचिदपि न हि पीडां ते लभंते कदापि ॥ ४ ॥ अंजनाचलमारभ्य यावद्दक्षिणवासिनी ॥ तावत्तन्नासिकं क्षेत्रमष्टक्रोशमितं परम् ॥ ५ ॥

श्रीमार्कंडेय जैमिनीला सांगतात–हे जैमिने ! मागच्या अध्यायांत सांगितलेल्या कारणामुळें, कलियुगांत नासिक हें निर्भय स्थान आहे. श्रीविष्णूच्या प्रसादानें येथें पाप मुळींच नाहीं ॥ १ ॥ या कलियुगांत सर्व वेद, सर्व यज्ञ, सर्व देव ह्या नासिक क्षेत्रांत निर्भय राहतात ॥ २ ॥ सिद्ध, मुनी, तीर्थ हीं सर्व आनंदानें नासिक क्षेत्रांत राहतात. असें हें नासिकमाहात्म्य मी हे मुनिवर्या तुला सांगितलें. जो हें ऐकेल तो सर्व पातकांपासून मुक्त होईल ॥ ३ ॥ ज्या मनुष्यांनीं नासिकपंचवटीमध्यें वास केला आहे, त्यांना कलियुगसंबंधीं कोणत्याही दोषांची भीति नाहीं, ते सर्व धर्मांचें आचरण करणारे असल्यामुळें पुण्यरूप समजावे. त्यांना कधींही पीडा व्हावयाची नाहीं ॥ ४ ॥ अंजनपर्वतापासून जेथपावेतों गोदावरी दक्षिणवाहिनी आहे तेथपावेतों आठ कोसाच्या प्रदेशाला नासिकक्षेत्र म्हणतात ॥ ५ ॥

रामशय्यापि तन्मध्ये पांडवानां तथाश्रमः ॥ गोदाया दक्षिणे कूले यानि तीर्थानि संति हि ॥६॥ तावंति नासिकस्थानि कीर्तितानि मनीषिभिः ॥ मुंडनं चोपवासश्च सर्वतीर्थेष्वयं विधिः ॥ ७ ॥ गोदावरीं समासाद्य कर्त्तव्यानीति मे मतिः ॥ पुण्यस्तंभात्समायाति नासिकं क्षेत्रमादरात् ॥ ८ ॥ तेनापि हि विधातव्यं मुंडनादि यथाविधि ॥ नासिके सर्वदानानि दातव्यानि यथाविधि ॥ ९ ॥ गोशतं च प्रदातव्यं सहस्रं लक्षमेव वा ॥ सहस्रभोजनं देयं विप्रेभ्यस्तु यथाविधि ॥ १० ॥ नासिकस्थाय विप्राय वर्षवृत्तिं करोति यः ॥ यथोक्तं लभते पुण्यं वाजिमेधशतोद्भवम् ॥ ११ ॥

त्यामध्येंच रामशय्या ( रामशेज ) पांडवाश्रम (पांडवलेणीं) ह्यांचा समावेश होतो. गोदेच्या दक्षिण तीरावर जितकीं तीर्थें आहेत ॥ ६ ॥ तीं सर्व नासिकक्षेत्रांतलीं समजतात. मुंडन व उपोषण हा सर्व तीर्थांच्या ठिकाणीं विधी आहे ॥ ७ ॥ गोदावरीवर आलेल्या सर्व लोकांनीं ह्याप्रमाणें मुंडन व उपवास केले पाहिजेत. पुण्यस्तंभावरून आलेल्यानें सुद्धां नासिक मुंडन व उपवास केले पाहिजेत ॥ ८ ॥ त्यानेंही यथाविधी मुंडन करून नासिकक्षेत्रांत यथाविधी सर्व दानधर्म करावा ॥ ९ ॥ शंभर किंवा सहस्र गोप्रदानें द्यावीं. लक्ष गोप्रदान केल्यास उत्तमच. ब्राह्मणांना सहस्रभोजन घालावें ॥ १० ॥ नासिकक्षेत्रस्थ ब्राह्मणाला जो वर्षभर पुरेल इतकें धान्य अर्पण करील त्याला शंभर अश्वमेध यज्ञ केल्याचें पुण्य मिळतें ॥ ११ ॥

यो वाजिमेधं कुरुते यथा विधियों नासिकस्थाय ददाति वृत्तिम् ॥ तयोः समानं फलमामनंति ब्रह्मादयस्तत्त्वनिविष्टबुद्धयः ॥ १२ ॥ गोदातटस्थाय च वैदिकाय विप्राय वन्हेः परिसेवकाय ॥ ददाति दानानि रविग्रहे भृशं सलोकतां याति हरेर्हरस्य ॥ १३ ॥ नासिके निवसतिं करोति यः श्वापि वा भवतु गर्दभोपि वा ॥ वैष्णवं पदमुपैति मानवः श्वापि विप्रतनुमेति गर्दभः ॥ १४ ॥ बकवृकशुककाका भेककंकाः सृगालाः शशशबरकुरंगा यांति मुक्तिं भवाब्धेः ॥ यदि तु मरणकाले दैवयोगेन गंगातटमिह परिमुक्ता नात्र कार्यो विचारः ॥ १५ ॥

ब्रह्मादिक तत्ववेत्त्यांचें मत असें आहे कीं, जो यथाविधी अश्वमेध करितो त्याचें व वर्षवृत्ति देणाराचें फल सारखेंच ॥ १२ ॥ गोदेच्या तीरावर राहणाऱ्या वैदिक ब्राह्मणाला व अग्नीची उपासना करणारांना, जो सूर्यग्रहण पर्वणीचे दिवशीं दान देईल तो कैळासास किंवा वैकुंठास जाईल ॥ १३ ॥ नासिकक्षेत्रांत राहणारा कुत्रा किंवा गाढव असो, तो पुढें ब्राह्मण जन्माला जातो. मनुष्य असेल तर तो वैष्णवपदाला जातो ॥१४॥ बगळे, लांडगे, पोपट, कावळे, बेडूक, गिधाड, कोल्हे, ससे, हरिण इत्यादि पशूसुद्धां गोदेच्या तीरावर दैवयोगानें मृत झाले असतां भवसमुद्रांतून तरून जाऊन मुक्त होतात ह्यांत शंका नाहीं ॥ १५ ॥

अश्वमेधशतमातनोति यो नासिके वसति यो दिनत्रयम् ॥ तावुभावपि समानरूपिणावेकसंस्थितिमवाप्य राजतः ॥ १६ ॥ यः पंचवट्यां क्षणमात्रसुस्थितः सहस्रसंख्याक्रतुकृत्फलं सः ॥ तयोस्तु पूर्वः पदमेति विष्णोरन्यो दिवं याति पुनः क्षयिष्णुम् ॥ १७ ॥ तस्मान्न किंचित्सदृशं पृथिव्यां श्रीपंचवट्याः परमं निधानम् ॥ संसेवनीयं भवबंधमुक्तेः पदं निदानं कथितं मुनीन्द्रैः ॥ १८ ॥ कदाचित्कैलासे विधिहरिपुरः प्राह भगवान् भवानीमादिश्य त्रिपुरहर ईशोऽपि जगताम् ॥ समस्ते त्रैलोक्ये रघुपतिपदांभोजनिलयं पदं गोदातीरे भवभयहरं सारमखिलम् ॥ १९ ॥

जो त्रिरात्र नासिकक्षेत्रांत राहील त्याला शंभर अश्वमेध यज्ञ केल्याचें पुण्य मिळेल. ते दोघेही समान रूप होऊन एकस्थानाला जातील ॥ १६ ॥ जो पंचवटींत क्षणमात्र राहील त्याला सहस्र यज्ञ केल्याचें पुण्य मिळेल. पंचवटींत राहणारा वैष्णवपदाला जाईल व सहस्र यज्ञ करणारा क्षणभंगुर अशा स्वर्गास जाईल ॥ १७ ॥ म्हणून पंचवटीसारखें दुसरें स्थान या जगांत नाहीं, आणि म्हणूनच मुनिवर्यांनीं हें स्थान सेवन करण्यास योग्य व भवबंधांतून मुक्त करण्याचें स्थान सांगितलें आहे ॥ १८ ॥ एके वेळीं कैलास पर्वतावर ब्रह्मदेव व विष्णु यांचेसमोर पार्वतीला उद्देशून शंकर म्हणाले कीं, हे पार्वती ! सर्व त्रिभुवनांत गोदेच्या तीरावर श्रीरामचंद्राचे चरणकमल हेंच सगळ्यांचें सार व भवभीति दूर करणारें आहे ॥ १९ ॥

सोहं कपालेश्वररूपमेत्य यदादि यातोऽस्मि हि पंचवट्याम् ॥ तदादि तापो मयि कोऽपि नास्ति शांतं हि चित्तं सुखमस्ति दीर्घम् ॥ २० ॥ प्रातः समुत्थाय हृदि स्मरंति ये श्रीपंचवट्यां रघुनाथमूर्तिम् ॥ त एव धन्या कृतपुण्यसंघास्तरंति संसारपयोधिनाथम् ॥ २१ ॥ मायां परित्यज्य विमुक्तमोहा ये पंचवट्यां च कुटीं विधाय ॥ श्रीरामचंद्रस्य पदांबुचित्तास्तरंति संसारपयोधिनाथम् ॥ २२ ॥ गोदातटे स्नानविधिं विधाय निवृत्ततर्षा रघुनाथनाम ॥ स्मरंति ये पंचवटीवनस्थास्तरंति संसारपयोधिनाथम् ॥ २३ ॥ गोदावरीतीरकृताभिषेकाः श्रीरामपादांबुजचित्तभृंगाः ॥ श्रीपंचवट्यां कृतनित्यवासास्तरंति संसारपयोधिनाथम्॥२४॥

जेव्हांपासून मी कपालेश्वराचें रूप धारण करून पंचवटीमध्यें राहिलों तेव्हांपासून माझा सर्व ताप दूर होऊन माझें चित्त शांत झालें व मी सुखाचा अनुभव घेतों ॥ २० ॥ प्रातःकालीं उठून जे पंचवटीवासी लोक रघुनाथमूर्तीचें स्मरण करितात, ते या जगांत धन्य व पुण्यवान् समजावे व तेच संसारसमुद्रांतून तरून जातात ॥ २१ ॥ मोहाचा परित्याग करून जे पंचवटींत आश्रम करून राहतात व श्रीरामाच्या चरणकमलीं आपलें चित्त लावितात, ते संसारसमुद्रांतून तरून जातात ॥ २२ ॥ पंचवटीवनांत राहून, गोदेचें स्नान करून ज्यांनीं लोभ व रघुनाथ नामाचें निरंतर स्मरण केलें ते भवसिंधू तरून जातात ॥ २३ ॥ गोदेच्या तीरावर स्नान करणारे श्रीरामचरण कमलांतील भृंग झालेले, श्रीपंचवटींत निरंतर वास करणारे संसारसमुद्रांतुन तरून जातात ॥२४॥

श्रीरामचंद्राय नमोऽस्तु तस्मै रामं त्रिकालं हृदये स्मरंति ॥ श्रीपंचवट्यां कृतपर्णकुट्यास्तरंति संसार-पयोधिनाथम् ॥ २५ ॥ गंधैः सुपुष्पैः फलपत्रदानैर्ये पूजयंति क्षितिजाधिनाथम् ॥ श्रीपंचवट्यां सततं त्रिकालं तरंति संसारपयोधिनाथम् ॥ २६ ॥ यजंति ये पंचवटीवनस्थाः श्रीरामचंद्रं बहुभिर्धनौघैः ॥ सहस्र-भोज्येन च तर्पयंति तरंति संसारपयोधिनाथम् ॥२७॥ ये पंचवट्यां द्विजपुंगवेभ्यो मह्यादि दानानि समर्पयंति ॥ घृतेन दुग्धेन च तर्पयंति तरंति संसारपयोधिनाथम् ॥ २८ ॥ ये पंचवट्यां विविधैर्धनौघैर्हुताशनं देवमुखं यजंति ॥ श्रीराममुद्दिश्य समर्पयंति तरंति संसारपयो-धिनाथम् ॥ २९ ॥

त्या श्रीरामाला नमस्कार असो, असें ह्मणून त्रिकाळ श्रीरामाचें स्मरण करणारे व पंचवटींत आश्रम बांधून राहणारे संसारसमुद्रांतून तरून जातात ॥ २५ ॥ जे सीतापतीची गंध, उत्तम फुलें, फलपत्रादिकेंकरून पूजा करितात व पंचवटींत सतत राहून श्रीरामाची आराधना करितात ते संसारसागरांतून तरून जातात ॥ २६ ॥ पंचवटीवनांत राहणारे व पुष्कळ धनसमूहानें श्रीरामाची आराधना करणारे व सहस्र भोजनें घालणारे जे ते भवसमुद्र तरून जातात ॥ २७ ॥ जे पंचवटींत राहणाऱ्या ब्राह्मणश्रेष्ठांना पृथ्वीदानादि दानें देतात व दूध तूप इत्यादि अर्पण करून संतुष्ट करितात ते भवसिंधू तरून जातात ॥ २८ ॥ जे पंचवटींत राहून देवाचें मुख जो अग्नि त्याला विविध धनौघानें पूजित करितात, असें रामाच्या उद्देशानें अग्नीचें संतर्पण करणारे संसारसमुद्र तरून जातात ॥ २९ ॥

इत्याद्यनेकानि महेश्वरेण वाक्यानि देव्यै कथितानि पूर्वम् ॥ पठंति ये वै सततं त्रिकालं तरंति संसारपयोधिनाथम् ॥ ३० ॥ ॥ इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्ये पंचवटीमाहात्म्यनिरूपणं नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ॥ मार्कंडेय उवाच ॥ पंचवट्याश्च माहात्म्यं नासिकाश्च मया तव ॥ यथाशक्त्या तु कथितं संक्षेपान्मुनिसत्तम ॥ यः शृणोति नरो भक्त्या सोपि पापैः प्रमुच्यते ॥ १ ॥ जैमिनिरुवाच ॥ श्रुतं सर्वं मुने त्वत्तो माहात्म्यं नासिकस्य च ॥ पंचवट्यां त्वया मुक्तिः कथिता च पुनः पुनः ॥ २ ॥ ज्ञानदज्ञानविध्वंसे मुक्तो भवति मानवः ॥ पारतंत्र्यं परं बंधो स्वातंत्र्यं मुक्तिरुच्यते ॥ ३ ॥

अशा प्रकारचीं अनेक वाक्यें शंकरांनीं श्रीपार्वतीला कथन केलीं. जे लोक हें सतत पठण करितात ते भवांबुधींतून तरून जातात ॥ ३० ॥ इति श्रीनासिकमाहात्म्ये पंचवटीमाहात्म्यवर्णनं नाम षोडशोध्यायः ॥ १६ ॥ ॥ श्रीमार्कंडेय सांगतात–हे जैमिने ! मी तुला पंचवटीचें व नासिकचें माहात्म्य सांगितलें आहे. मी यथाशक्ती व संक्षेपानें सांगितलेलें माहात्म्य जो कोणी भक्तीनें ऐकेल तो सर्व पातकापासून मुक्त होईल ॥ १ ॥ जैमिनी म्हणतात—मुनिवर्या, मी तुमच्या मुखानें नासिकक्षेत्राचें माहात्म्य व पंचवटीच्या ठिकाणीं मुक्ती प्राप्त होते हें ऐकिलें ॥ २ ॥ ज्ञानानें अज्ञानाचा विध्वंस होतो, नंतर मुक्ति होते. परतंत्रता हाच मोठा बंध आहे व स्वातंत्र्य ह्यालाच मुक्ति म्हणतात ॥ ३ ॥

सवासनं मृषाज्ञानं यावन्नैव विनश्यति ॥ तावन्न मुच्यते जंतुरिति सर्वविनिर्णयः॥ ४ ॥ पाराशर्यमुखादे-तच्छ्रुतमस्माभिरेव तु ॥ पंचवट्यां निवासेन कथं ज्ञानमवाप्यते ॥ ५ ॥ तन्मे कथय विप्रेंद्र संशयोत्र महान्मम ॥ त्वदन्यः संशयस्यास्य छेत्ता लोके न विद्यते ॥ ६ ॥ मार्कंडेय उवाच ॥ श्रीरामकृपया विप्र किमशक्यं जगत्रये॥ श्रीरामः सर्वदेवानामीश्वरः परमः प्रभुः ॥ ७ ॥ तस्य किंचिन्न दुष्प्राप्यं त्रैलोक्येऽपि चराचरे॥ इयं गोदावरी साक्षात्तीरे पंचवटी तथा ॥ ८ ॥ रामेणाधिष्ठिता नित्यं परमेण कृपालुना ॥ त्रैलोक्यस्योपकाराय काशीवच्छिवनिर्मिता ॥ ९ ॥

वासनेसुद्धां खोटें ज्ञान जेथपावेतों नष्ट होत नाहीं; तेथपावेतों मुक्ती नाहीं असा सर्व शास्त्रांचा सिद्धांत आहे ॥ ४ ॥ आम्ही हें पाराशर्यांच्या मुखांतून ऐकिलें आहे. पंचवटींत राहिल्यानें ज्ञान कसें मिळतें ॥ ५ ॥ हें सर्व कृपा करून आपण सांगावें. कारण याविषयीं माझे मनांत फार संशय आहे, आणि या संशयाचा नाश करणारा तुझ्यावांचून दुसरा कोणी नाहीं ॥ ६ ॥ मार्कंडेय म्हणतात—श्रीरामकृपा झाल्यानंतर या जगांत कोणती गोष्ट अशक्य आहे. श्रीराम हे सर्व देवांचे ईश्वर असून सर्व समर्थ आहेत ॥ ७ ॥ स्थावर जंगमात्मक ब्रह्मांडांत अशक्य असें कांहींच नाहीं. ही गोदावरी गंगा व तिच्या तीरावर असलेली पंचवटी, येथें कृपाळू श्रीरामाचें निरंतर अधिष्ठान आहे ॥ ८ ॥ ही पंचवटी म्हणजे श्रीशंकरानें जशी काशी निर्माण केली तशी श्रीरामानें निर्माण केली आहे॥९॥

यथा काश्यां महादेवो मरणावसरे नृणाम् ॥ तारकं कथयत्येव स्वयं कर्णे विनिश्चितम् ॥ १० ॥ लीलाविग्रह एवासौ लीलयैव करोति सः ॥ काश्यामेवाभिमानोऽस्य नान्यत्र कृत इत्यलम् ॥ ११ ॥ कुतर्कोऽयं न कर्त्तव्यः पाखंडमतसंश्रितः ॥ स्वतंत्रस्थौ हि तौ देवौ कथितौ रामशंकरौ ॥ १२ ॥ एवं हि रामचंद्रेण पंचवट्यां वसंति ये ॥ भवाब्धेर्मोचनीयास्ते नित्यमेव हि जंतवः ॥ १३ ॥ रामशंकरयोर्भेदः सर्वथैव न विद्यते॥ लीलाविग्रहवान्रामो लीलाविग्रहवान्हरः ॥ उभयोरंतरं नास्ति मूढानां तु प्रतारणा ॥१४॥ न कोपि मुक्तो न च कोऽपि बद्धो मोहस्य सर्वाणि विचेष्टितानि ॥ विचार्यंते निश्चलचेतसा वै न कोऽपि बद्धो न च कोऽपि मुक्तः१५

जसा काशीमध्यें मरण्याचेवेळीं मनुष्यांच्या कानांत विश्वेश्वर तारक मंत्राचा उपदेश करितात ॥१०॥ श्रीविश्वेश्वरानें लीलेनें देह धारण केला असून लीलेनेंच सर्व गोष्टी श्रीशंकर करितात. शंकराचा केवळ काशीविषयींच अभिमान आहे, दुसऱ्या ठिकाणीं नाहीं॥११॥ असा कुतर्क पाखंड मताप्रमाणें करूं नये. कारण श्रीराम व शंकर हे दोन्ही देव स्वतंत्र आहेत ॥ १२ ॥ राम ह्मणतात—काशीप्रमाणें मलाही पंचवटींत राहणारे सर्व जंतु मुक्त करावयाचे आहेत ॥१३॥ राम व शंकर ह्यांच्यांत मुळींच भेद नाहीं. जसा शंकरानें लीलेनें देह धारण केला आहे, तसाच रामानेंही लीलेनेंच धारण केला आहे. दोहों मध्यें मुळींच अंतर नाहीं. भेदाविषयीं केवळ मूढांची समजूत आहे ॥ १४ ॥ जगांत कोणी बद्धही नाहीं व कोणी मुक्तही नाहीं. बद्ध व मुक्त ही स्थिति केवळ मोहामुळें आहे. विचारांतीं हेंच तत्व नि-

बंधमोक्षौ हि भूतानां केवलं भ्रमकारितौ ॥ श्रीराम-
कृपया तत्र भ्रमो नश्यति तत्क्षणात् ॥ स्वप्नमध्ये यथा
व्याघ्रैर्वेष्टितो रौति मानवः ॥ १६ ॥ संसारोऽयं महा-
स्वप्नो जीवानां परमो मतः ॥ भगवत्कृपया भ्रांतौ ग-
तायां न हि किंचन ॥ १७ ॥ नाहं बद्धोऽस्मि केनापि
मुक्त एवास्मि सर्वदा ॥ प्रत्यभिज्ञानमात्रेण सुप्तोत्थित
इवाभवत् ॥ १८ ॥ पंचवट्यां च काश्यां च भगवत्कृ-
पया मतिः ॥ संसारच्छेदनी सद्यो जायतेऽत्र न संशयः
॥ १९ ॥ एतदेव कथं नैव चक्रतुर्न कुतः कृतम् ॥
अन्यत्र न कुतो मुक्तिर्दीयते प्राणिनां सदा ॥ २० ॥
स्वतंत्रेच्छस्य रामस्य न वक्तव्यं कदाचन ॥ काशी
पंचवटी चैव जगतः परमे तरी ॥ २१ ॥

श्चित ठरलेलें आहे ॥ १५ ॥ बंध आणि मोक्ष हे केवळ प्राण्यांना
भ्रम उत्पन्न करणारे आहेत. श्रीरामाच्या कृपेनें मोह तत्काळ
नाहींसा होतो. स्वप्नांत ज्याप्रमाणें आपल्या भोंवतीं वाघ जमलेले
आहेत असें पाहून मनुष्य रडूं लागतो ॥ १६ ॥ तसेंच मोहानें
आपण बद्ध आहोंत असें जंतू मानतो. संसार हा केवळ प्राण्यांना
मोठ्या स्वप्नासारखा आहे. परमेश्वराच्या कृपेनें भ्रांती दूर झाली
ह्मणजे संसार वगैरे कांहीं नाहीं ॥ १७ ॥ मला कोणी बांधलेलें
नाहीं, मी सदा मुक्त आहें, असें ज्ञान झालें ह्मणजे स्वप्नांतून जागा
झालेला मनुष्य जसा असतो तसा हा मुक्त होतो ॥ १८ ॥ पंचव-
टींत व काशींत भगवंताचे कृपेनें संसार नाहींसा करणारी बुद्धि
होते ॥१९॥ अशी मोक्ष देणारी बुद्धी दुसऱ्या ठिकाणीं प्राण्यांना कां
उत्पन्न होत नाहीं व शंकरानें व रामानें असें कां केलें नाहीं ॥२०॥
हा प्रश्न स्वतंत्रेच्छु रामाच्या ठिकाणीं संभवत नाहीं. काशी व

अनयोः सदृशं किंचित्त्रैलोक्ये सचराचरे ॥ नास्ति नास्तीति जानीहि निश्चितं मतमुत्तमम् ॥ २२ ॥ ब्रह्मज्ञानं प्रोच्यते मुक्तिहेतुर्वेदेत्कश्चित् ज्ञानतः कापि मुक्तिः ॥ नाद्यापीति श्रूयते लोकमध्ये ये वै मुक्तास्ते तयोरेव भक्त्या ॥ २३ ॥ वाराणस्यां पंचवट्यां च मुक्ताः संसाराब्धेस्ते च मुक्ता हि सत्यम् ॥ किं वा भक्त्या केवलं श्रीमुरारेः शंभोर्भक्त्या नात्र कार्यो विचारः ॥ २४ ॥ काशीं पंचवटीं हित्वा मुक्तिर्नान्यत्र दृश्यते ॥ कश्चिद्वदति चेत्तत्रेत्यर्थवादो न संशयः॥२५॥ अभ्यर्च्य शंभुं दशभिः शिरोभिस्तपस्तु चीर्णं दशकंधरेण ॥ लंकाधिपत्यं यदवाप रामं बिभीषणेनापि तदेव नत्वा ॥ २६ ॥

पंचवटी ह्या दोन उत्तम नौका आहेत. ॥ २१ ॥ ह्यांच्यासारखें सर्व ब्रह्मांडांत दुसरें धन नाहीं असें माझें मत निश्चित आहे ॥२२॥ ब्रह्मज्ञान हें मुक्तीचें साधन आहे. कोणी म्हणतात ज्ञानानें मुक्ती होते. आम्ही जगांत असें ऐकतों कीं श्रीविश्वेश्वर व राम ह्यांच्या भक्तीनें मुक्ती मिळते ॥ २३ ॥ काशीक्षेत्रांत व नासिकक्षेत्रांत राहणारे मुक्त झाले ही गोष्ट खरी आहे. पण त्यांच्या मुक्तीला कारण शंकराची व रामाची भक्ती हेंच कारण आहे यांत शंका नाहीं ॥ २४ ॥ काशी व पंचवटीवांचून दुसऱ्या ठिकाणीं मुक्ती नाहीं असें जे म्हणतात तो केवळ अर्थवाद आहे ॥ २५ ॥ रावणानें आपल्या दहाही मस्तकांनीं शंकराची आराधना करून जें राज्यपद मिळविलें, तेंच राज्य बिभीषणानें रामचंद्राच्या भक्तीनें मिळविलें. त्यानें फक्त रामाला नमस्कार करून राज्य मिळविलें ॥ २६ ॥

वैषम्यमेतत्कविभिः पुराणैर्व्यासादिभिर्वर्णितमेव सत्यम् ॥ तथापि रामस्य महेश्वरस्य भेदं न किंचिन्मनसः प्रतीमः ॥ २७ ॥ इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्ये भक्तिविचारोनाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ ॥
श्रीशं वंदे ॥ श्रीमार्कंडेय उवाच ॥ कलौयुगे ब्राह्मणजन्म दुर्लभं तत्रापि गोदातटयोर्निवासः ॥ तत्रापि चेत्पंचवटीशसंगमस्तदा तु मोक्षो निजहस्त एव ॥ १ ॥ अथान्यदपि वक्ष्यामि स्तोत्रं पापप्रणाशनम् ॥ यदुक्तं शंभुना पूर्वं पार्वत्यै गणसन्निधौ ॥ २ ॥ एकदा पार्वती बाला शंकरं रहसि स्थितम् ॥ जपंतं परमं भक्त्या प्रणम्य चाब्रवीच्छिवम् ॥ ३ ॥

विद्वान् अशा व्यासादिकांनीं आपल्या पुराणांतून जरी असा भेद वर्णन केला आहे, तथापि आमचें मत असें आहे कीं, रामचंद्र व शंकर ह्यांच्यांत कांहीं भेदच नाहीं ॥ २७ ॥ इति श्रीपद्मपुराणांतर्गत नासिकमाहात्म्यापैकीं भक्तीमाहात्म्य नामक सतरावा अध्याय समाप्त ॥ १७ ॥ मार्कंडेय म्हणतात—कलियुगांत ब्राह्मणाचा जन्म मिळणें दुर्लभ आहे. त्यांत गोदेच्या तीरावर जन्म मिळणें दुर्लभ. त्यांतून गोदेच्या संगमावर राहण्यास मिळणें फार दुर्लभ. जर हा सर्व लाभ होईल तर मोक्ष हा आपल्या हातांत आल्यासारखा समजावा ॥१॥ हे जैमिने, पूर्वीं शंकरानें गणांच्या समक्ष पार्वतीला सांगितलेलें पापहरण करणारें स्तोत्र तुला सांगतों ऐक ॥ २ ॥ एके वेळीं एकांतांत पार्वतीनें जप करणाऱ्या शंकराला मोठ्या भक्तीनें नमस्कार करून प्रश्न केला ॥ ३ ॥

पार्वत्युवाच ॥ स्वामिन् त्वया किं रहसि स्थितेन शनैः शनैश्चेतसि जप्यते हि तत् ॥ विज्ञातुमिच्छामि पदं विचित्रं भवान् हि पूज्यो भवतोऽपि पूज्यः ॥४॥ श्रीमहादेव उवाच ॥ कदाचिद्रामचंद्रस्य दर्शनार्थमहं गतः ॥ तत्र मे गच्छतो मार्गे युगानां कोटयोऽभवन् ॥ श्रांतस्तदा महामायां मनसा शरणं गतः॥५॥ नागं लिंगं च योनिं शिरसि विदधती तप्तकार्तस्वराभा नानालंकारयुक्ता शशधरवदना मातुलिंगं गदां च ॥ खेटं पात्रं वहन्ती सरसिजनयना बद्धपद्मासना सा प्रादुर्भूत्वा पुरस्तात्सकलसुरगणैर्वंदिता मामुवाच ॥६॥ महालक्ष्मीरुवाच ॥ महादेव मम ज्ञानं हृद्गतं ते जगत्पते ॥ श्रीरामदर्शनाकांक्षी भवान्मार्गेण गच्छति॥७॥

पार्वती ह्मणते—महाराज ! आपण एकांतांत बसून मनांत हळू हळू कशाचा जप करीत असतां? जगांत सर्वांमध्यें आपण पूज्य आहांत; आपल्यापेक्षांही जगांत दुसरा कोण पूज्य आहे ? ॥ ४ ॥ शंकर सांगतात—एके वेळीं मी रामचंद्राचे दर्शनास जाण्यास निघालों. मार्गानें चालतां चालतां कोट्यावधी युगें गेलीं. मी अतिशय दमलों व नंतर मनानें महामायेला शरण गेलों ॥ ५ ॥ नंतर नाग, लिंग, योनि मस्तकावर धारण करणारी, तापलेल्या सोन्यासारखा जिचा रंग आहे अशी नानाप्रकारचे अलंकार धारण करणारी, चंद्रासारखें जिचें मुख आहे अशी, महाळुंग, गदा, ढाल व पानपात्र हातांत धारण करणारी, कमलनयना, पद्मासनावर बसलेली, सर्व देवगण जिला निरंतर वंदन करितात अशी देवी माझ्यासमोर प्रगट होऊन मला बोलूं लागली ॥ ६ ॥ महालक्ष्मी ह्मणाली—महादेव, मजविषयीं तुला ज्ञान आहे. तूं रामदर्शनार्थ मार्गानें चालला आहेस ॥ ७ ॥

वर्षाणां कोट्यो जाता रामो न प्राप्यते त्वया ॥ पापप्रशमनं स्तोत्रं पठ नित्यं महामते ॥ ८ ॥ निष्पापः सन् महाराज रामं पश्यसि तत्क्षणात् ॥ इत्युक्त्वा सा जगन्माता ददौ स्तोत्रं महाद्भुतम् ॥ ९ ॥ तत्स्तोत्रपाठमात्रेण रामो दृष्टो मया हृदि ॥ अंतर्बहिश्च रामो मे सर्वं राममयं जगत् ॥ १० ॥ तद्दिनादहमेतद्धि नित्यं स्तोत्रं पठाम्यहम् ॥ तत्स्तोत्रपाठमात्रेण रामं पश्यामि सर्वतः ॥ ११ ॥ पार्वत्युवाच ॥ ममापि दीयतां स्तोत्रं पापप्रशमनाभिधम् ॥ रामं द्रक्ष्यामि देवेश भवतः कृपया विभो ॥ १२ ॥ महादेव उवाच ॥ अस्य पापप्रशमनस्तोत्रमालामंत्रस्य भगवान्सदाशिव ऋषिः ॥ अनुष्टुप्छंदः ॥ रंबीजं ॥ ह्रींशक्तिः ॥ नमः कीलकम् ॥

जातां जातां कोट्यावधी वर्षें झालीं, अद्याप तुला रामदर्शन झालें नाहीं. करितां हे महामते, पापप्रणाश करणाऱ्या माझ्या स्तोत्राचा तूं पाठ करावा ॥ ८ ॥ तूं निष्पाप झालास ह्मणजे तात्काल तुला रामदर्शन होईल. असें ह्मणून महालक्ष्मीनें अद्भुत स्तोत्राचा श्रीशंकराला उपदेश केला ॥ ९ ॥ त्या स्तोत्रपाठाच्या पुण्यानें मला हृदयांत श्रीरामदर्शन झालें. आंत बाहेर चोहोंकडे मला रामदर्शन होऊन सर्व जग रामरूप दिसावयास लागलें ॥ १० ॥ त्या दिवसापासून तें स्तोत्र मी दरदिवशीं ह्मणतों. त्या स्तोत्रपाठाचे योगानें सर्व ठिकाणीं मला रामदर्शन होत आहे ॥ ११ ॥ पार्वती ह्मणाली—मलाही तें स्तोत्र आपण शिकवा. कारण तें पापनाशक असून, त्याचे योगानें मलाही रामदर्शन होईल ॥ १२ ॥ महादेव सांगतात—त्या पापप्रशमन स्तोत्राचा भगवान् सदाशिव ऋषि

रामप्रीतये जपे विनियोगः ॥ मायाबीजेनषडंगद्वयं विधाय ध्यायेत् ॥ अथ ध्यानम् ॥ अनाथानां नाथं पशुपतिमतं पंकजगतं भजेऽहं श्रीरामं जनकतनया लक्ष्मणयुतम् ॥ महद्गोदातीरे सकलमुनियुक्पंचवटिकां गतं योगिध्येयं पवनसुतवंद्यं रघुपतिं ॥ १ ॥ इति ध्यानम् ॥ रामः कृष्णः श्रीपतिः पद्मनाभः सीतानाथः केशवः केशिहंता ॥ योगिध्येयो देवदेवः परात्मा मायातीतो मापतिर्गोपतिश्च ॥ १ ॥ आद्यो ब्रह्मा विष्णुरीशो गणेशो भानुः सूर्यो वेदवेदांतवेद्यः ॥ वेदो नित्यः शाश्वतो दैत्यहंता मायातीतो मायया सेव्यमानः ॥२॥

आहे. अनुष्टुप् छंद आहे. रं बीजं, ऱ्हीं शक्तिः, नमः कीलकं, रामाचे प्रीतीकरितां त्याचा विनियोग आहे. मायाबीजानें षडंग न्यास करून नंतर ध्यान करावें. ध्यान—अनाथांचा नाथ, शंकराला मान्य, अशा लक्ष्मणसीतारामाला मी अनन्यभावानें शरण आलों आहें. ज्या श्रीरामानें श्रीमद्गोदेच्या तीरावर असलेल्या सकल मुनींच्या वसतिस्थानभूत झालेल्या पंचवटींत वास केला आहे. ज्या रामाचें सर्व योगिजन ध्यान करितात. जो पवनसुत मारुतीला वंद्य असून रघुवंशाचा जो पती आहे ॥१॥ इति ध्यानं ॥ राम, कृष्ण, श्रीपति, पद्मनाभ, सीतानाथ, केशव, केशिदैत्याला मारणारा, योगि लोकांना ध्यान करण्यास योग्य, देवांचा देव, परात्मा, मायेच्या पलीकडे राहणारा, लक्ष्मीकांत व गोपती, आद्य, ब्रह्मा, विष्णु, शंकर, गणेश, भानु, सूर्य, वेद व वेदांतांनीं जाणण्यास योग्य, वेदरूप, नित्य, शाश्वत, दैत्यांना मारणारा, मायेच्या पलीकडे राहणारा, माया ज्याचें सेवन करिते असा, ॥ २ ॥

रक्षोहंता शंभुदासः पुराणो विश्वव्यापी नायकः पालकश्च ॥ ३ ॥ वाल्मीकिगीतः क्षितिजाकलत्रः श्रीरामचंद्रः शरणार्त्तिहंता ॥ जेता जनेशश्च विदेहजाधवः पापप्रणाशी शशिचूडपूज्यः ॥ ४ ॥ विप्रप्रियो विप्रगुरुस्तपस्वी ज्ञानी च मौनी च जितारिवर्गः ॥ निबद्धसिंधुर्जितदैत्यवंधुः शांतः प्रियो नाशितसर्गतापः ॥५॥ नारायणः कारुणिकः कृपालुः पातालभित् पर्वतभित् विजेता ॥ सर्वास्त्रविच्छस्त्रधरस्तपस्वी जटाधरो राक्षसमूलभेत्ता ॥ ६ ॥ विश्वात्मको विश्वपतिश्चिदात्मा विद्या विनेता विजयप्रदाता ॥ विद्याधरो धर्मधरः क्षितीश्वरो राजाधिराजो रघुवंशदीपः ॥ ७ ॥

राक्षसांना मारणारा, शंकराचा दास, पुराण विश्वव्यापी, नायक पाळक, ॥ ३ ॥ वाल्मीकिगीत, सीता आहे पत्नी ज्याची, श्रीरामचंद्र, शरणांगताची पीडा दूर करणारा, जिंकणारा, सर्व जनांचा पाळक, विदेहापासून जन्मलेली जी सीता तिचा पती, पापाचें शमन करणारा, चंद्रशेखराला पूज्य, ब्राह्मणप्रिय, ब्राह्मणांना पूज्य, तपस्वी, ज्ञानी, मौन धारण करणारा, शत्रुवर्गाला जिंकणारा, समुद्रांत सेतू बांधणारा, दैत्यांचा समूह जिंकणारा, शांत, प्रिय, उत्पत्तिसंबंधीं ताप दूर करणारा, ॥ ५ ॥ नारायण, करुणायुक्त, कृपाळु, पाताळाचा भेद करणारा, पर्वतांचा भेद करणारा, जिंकणारा, सर्व अस्त्रांचा ज्ञाता, शस्त्र धारण करणारा, तपस्वी, जटा धारण करणारा, राक्षसांचें मूळ भेदणारा, ॥ ६ ॥ विश्वस्वरूप, विश्वाचा पती, चैतन्यस्वरूप, विद्या देणारा, विजय देणारा, विद्याधर, धर्मधर, क्षितीश्वर, राजाधिराज, रघुवंशामध्यें दीपासारखा; ॥ ७ ॥

जितारिमित्रः कुशराजपुत्रः सौमित्रिमित्रः परमः पवित्रः ॥ राजीवनेत्रः शरभिन्नगात्रः संपूर्णसत्रोऽवनिजाकलत्रः ॥ ८ ॥ लंकेश्वरप्राणहरो महेशो विभीषणत्राणकरो दयालुः ॥ मुनिप्रियः पापहरो जितात्मा जायाभिलाषी शिवचापभेत्ता ॥ ९ ॥ धर्माधिकारी गुरुवाक्यकर्ता यज्ञप्रियो याजकरक्षकश्च ॥ विनायको भार्गवगर्वहंता गोदाप्रियः पंचवटीनिवासी ॥ १० ॥ जयप्रियो भक्तवरप्रदाता श्रीवायुपुत्राधिपतिः प्रशांतः ॥ अशोकवृक्षावलिबंदिमोक्ता कृपानिधिः पालितसर्वदेवः ॥ ११ ॥ साकेतनाथोखिलपापहंता स्वर्गप्रदाता सरयूप्रियश्च ॥ १२ ॥ इति रामस्तोत्रम् ॥

शत्रू व मित्र यांना जिंकणारा, कुश आहे पुत्र ज्याचा, लक्ष्मण आहे मित्र ज्याचा, जो परम पवित्र, कमलनेत्र, शरांनीं भिन्न केलें आहे शरीर ज्यानें, सर्व यज्ञ करणारा, सीतापती, ॥ ८ ॥ लंकेश्वराचा प्राण घेणारा, महेश, विभीषणाचें रक्षण करणारा, दयालु, मुनींचा आवडता, पापाचें हरण करणारा, जितात्मा, जायाभिलाषी, शिवधनुष्याचा भंग करणारा, धर्माचा अधिकारी, वडिलांची आज्ञा मानणारा, यज्ञप्रिय, यज्ञ करणारांचें रक्षण करणारा, विनायक, भार्गवाचा गर्व हरण करणारा, गोदाप्रिय, पंचवटीवासी ॥ ९ ॥ १० ॥ जयप्रिय, भक्तांना वर देणारा, वायुपुत्राचा स्वामी, शांत, अशोकीच्या पंक्तींत असलेल्या बंदिजनाला सोडविणारा, कृपासमुद्र, सर्व देवांचें पालन करणारा, ॥ ११ ॥ अयोध्याधिपति, सर्व पातकांचा नाश करणारा, स्वर्ग देणारा, शरयूप्रिय ॥ १२ ॥ इति रामस्तोत्रम् ॥

अष्टोत्तरशतं नाम्नां राघवस्य महात्मनः ॥
पापप्रशमनं नाम स्तोत्रमेतदुदाहृतम् ॥ १३ ॥
आदिलक्ष्म्या पुरा प्रोक्तं शंकराय महात्मने ॥
शंकरेण ततः प्रोक्तं पार्वत्यै कृपया स्वयम् ॥ १४ ॥
पार्वत्या ब्रह्मणे प्रोक्तं ब्रह्मणा नारदाय च ॥ नारदेन महर्षिभ्यो दत्तं भागीरथीतटे ॥ १५ ॥ तेभ्योपि मुनिना प्रोक्तं यत्तत् प्राप्तं द्विजोत्तमैः ॥ एवं परंपराप्राप्तं स्तोत्रं भूमंडलं प्रति ॥ १६ ॥ पापप्रशमनं नाम स्तोत्रमेतज्जगद्गुरोः ॥ ये पठंति नरा नित्यं तेषां संनिहितो हरिः ॥ १७ ॥ पापानि नश्यंति पुराकृतानि श्रीरामचंद्रकृपयाखिलानि ॥ अष्टोत्तरं नामशतं पठंति रामस्य तेषामिह संनिधौ हरिः ॥ १८ ॥

हीं एकशें आठ रामाचीं नांवें आहेत. ह्या स्तोत्राला पापप्रशमन स्तोत्र म्हणतात ॥ १३ ॥ आदिलक्ष्मीनें श्रीशंकराला हें स्तोत्र प्रथम सांगितलें, नंतर स्वतः शंकरानें कृपा करून पार्वतीला सांगितलें ॥ १४ ॥ पार्वतीनें ब्रह्मदेवाला, ब्रह्मदेवानें नारदाला, नारदानें भागीरथीचे तीरावर महर्षींनां, ॥ १५ ॥ महर्षींनीं व्यासांला, व्यासांनीं शौनकादि ऋषींला, अशा परंपरेनें हें स्तोत्र पृथ्वीवर आलें आहे ॥ १६ ॥ जे लोक जगद्गुरूचें हें पापप्रशमनस्तोत्र पठण करितात त्यांना परमेश्वराचें नित्य सान्निध्य असतें ॥ १७ ॥ श्रीरामकृपेनें पूर्वीं केलेलीं सर्व पातकें लयाला जातात. हीं अष्टोत्तरशत नामें घेणारांना श्रीरामाचें निरंतर सान्निध्य असतें ॥ १८ ॥

प्राप्यंते संपदः सर्वाः पुत्रपौत्रादयोखिलाः ॥ यद्य-
त्कामयते चित्ते तत्सर्वं प्राप्नुयान्नरः ॥ १९ ॥ पापं
शमयते यस्मात्तस्मात्पापप्रशांतिकम् ॥ स्तोत्रमेतन्मु-
निजनैः कीर्तितं पापनाशनम् ॥ २० ॥ इति श्रीपद्म-
पुराणे नासिकमाहात्म्ये पापप्रशमनस्तोत्रकथनं नामा-
ष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ॥ मार्कंडेय उवाच ॥
उक्तं मया नासिकपंचवट्योर्माहात्म्यमेतत्सकलाघ-
हारि ॥ शृणोति यः श्रावयते परांश्च प्राप्नोति कामा-
न्सकलानभीष्टान् ॥ १ ॥ एषा रामकथा यथामति
मया प्रोक्ता भवत्सन्निधौ नित्यं ये तु पठंति पंचवटि-
कामध्ये नृणां संनिधौ ॥ तेषां मुक्तिफलं करस्थित-
मिति ज्ञेयं बुधैर्निश्चयात् श्रीरामस्य दयानिधेर्यदि कृपा
जायेत किं दुर्लभम् ॥ २ ॥

पुत्रपौत्रादि सर्व संपत्ति प्राप्त होतात, मनुष्य जें जें मनांत आणील तें तें सर्व मिळेल ॥१९॥ ज्या अर्थी या स्तोत्रामुळें पापांचा शम होतो त्यामुळें या स्तोत्राला पापप्रशमन हें नांव दिलें आहे, आणि याच कारणामुळें मुनी लोकांनीं ह्या स्तोत्राला पापप्रशमन हें अन्वर्थ नाम दिलें आहे ॥२०॥ इति श्रीनासिकमाहात्म्यांतर्गत पापप्रशमनस्तोत्र कथनं नाम अष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ श्री मार्कंडेय सांगतात—मीं हें सर्व पापनाशक नासिक पंचवटीचें माहात्म्य सांगितलें आहे. जो हें ऐकेल किंवा ऐकवील तो सकल पातकांपासून मुक्त होईल ॥ १ ॥ मीं माझ्या बुद्धीप्रमाणें तुमच्यासमोर रामाची कथा वर्णन केली आहे. जो कोणी ही रामकथा पंचवटींत राहून लोकांना ऐकवील

इति श्रीपद्मपुराणे नासिकमाहात्म्ये श्रीपंचवटिका माहात्म्येनिरूपणं नामैकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥ ॥

॥ समाप्तोऽयं ग्रंथः ॥

त्याच्या हातांत मुक्तिरूपी फळ आलें असें बुधांनीं निश्चयानें समजावें. श्रीरामकृपा झाल्यावर जगांत कांहींही दुर्लभ नाहीं ॥ २ ॥ इति श्रीनाशिकपंचवटीमाहात्म्यनिरूपणं नाम एकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥

समाप्तोऽयं ग्रंथः ॥

प्रकाशक—रा. रा. त्रिंबक नारायण पुजारी, यांनीं
नासिक येथें प्रसिद्ध केलें.
मुद्रक—रा. रा. गजानन रघुनाथ मुळे, पुरंदरे कं. प्रि. प्रेस,
नं. ३ ठाकुरद्वार मुंबई येथें छापिलें.

# विक्रीस तयार !!!

## श्रीक्षेत्र नासिकपंचवटीमाहात्म्य

मूळ, संस्कृत पोथी,

किंमत ८ आणे.

---

## श्रीक्षेत्र नाशिकपंचवटीमाहात्म्य

पोथीसाइज, मूळ संस्कृत श्लोक आणि

मराठी भाषांतरासह,

किंमत १२ आणे.

---

ह्याशिवाय सर्व प्रकारचीं शालोपयोगी पुस्तकें, ग्रंथ, नाटकें, कादंबऱ्या व सर्व प्रकारचें स्टेशनरी सामान, पंचांगें, डायरी-बुकें आणि गणेशभक्त मंडळीची जांभळी, काळी, तांबडी शाई वगैरे सर्व माल माफक दरानें मिळेल.

त्रिंबक नारायण पुजारी.

नासिक सिटी.